# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १८.७.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

बुधवार **दिनांक१८ जुलै२००७** रोजी मा.महापौर डॉ.भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ''येथे दुपारी ११.५० वाजता ''वंदेमातरम्''या गिताने सुरू झाली. सभेला उपआयुक्त (प्र.) श्री.एम.वाय.कांबळे तसेच नगरसचिव एम.ए.पठाण यांचेसह संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
०२. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
०३. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
०४. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.धिल्लन तरविंदरसिंग महेंद्रसिंग
१३. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१४. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
१५. स.स.सौ.आशन्ना लक्ष्मी शंकर
१६. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१७. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१८. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१९. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
२०. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
२१. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२२. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२३. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२४. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२५. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२६. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव

२७. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२८. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२९. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
३०. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
३१. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
३२. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
३३. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३४. स.स.सौ.यास्मिन बेगम अ.कदिर
३५. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३६. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज
३७. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३८. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३९. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
४०. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
४१. स.स.श्री.खान निसार मो.खान
४२. स.स.श्री.शेख इब्राहीम शेख इमाम
४३. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४४. स.स.श्रीमती मुमताज बी वाहेद खान
४५. स.स.सौ.राऊत छाया विलास
४६. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४७. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४८. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४९. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
५०. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
५१. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
५२. स.स.श्री.मोतीवाला अशरफ म.युनुस
५३. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५४. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५५. स.स.सौ.खान जहुरबी नासेर
५६. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५७. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५८. स.स.श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
५९. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
६०. स.स.सौ.रेखा कैलास काथार
६१. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
६२. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
६३. स.स.श्री.खुडे विजय किसन

६४. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६५. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६६. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६७. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६८. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
६९. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
७०. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव
७१. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
७२. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
७३. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
७४. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
७५. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७६. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७७. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७८. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७९. स.स.श्री.जोशी संजय रामदास
८०. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
८१. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
८२. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
८३. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
८४. स.स.सौ.जैन अल्पा विकास
८५. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
८६. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८७. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०३. स.स.श्री.राजेश व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०५. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

**चर्चा :**

श्री.संतोष खेंडके :भारताचे माजी पंतप्रधान स्व.श्री.चंद्रशेखर यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले आहे त्यांना दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :
श्री.महेश माळवतकर :
श्री.सलीम खान
} यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

याच वेळी भारताचे माजी पंतप्रधान स्व.श्री.चंद्रशेखर यांचे दु:खद निधनानिमित्त त्यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.संतोष खेंडके : कोरम नाही सभा काही वेळासाठी तहकूब करावी.

मा. महापौर : सभा १० मिनिटासाठी तहकूब करण्यात येते.

(दु.११.५५ वा. सभा तहकूब पून्हा दु.१२.१५ वा. सभेला सुरूवात.)

श्री.संजय जगताप :कुणी सदस्य गोंधळ घातला तर सभासदत्व रद्य केले जाईल अशी धमकी आपण वृत्तपत्रात दिलेली आहे. स.सदस्य विकास कामावर बोलत असतांना अशी धमकी देणे बरोबर नाही. अगोदर चर्चा घेण्यात यावी नंतर विषयपत्रिका घेण्यात यावी.

मा. महापौर :विषय पत्रिका संपल्यानंतर चर्चासाठी पूर्ण वेळ दिला जाईल. याच पध्दतीने काम होणार आहे.

श्रीमती मेहरून्नीसा खॉन : विषय पत्रिका नंतर घेण्यात यावी अगोदर चर्चा घ्यावी.

श्री.मो.जावेद मो.इसहाक :चर्चा अगोदर घेण्यात यावी. नंतर चर्चा होत नाही. विषयपत्रिका झाल्यानंतर लगेच राष्ट्रगित होवून सभां संपविली जाते.मागिल बैठकीत हाच प्रकार झाला होता.

मा. महापौर :चर्चेसाठी पुरासा वेळ दिला जाईल. अगोदर विषय पत्रिका घेण्यात येत आहे.

श्री.सय्यद खुसरो :शहराच्या विकासा संबधी महत्वाचे मुद्दे मांडायचे आहे चर्चा अगोदर घ्यावी त्यानंतर विषय पत्रिका घेण्यात यावी.

**विषय क्र. ८७७/१ :**

दिनांक ३०.०५.२००७ व दिनांक २०.०६.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**चर्चा :**

श्री.संजय जोशी : दि.३.२.२००० ला कर्मचारी यांना वैद्यकीय परतावा ८० टक्के देण्याचा ठराव पारीत झाला होता त्याची अमंलबजावणी झाली नाही ठरावाची प्रत आपल्याकडे दिली आहे इतिवृत्तातील ठराव क्र ८३५/२ हा त्या ठरावाप्रमाणेच आहे यामध्ये सुधारणा करून तो मुद्दा समावेश करून जर कर्मचारी कामावर असतांना अपघाती मृत्यू झाला असेल तर १०० टक्के परतावा दिला पाहिजे. अशी दुरूस्ती करावी.

मा. महापौर : महापालिकेचा कोणताही कर्मचारी कामावर असतांना अपघात झाला तर वैद्यकीय परतांवा १०० टक्के देण्यात यावा.ठराव क्र.८३५/२ मध्ये दुरूस्ती करण्यात येते.

श्री.सलीम खॉन :दि.२०.६.२००७ च्या बैठकीतील प्रस्ताव विना चर्चा पास करण्यात आले ते योग्य नाही. कायदयानूसार चर्चा न होता ठराव पास करता येत नाही. ते सर्व प्रस्ताव पुन्हा विषय पत्रिकेवर घेण्यात येवून त्यावर चर्चा होवून निर्णय घेण्यात यावे सदर प्रस्ताव रद्य करावे. इतिवृत्त कायम केल्यास त्या विरोधात मी मा.न्यायालयात दाद मागेल. इतिवृत्त कायम करण्यास माझा विरोध आहे.

मा. महापौर :आपला विरोध असल्याची नोंद इतिवृत्तांत घेतलेली आहे.काही दुरूस्ती करायची असेल तर सूचवावी.

श्री.भाऊसाहेब ताठे :दि.२०.६.०७ च्या इतिवृत्तातील विषय क्र ८४० मध्ये ११० कोटीचे रस्ते करणार आहोत. एन -११ महापालिका दवाखाना ते यादवनगर तसेच एन -११ स्मशानभूमी ते एसपीआय पर्यत हे दोन रस्तेचा समावेश करावा.

| | |
|---|---|
| श्री.संजय जोशी | :शिवराज कॉलनी ते चाणक्यपूरी हा सूध्दा डी. पी रोड यात समावेश करावा. |
| मा. महापौर | :या बाबतीत सर्व पदाधिकारी व मा.आयुक्त एकत्रित बसून योग्य तो निर्णय घेतील. |
| श्री.संजय सिरसाट | :अशा दूरूत्या करू नये मागिल स्थायी समितीमध्ये मा. आयुक्त यांनी म्हटले की सभागृहात काही रस्त्याच्या संख्येत वाढ झाली तर ते काम निश्चित केलेल्या रक्कमेत होणार नाही. याचा अर्थ महापौरांनी रूलीग दिल्यानंतर त्याची अमलबजावणी होत नाही. |
| मा. महापौर | :पहिल्या टप्प्यात जे महत्वाचे रस्ते आहे त्यावरून ट्रक व मोठी वाहने जातात तेच रस्ते घेणार आहोत. या संदर्भात सर्व पदाधिकारी व मा. आयुक्त बसून निर्णय घेता येईल. |
| श्री.भगवान घडमोडे | :कोणत्या वार्डातील काम आहे याचा निकष न लावता या शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून जे मोठे रस्ते आहे डी. पी रस्ते आहे त्यास प्राधान्य देवून करण्यात यावे. |
| मा. महापौर | :यात जे रस्ते मोठे तसेच मोठे डी.पी रोड आहे कोणत्याही एका वार्डातील नाही असे मोठे रस्ते घेण्यात येतील. |
| श्री.वसंत नरवडे | :६० कोटीचे कर्ज काढून रस्ते करणार आहोत. त्यासाठी बजेटची तरतूद काय आहे. परतफेड कशी करणार आहे. |
| मा. महापौर | :नगररचना विभागाचे उत्पन्नातून परत फेड केली जाईल अशी गॅरेन्टी दिलेली आहे. |
| श्री.रविकांत गवळी | : मागिल इतिवृत्तातील ठराव क्र ८४०/७ नुसार प्रशासनाने ११० कोटीचा प्रस्ताव का सादर केला कारण ऑलरेडी ५० कोटीची कामे सुरू आहे.ते काम एमएसआरडीसी करीत आहे त्यासाठी पीएमसीला १.५ टक्के देण्याची गरज नाही. जे शासनाकडून कर्ज घेतलेले आहे त्यालाच १.५ टक्के प्रमाणे देण्यात यावे.पीएमसीला १.५ देणे गरजेचे आहे काय याचाही खूलासा घेण्यात यावा. |
| मा. महापौर | : ५० कोटीची चार रस्त्याची कामे चालू आहे.उर्वरीत रस्ते प्रस्तावित आहे. ६० कोटीच्या संदर्भातच चर्चा करावी माहितीसाठी सभागृहासमोर आलेले आहे. |
| श्री.संजय सिरसाट | : विषय मंजूर झालेले आहे. काना मात्रा नसेल तर ही दुरूस्ती करावी. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | : ज्या विषयावर चर्चाच झाली नाही त्यावर खूलासा घेणे गरजेचे आहे. |
| मा. महापौर | : मागिल बैठकीत हा विषय मंजूर झालेला आहे त्यावर चर्चा करणे बरोबर नाही. |
| श्री.संतोष खेंडके | : २.५ टक्के प्रमाणे पीएमसीला देण्याचे स्थायी समितीने मान्य केलेले आहे त्याप्रमाणे मंजूरी दयावी. |
| मा.महापौर | : ठिक आहे स्थायी समितीच्या निर्णयाप्रमाणे २.५% करण्यात येते. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | : ठराव क्र ८४० मध्ये मागिल बैठकीत कोणतीही चर्चा झालेली नाही. शासनाकडून आलेल्या २५ कोटीतून तसेच मध्यतंरी २५ कोटीचे डिफंर पेमेन्टवर २५ कोटीचे रस्ते करण्याचे निर्णय घेतलेला होता. तसेच ६० कोटी शासनाकडून कर्ज घेवून एकूण ११० कोटीचे रस्ते करणार आहोत असा प्रस्तावात म्हटले आहे.६० कोटी कर्ज घेतल्यानंतर दर वर्षाला व्याजापोटी ५ कोटी दयावे लागणार आहे. |

मा. महापौर : यात दूरूस्ती असेल तर सुचवावी. तीन महिण्यापूर्वी प्रस्ताव मंजूर झालेला होता.आता फक्त रस्त्याची यादी आलेली आहे. आपले म्हणणे नोंद करून घेतले आहे.एखादा मोठा रस्ता असेल तर तो यात समावेश करून घेतला जाईल.

श्री.काशिनाथ कोकाटे : वार्डात विकास कामासाठी निधी कोठून खर्च करणार आहे याचा ही खूलासा घेण्यात यावा. प्रत्येक कामाचे खाजगीकरण करून कर्ज काढून कामे करायची का? गोधंळ करणार त्यामध्ये विषय मंजूर करून सभा संपविणार याला अर्थ नाही. सिडकोचे हस्तांतरण केले कोणतेही विकास कामे त्या भागात केलेली नाही रस्त्याचे काम झालेले नाही सिडकोचा भाग पुन्हा महापालिकेतून काढून स्वतंत्र करावा की काय अशी वेळ आलेली आहे.खूलासा अपेक्षीत आहे की यातून किती रस्ते होणार आहे. पूर्ण कामे याच वर्षात केली तर पूढील वर्षी काम करण्यासाठी निधी कोठून उपलब्ध करणार आहे याचाही खूलासा होणे अपेक्षीत आहे.

श्री.रविकांत गवळी : ५० कोटीची कामे सुरू आहे त्यासाठी पीएमसीला १.५ टक्के प्रमाणे फिस देण्याची गरज नाही. ६० कोटीच्या कामांना फिस देणेस मान्यता दयावी. परंतू प्रस्ताव ११० कोटीच्या कामास पीएमसीला २.५ टक्के प्रमाणे देण्यासाठी प्रस्ताव आहे.

मा. महापौर : फक्त ६० कोटीच्या कामासाठीच पीएमसीला २.५ टक्के प्रमाणे देण्यात येते.

सौ.पुष्पा शिंदे : दिपाली हॉटेल ते जय भवानी नगर रस्ता घेण्यात यावा.

श्री.सिताराम सुरे : दीड वर्षापूर्वी माझ्या वार्डातील ३६.०० मी. रूदींचा रस्ता डिफंर पेमेन्टमध्ये घेतलेला होता दोन वेळेस निविदा पण काढलेल्या होत्या त्यास वगळून इतर सहा रस्ते आलेले आहे.माझ्या वार्डात डी. पी रस्ता एकही झालेला नसून यात माझ्या वार्डातील ३६ मीटर रूंदीच्या वि-यो रस्त्याचा समावेश करावा.जेथे रस्ते नाही त्याच ठिकाणचे रस्ते घ्यावे जेथे आहे ते वगळावे.

मा. महापौर :स.सदस्य श्री.सिताराम सुरे यांनी सूचवलेल्या रस्त्याचा यात समावेश करण्यात यावा.

सौ.पुष्पा शिंदे : माझ्या वार्डात जयभवानी नगर रस्त्याचे काम अर्धवट आहे दोन वर्ष झाले काम पूर्ण झाले नाही. जय भवानी नगर येथे त्वरीत काम करावे.

मा. महापौर : संबधीत ठेकेदारास सुचना देवून त्वरीत या रस्त्याचे काम करून घेण्यात यावे.

सौ.पुष्पा शिंदे : डी.पी. रोड आहे काम होणार की नाही.

मा.महापौर : अर्धे काम होते अर्धे होत नाही, चर्चेच्या वेळी खुलासा घेण्यात येईल.

श्री.अनिल जैस्वाल : एमजीएम ते बळीराम पाटील हायस्कूल पर्यतच्या रस्त्याचा यात समावेश करावा.

श्री.संतोष खेंडके : ठराव क्र.८४० मध्ये ११० कोटी पैकी ५० कोटी ठराव क्र ८५२ मध्ये १ लक्ष नुकसान भरपाई दयावी असा प्रस्ताव होता परंतू एवढी रक्क्म महानगरपालिका देवू शकणार नाही त्यासाठी अशा सर्व प्रकरणात २५ हजार रूपये मदत देण्यात यावी.तसेच ठराव क्र ८४३ मध्ये जे कामे आहेत त्या सर्वासाठी समान बजेट ठेवण्यात यावे.

मा. महापौर : दुरूस्ती सह मंजूरी देण्यात येते.

श्री.रविकांत गवळी : ठराव क्र ८४३ मध्ये १२ कामे घेतली असून जास्तीत जास्त डिक्लेर स्लम भाग आहे. बजेट मध्ये या भागासाठी ५ टक्के विशेष तरतूद असते हा नागरी दलीत वस्तीसाठी निधी आलेला आहे. हे डिक्लेर स्लमसाठी नाही तसा जी. आर पण आहे. जेथे ६० ते ७० टक्के दलीत वस्ती आहे तेथे हा निधी खर्च करावा. घोषित झोपडपट्टीत करू नये.

श्री.त्र्यंबक तुपे : ठराव क्र.८४३ मध्ये वॉर्ड क्र.५७ भवानीनगर या माझ्या वॉर्डाचा समावेश करावा.

श्री.सलीम खॉन :विषय क्र १ इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देवू नये चर्चा न होता घाईगरबडीत सर्व प्रस्ताव मंजूर केले ते रद्य करावे.टाऊन हॉल ते बीबीका मकबरा रस्त्याचे दोन वर्षापासून काम करावे म्हणून मागणी करतो. बजेट मध्ये ठेवले जाते परंतू तो निधी इतर ठिकाणी वापरला जातो.

मा. महापौर : विषय क्र १ मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

दिनांक २०.०६.२००७ च्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र.८३५/९ मध्ये ज्या अधिकारी/ कर्मचारी यांचा कामावर असतांना अपघात झाल्यास त्यांना १००% देय वैद्यकीय परतावा देणेस, विषय क्र.८४०/७ मध्ये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना रू.६० कोटीच्या कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २.५% फिस देणे, तसेच सदर प्रस्तावात एन-११ मनपा दवाखाना ते यादवनगर व एन-११ स्मशानभूमी ते नवजीवन कॉलनी एस.पी.आय.पर्यंत ५० फुटी रस्ते आणि शिवराज कॉलनी ते चाणक्यपुरी १२० फुटी रस्त्याचा समावेश करणे, दिपाली हॉटेल ते जयभवानीनगर,जाधववाडी येथील ३६ मीटर डीपी रोडचा समावेश करणे, एम.जी.एम.ते बळीराम पाटील रस्त्याचा समावेश करणे तसेच विषय क्र.८४३/१० मध्ये दलित वस्ती सुधार योजनेतील मंजूर केलेल्या सर्व कामांना समान तरतूद ठेवणेस तसेच दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्राप्त निधी घोषित झोपडपट्ट्यामध्ये वापरू नये यात एकता नगर वार्ड क्र.४ व वॉर्ड क्र.५७ भवानीनगर चा समावेश करणे आणि विषय क्र.८५२/२ मध्ये रू.१.०० लक्ष अर्थसहाय्य ऐवजी अशा सर्व प्रकरणांत रू.२५ हजार अर्थसहाय्य द्यावे या दुरूस्त्यासह दिनांक ३०.०५.२००७ व दिनांक २०.०६.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ८७८/२ :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, या पुर्वी दिनांक २०/०६/२००७ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत विषय क्रमांक ७८२/२ अन्वये संबंधीत उत्कर्ष हौसींग सोसायटी,गट नंबर ५,नक्षत्रवाडी येथील ५०००.०० चौ.मी.जागा अतिरीक्त बुस्टर पंपासाठी संपादन करावयाचे व या व्यतिरिक्त संस्थेच्या मालकी हक्कात तथापी ना विकास क्षेत्रात असलेली अंदाजे ७९००.००चौ.मी.ताब्यात असलेली जागा ना विकास विभागातुन वगळून रहिवास वापरात समाविष्ट करणेचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावावर भूसंपादनाचा जमीन वापर बदलण्याचे दोन वेगवेगळे प्रस्ताव यावे,अशा सूचनेसह मा.सर्वसाधारण सभेने सदर प्रस्ताव स्थगित ठेवलेला आहे.

दरम्यानच्या कालावधीत कार्यकारी अभियंता (पा.पु) यांचा ''अस्तित्वातील जलवाहिनी PSC Gravity main ला तग धरत नाही, पाईप बस्ट होत आहेत अश्या स्थितीत वाढीव Velocity ला सदर पाईप तग धरणार नाहीत तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही अशा स्थितीत योजना पुर्ण होऊ शकत नाही त्यामुळे समांतर जलवाहीनीच्या अतिरीक्त बुस्टर पंपासाठी जागा लागणार नाही. '' असा अभिप्राय प्राप्त झाला असून त्यामुळे अतिरीक्त बुस्टर पंपासाठी उत्कर्ष गृह

निर्माण संस्थेची मंजूर विकास योजनेतील निवास भागातील सुमारे ५००० चौ.मी. जागा संपादन करण्याची आवश्यकता राहीलेली नाही.

या शिवाय सदर संस्थेने मा.उच्च न्यायालयात रिट पिटीश क्रमांक ७६३३/२००५ अन्वये याचिका दाखल केलेली होती. सदर दाव्यामध्ये दिनांक ०३/०७/२००७ रोजी मा.उच्च न्यायालयाने निकाल दिला असून यामध्ये महानगरपालिका औरंगाबादला सदर संस्थेस अकृषि परवानगीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे आणि सदर संस्थेने दाखल केलेल्या रेखांकन प्रस्तावास तात्पुरती (Tentetive) मान्यता देणे व तसा अहवाल मा.उच्च न्यायालयात आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून चार आठवड्याच्या आत सादर करणे बाबत आदेशित केले आहे.

उक्त नमुद प्रमाणे वस्तुस्थिती व मा.उच्च न्यायालयाचे आदेश इत्यादी बाबी लक्षात घेता प्रकरणी संस्थेस अकृषि परवानगीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे व संस्थेने दाखल केलेल्या रेखांकनास तात्पुरती (Tentetive) मान्यता देणे आवश्यक आहे.

सदर गृह निर्माण संस्थेने दाखल केलेले रेखाकंन हे मंजूर विकास योजनेच्या निवास भागातील जमीन वापरासाठी असल्याने आणि अतिरिक्त बुस्टर पंपाच्या भूसंपादनासाठी जागेची आवश्यकता नसल्याने दिनांक २९.०३.२००६ रोजी मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक ७८२/०२ चा प्रस्ताव परत घेणेसाठी प्रस्तावित करण्यांत येते,करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.विनायक पांडे : यात दोन एकत्रित प्रस्ताव करण्यात आले एकीकडे बुस्टरसाठी जागा मागणी करीत आहोत तर दूसरीकडे निवास वापरासाठीही देण्यात यावी असे म्हटले आहे. प्रशासनाचा सविस्तर खूलासा घेण्यात यावा.

श्री.अ.रशिद खॉन : यापूर्वी हा विषय आलेला होता. वेगवेगळे विषय ठेवावे म्हणून निर्णय घेतलेला होता. मा.उच्च न्यायालयाचे आदेश झालेले आहे. त्याचा आदर करून या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात अपील करावे.

श्री.रेणुकादास वैद्य : दोन वेगवेगळे विषय एकत्र आले ते वेगवेगळे करून आणावे म्हणून यापूर्वी सूचना दिल्या होत्या ७९०० चौ.मी चा जो प्लॉट आहे तो वेगळा विषय आहे तसेच ५००० चौ.मी. साठी जो प्लॉट आहे तो वेगळा झोन बदलायचा आहे. एक नगररचना विभागाचा विषय तर एक पाणीपूरवठा विभागाचा विषय आहे हे दोन्ही विषय वेगवेगळे करून सभागृहासमोर ठेवावे.

श्री.संजय जोशी : दोन्ही विषय एकत्र का सादर केले.बुस्टरच्या नावाखाली तसेच मा.कोर्टाच्या आदेशाच्या नावाखाली दुसरी जागा क्लिअर केली जाते हे लक्षात आले. यापूर्वी या शहराला लागणाऱ्या पाण्याच्या एका प्रोजेक्टसाठी जागेची गरज आहे म्हणून सांगण्यात आले.

मा. महापौर : यापूर्वी हा विषय सभागृहात सादर झालेला होता. स्थगिती दिली होती वेगवेगळे प्रस्ताव ठेवावे म्हणून सुचना दिल्या होत्या मध्यतंराच्या काळात यावर मा.उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे,म्हणून पून्हा हा विषय आलेला आहे. प्रशासनाकडून या संबधी खूलासा घेणार आहेत.

श्री.संजय जोशी : दोन्ही विषय एकत्र का सादर केले एवढाच खूलासा घ्यावा.पाण्याच्या नावाखाली एक जमीन क्लिअर करून घेत आहे.

श्री.भगवान घडमोडे : मा. न्यायालयाचे आदेश काय आहेत त्याचापण खूलासा घेण्यात यावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : जागा कूणाची याचा अगोदर खूलासा करावा.या विषयावर यापूर्वी चर्चा झाली होती व हे करायचे नाही असे ठरले होते. परत मा. उच्च न्यायालयाचे निमित्त करून प्रस्ताव पून्हा येत आहे त्यासाठी ती जमिन कोणाची,कशासाठी पाहिजे,जी जागा महानगरपालिकेकडून लोक घेतात तीच महानगरपालिकेला विकतात. जी जागा घेतलेली आहे ती रेग्यूलाईज करण्याचा हा प्रयत्न आहे असे वाटते. यात महापालिकेने लक्ष घालून अशी कोणतीही गोष्ट होवू देवू नये.

मा. महापौर : सहाय्यक संचालक, नगर रचना यांनी खूलासा करावा.

नगर रचना अधिकारी-१: यापूर्वी दोन प्रस्ताव एकत्र सादर करण्यात आले होते त्यानंतरच्या काळामध्ये जलवाहिनीसाठी या जागेची आवश्यकता नाही असा खूलासा प्राप्त झाल्यामूळे तसेंच मा.उच्च न्यायालयाचा निकाल अकृषि वापरासाठी एनओसी देण्यात यावी या दोन्ही कारणास्तव हा जो प्रस्ताव पूर्वी मांडण्यात आला होता तो रद्य करण्यासाठी सादर केलेला आहे. बुस्टर पंपासाठी प्रस्ताव यापूर्वी सादर केलेला होता. तो रद्य करण्यासाठी आता सादर केलेला आहे.

श्री.संजय जोशी : दोन प्रस्ताव एकत्र का आणले. हा प्रस्ताव रद्य करावा. या सभागृहात जागृत सदस्य असल्यामूळे व कोर्टाचा निकाल आल्यामूळे. दोन प्रस्ताव एकत्र का आले याचा खूलासा घेण्यात यावा.

मा. महापौर : मागिल बैठकीत हा प्रस्ताव आलेला होता. दोन्ही वेगवेगळे प्रस्ताव सादर करण्याचे आदेशीत केले होते. मा. उच्च न्यायालयाचे निर्णय काय आहे प्रशासनाने काय उत्तर दिलेले होते याची माहिती घेत आहोत.

श्री.रेणुकादास वैद्य : प्रशासन मा. उच्च न्यायालयाचे कारण दाखवून सभागृहाला धमकावते काय. मा. सर्वोच्च न्यायालयात का दाद मागीतली जात नाही.

श्री.संजय जोशी : ही जागा आरक्षणात बाधीत आहे का?

नगररचना अधिकारी-१ : उत्कर्ष हौसींग सोसायटीमधील पूर्ण जागेतील ५००० चौ.मी. जागा निवासी वापरातील असून ७९०० चौ. मी. जागा ही ना विकास (नो डेव्हलपमेन्ट झोन) मधील आहे.

मा. महापौर : उत्कर्ष हौसींग सोसायटीची जागा ही एलओ झोन मध्ये काही नों डेव्हलपमेंन्ट झोन मध्ये आहे. महापालिकेची ६७ कोटीच्या योजनेसाठी बुस्टर पंपसाठी जवळपास ५० हजार चौ. फुट जागा घ्यावी असा प्रस्ताव किंवा आरक्षण ठेवले होते. ६७ कोटीची योजना झाली नाही म्हणून या जागेची गरज नाही असा खूलासा सहा. संचालक यांचेकडे आलेला आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : जागा कूणाची आहे त्या गृह निर्माण संस्थेचे चेअरमन कोण आहे.

नगररचना अधि. -१ : श्री. भागवत बाबुराव शिंदे हे या जागेचे चेअरमन आहे.

श्री.संजय जोशी : ५००० चौ. मी. जागा निवासी वापरासाठी आहे. बाकीची नो डेव्हलपमेट झोन मधील आहे. काही दिवसानी मा.कोर्टाचे आदेश दाखवून डेव्हलपमेंन्ट झोन होईल. ते होणार नाही याची काळजी घ्यावी.

मा. महापौर : संबधीत विभागाने नोंद घ्यावी की नो डेव्हलपमेन्ट झोन विकसीत करू नये.

श्री.भगवान घडमोडे : मा. न्यायालयाचे निर्णय काय आहे. तसेच भविष्यात या जागेची गरज पडणार आहे की नाही आज जागा परत देणार पून्हा त्या ठिकाणी निवासी घरे होणार गरज पडल्यानंतर ते पाडू शकणार नाही.

कार्य. अभियंता(पापू) : सन १९९७-९८ साली ६७.३ कोटीच्या पाणीपूरवठयाची मान्य झालेली योजनेच्या बुस्टरसाठी या जागेची आवश्यकता होती.७०० मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीवर जो अस्तित्वातील नक्षत्रवाडीला बुस्टर आहे त्यांचे बाजूला ही जागा घेणे आवश्यक होते म्हणून५००० चौ.मी.जागेचे भुसंपादन करण्यासाठी नगररचना विभागास कळविण्यात आले होते. या विभागाने कार्यवाही प्रस्तावित केली. दरम्यानच्या काळात ६७.३ कोटीची योजना काही तांत्रिक कारणामूळे होवू शकली नाही आणि आता ती होणे शक्य नाही असे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून चर्चेअंती निष्पन्न झाल्यामूळे आता या ५००० चौ.मी.जागेची बुस्टरसाठी आवश्यकता नाही तसे नगररचना विभागास कळविण्यात आले आहे. म्हणून हा प्रस्ताव ठेवलेला आहे.

श्री.भगवान घडमोडे : सध्याची जी पाणीपूरवठा योजना आहे ती पूरेशी आहे का भविष्यात या पाणीपूरवठयाची लाईन टाकण्यास या जागेची गरज पडणार आहे की नाही.२५ किंवा ३० वर्ष याच योजनेद्वारे पाणी शहराला पूरवठा पुरेसा राहील का . या शहरात आजची परीस्थिती अशी की २५ ते ३० टक्के भागात पाणी देवू शकत नाही.

श्री.रविकांत गवळी : समांतर जलवाहिनी करणार आहोत की नाही.

श्री.रेणूकादास वैद्य : भविष्यात ६७ कोटीची योजना पूर्ण नाही. समांतर जलवाहीनी टाकण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यावेळी बुस्टरची गरज पडणार की नाही याचाही खूलासा कार्यकारी अभियंता यांचेकडून घेण्यात यावा.

कार्य.अभियंता : समांतर जलवाहिनी जी प्रस्तावित केली आहे त्यासाठी नक्षत्रवाडी येथील प्रस्तावित जागा लागणार नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : समांतर जलवाहिनी झाल्यानंतर जी अस्तीत्वात असलेली जलवाहिनी आहे तीचा काहीही विकास करणार नाही का ?

कार्य. अभियंता(पापू.) : समांतर जलवाहिनीच्या प्रस्तावामध्ये या जागेची आवश्यकता नाही कारण या जागेच्या वरच्या बाजूलाच मास्टर बॅलेंन्स रीझरवायर आहे. एक्झीटींग लाईनसाठी ही जागा लागणार नाही तेथे महापालिकेचे बूस्टर आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : एक्झीटींग लाईन साठी जागा लागणारच नव्हती तर कशासाठी आरक्षीत ठेवली होती.

कार्य.अभियंता(पापू.) : ६७ कोटीच्या योजनेकरीता १४०० मी.मी व्यासाच्या लाईन करीत ही जागा प्रस्तावित केली होती.

श्री.संजय सिरसाट : मूळातच ही जागा जो संबधीत मालक आहे यांनी ५ वर्षापूर्वी लेआऊटसाठी दाखल केले होते त्या जागेवर आरक्षण नाही. नूसते बुस्टर करणार म्हणून म्हटले होते. त्या व्यक्तीने माझी जागेचा लेआऊट मंजूर करावा नसता जागा भूसंपादीत करावी म्हणून मागणी केली होती. महापालिकेने त्या व्यक्तीला उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर सदर व्यक्ती मा.न्यायालयात दाद मागण्यासाठी गेले असता

मा.न्यायालयाने असे आदेशीत केले की लेआऊठला मंजूरी दयावी नसता ही जागा भूसंपादीत करावी. तरीही महापालिकेने कार्यवाही केली नाही त्यामूळे संबधीत व्यक्ती पून्हा न्यायालयात दाद मागण्यासाठी गेले. मा.न्यायालयाने महापालिकेवर कन्टेम ऑफ कोर्टची कार्यवाही केली.त्यानंतर त्या व्यक्तीला काही दिवसाची मूदत दिली व आता प्रशासनाला असे जाणवले की या जागेची आता बुस्टरसाठी गरज नाही. जेंव्हा वाटेल तेंव्हा आरक्षित काही वाटले नाही तर नाही. दिड दोन महिन्यात मा.उच्च न्यायालयात उत्तर द्यायचे आहे. आज त्या जागेची गरज वाटत नाही परंतू भविष्यात जलवाहिनी टाकण्याचे जे ६७ कोटीचे प्लॅनींग केले होते, त्यावेळी गरज वाटत होती. गरज पडली तर ती जागा जरूरी असेल तर घेण्यात यावी नसता लेआऊट मंजूर करावा. पाणीपूरवठयाच्या कामासाठी जरी त्या जागेची गरज पडली नाही तरी भविष्यात त्या जागेवर उद्यान किंवा इतर कामासाठी ती जागा उपयोगात येवू शकते का, याचा विचार करावा. ताबडतोब ती जागा भूसंपादनाची कार्यवाही करावी.

श्री.संजय जोशी : रिट पिटीशन क्र ७६३३/२००५ होते. त्याचा निकाल दिं. ३.७.२००७ लागला. त्यावेळी महापालिकेचे वकील कोण होते. संबधीत मालकाने पूर्ण जमिनीचा लेआऊट मंजूर करून दयावे अशी मागणी केली होती.ती जागा नो डेव्हलपमेंन्ट झोन मध्ये डी. पी प्लॅन मध्ये डिक्लेर आहे. आपले वकील तेथे हजर नव्हते. संबधीत मालकाची आपल्या वकीलाने साटेलोटे करून गैरहजर राहिले व जमिन मालकास जसा पाहिजे तसा निर्णय घेतला. मा.न्यायालयाचे आदेश काय आहेत ते सभागृहात विशद करावे.

विधी सल्लागार :सदर प्रकरणात विजय शर्मा हे महापालिकेचे वकील होते. ते त्या दिवशी हजरही होते. पीटीशनरचे असे म्हणणे होते की टेन्टेन्टीव्ह लेआऊट मंजूर करून दयावा. तो मंजूर केल्याशिवाय त्यांना मा.जिल्हाधिकारी यांचेकडून एन.ए.चे प्रमाणपत्र मिळत नव्हते. हा त्यांचा दावा होता.मा. न्यायालयाने जे आदेश दिले ते खालील प्रमाणे आहे.

1. The respondent No.2- Municipal Corporation, Aurangabad and respondent No.3- Assistant Director, Town planning. Municipal Corporation, Aurangabad are directed to issue "No objection Certificate" to the petitioner for the purposes of claiming N.A. permission from Collectorate, Aurangabad.

श्री.संजय जोशी : जेंव्हा मा.न्यायालयाने हे आदेशीत केले तेंव्हा या जागेवर लेआऊटला मंजूरी देवू शकत नाही ही बाजू आपल्या वकीलाने मा.कोर्टासमोर मांडलीच नाही. नो डेव्हलपमेंन्ट झोन आहे बीड बायपास पूर्ण नो डेव्हलपमेंट झोन आहे कूणी त्याठिकाणी मंजूरी घेण्यासाठी कूणी मा.न्यायालयात दाद मागीतली तर लेआऊटला मंजूरी देवू शकतो का?

मा. महापौर : त्या ठिकाणी दोन प्रकारच्या जागा आहे एक एलओ झोन व दुसरी नो डेव्हलपमेंन्ट झोन लेआऊट पूर्ण जागेला दयायला की फक्त एलओ झोनमधील जागेला दयायचा.

श्री.संजय जोशी : ७९०० चौ.मी. जागा ही नो डेव्हलपमेंन्ट झोनमध्ये असून ५००० चौ.मी.जमिन ही निवासी वापरासाठी डेव्हलपमेंन्ट झोन आहे. मा.कोर्टाचे आदेश असे पाहीजे होते की, फक्त ५००० चौ.मी.जागेला लेआऊट मंजूर करावा.

मा. महापौर : नों डेव्हलपमेंन्ट झोन मधील जागेचा लेआऊट मंजूर करता येणार नाही. ५००० चौ.मी. जागेतच लेआऊट मंजूर करायचा आहे.

श्री.संजय सिरसाट : मा.न्यायालयाने ५००० चौ.मी.जागा घ्यायची असेल तर मोबदला दयावा नसता लेआऊटला मंजूरी दयावी असे म्हटले आहे.

श्री.संजय जोशी : वकीलांना काहीच माहित नसते. नगररचना विभागाच्या कोणत्या अधिकाऱ्यानी माहिती वकीलापर्यत दिलेली होती. खूलासा करावा.

श्री.रेणुकादास वैद्य : मा.न्यायालयाचा जो निर्णय झालेला आहे तो फक्त मा.जिल्हाधिकारी यांचेकडून एन अे घेण्यासाठी एनओसी देण्यापूरता झाला असे माझे मत आहे.

विधी सल्लागार : सदर प्रकरणात मा. न्यायालयाने एन अे साठी एनओसी देण्यासाठी आदेशीत केले आहे. जागा घ्यावी किंवा नाही याबध्दल मा. न्यायालयाने काहीही निर्देशीत केलेले नाही.

मा. महापौर : नो डेव्हलपमेंन्ट झोन मधील जागेला तसेच ठेवायचे म्हटले आहे की फक्त डेव्हलपमेंन्ट झोनलाच एन ए साठी एनओसी देण्यासाठी परवानगी दिलेली आहे काय याचा खूलासा करावा.

श्री.रेणुकादास वैद्य : एलओ झोन तसेच नोंडेव्हलपमेंन्ट झोन तेथे आहे हे मा. न्यायालया समोर महापालिकेच्या वकीलाने मांडण्याची गरज होती.

श्री.संजय जोशी : महापालिकेच्या वकीलाला कोणत्या अधिकाऱ्याने ब्रिप केले होते.

नगररचना अधिकारी-१ : निवासी वापरासाठी जी जागा आहे त्याचीच एनए एनओसी देणार आहेत. ना विकास साठी नाही.

श्री.संजय जोशी :मा. न्यायालयाच्या आदेशाचा अर्थ असा होतो की सर्वच्या सर्व जमिनीला एनए साठी एनओसी दयावी असा होतो.

श्री.अ.साजेद अ. सत्तार : मा. न्यायालयाने नो डेव्हपमेंन्ट झोन मधिल जागेला एन ए ला एनओसी दयावी असे कूठे ही म्हटलेले नाही.जर म्हटले असले तरी क्लेरीफिकेशन करता येते. जी जागा नो डेव्हलपमेंन्ट झोन मध्ये येते त्यास मा. जिल्हाधिकारीही एन ए ला मंजूरी देत नाही. महानगरपालिकेचे अधिकारीही नो डेव्हलपमेंन्ट झोन मधील जागेला एनए एनओसी देवू शकत नाही.

श्री.भगवान घडमोडे : मा. न्यायालयाच्या आदेशाची प्रत संचिकेला लावली जाईल व त्या अधारे नो डेव्हलपमेंन्टझोनचे डेव्हलपमेंन्ट झोन मध्ये केले जाईल.सदर संचिकेवर आताच शेरा देवून ठेवला पाहिजे.

उप आयुक्त (प्र.) : मा.न्यायालयाने या प्रकरणात महापालिका तसेच मा.जिल्हाधिकारी यांना चार प्रकारचे वेगवेगळे आदेश दिले आहे. To issue the "No objection Certificate" N.A. एन.ए चे ना हरकत प्रमाण पत्र देण्यात यावे. २.to grant sanction tentatively to the layout plan submitted by petitioner concerning the land Block No.5 of village Nakshatrawadi, Aurangabad. याचा अर्थ

नक्षत्रवाडी येथील ब्लॉक नंबर ५ च्या बाजूची जमिनीचा टेन्टेटियूव लेआऊट मान्य करावा. ५००० चौ.मी. एरीया आहे महानगरपालिकेने जे ॲफिडेव्हिट दाखल केल होते त्यात हे नमूद केले होते. चार आठवडयात महानगरपालिकेने कार्यवाही करावी व एन ए ची रिशिफ्ट मिळाल्यानंतर मा.जिल्हाधिकारी यांनी त्यांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे. 6.The Municipal Corporation,Aurangabad shall pay costs of Rs.Five Thousand to petitioner. त्यांनी वेळोवेळी अर्ज दाखल करूनही दिलेले नाही असे म्हटले आहे.

श्री.संजय सिरसाट : त्या जमिन मालकाचे असे म्हणणे होते की माझ्या मालकीची जागा आहे ती जागा महापालिकेने संपादीत करावी मला मोबदला दयावा नसता लेआऊटला मंजूरी दयावी. मा.उच्च न्यायालयाने असे आदेश दिले की एक तर जागा भूसंपादीत करावी नसता लेआऊटला मंजूरी दयावी. मा.न्यायालयाने कन्टेमची कार्यवाही केली दोन महिण्याचा वेळ दिलेला असावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : सदर व्यक्ती हे जागेचे लेआऊट मंजूर करावे ते केल्यानंतर एनओसी मिळेल म्हणून न्यायालयात गेलेले होते जागा भूसंपादीत करावी म्हणून गेलेले नव्हते. एनओसी दयायची की नाही हाच प्रश्न आहे.

श्री.संजय सिरसाट : पीटीशनरची मागणी काय होती सभागृहात खूलासा घ्यावा.

श्री.संजय जोशी : परत मा.न्यायालयासमोर जावे. महापालिकेच्या वकीलाने मा.न्यायालयास असे मत मांडायला पाहिजे की ५००० चौ.मी. जागेसाठीच एनओसी देय आहे ७९०० चौ.मी. जागा नो डेव्हलपमेंन्ट झोन मध्ये येते. त्याची एनओसी देय नाही.

मा. महापौर : सर्व जमिनीसाठी निर्णय नाही. परत मा.उच्च न्यायालयात यासाठी महापालिकेच्या वतीने मत मांडता येईल का ?

श्री.संजय जोशी : मा.न्यायालयाने सर्व जागेसाठी आदेशीत केलेले आहे. नो डेव्हलपमेंन्ट झोन मधील जागेला एनओसी देय होत नाही. असे मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणून दयावे. यापूढे मा.कोर्टाचा आदेश आहे म्हणून तो लेआऊट आपले अधिकारी मंजूर करून टाकतील.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : लेआऊट मंजूरीसाठी मा.कोर्टाचे आदेश नाही. फक्त एनए चे एनओसीसाठी आदेश आहे.

विधी सल्लागार :या प्रकरणामध्ये जे महापालिकेने ॲफिडेव्हिट दाखल केले होते. त्यात महापालिकेने मा.न्यायालयास असे सांगितले की ५००० चौ. मी. जागा ही बुस्टरसाठी पाहिजे होती. ६७ कोटीच्या योजनेसाठी ही जागा घेणार होतो. ती जागा घेतली नाही व पूढे या योजनेची कार्यवाही झाली नाही. हे मा. न्यायालयाच्या निदर्शनास आले म्हणून त्यामूळे त्यांचा जो हक्क आहे की टेन्टेटयूव लेआऊट मान्य करायला पाहिजे त्या संदर्भातच मा. न्यायालयाने म्हटले की टेन्टेटयूव्ह लेआऊट मंजूर करावा त्यासाठी चार आठवडयाचा कालावधी दिला. जे आदेश मा. न्यायालयाने दिले त्यात क्षेत्रफळ दिलेले नाही. सदर प्रकरणात सिव्हील अप्लीकेशन महापालिका करू शकते. ७९०० चौ.मी.क्षेत्रासाठी क्लेरीफिकेशन मागणीसाठी अप्लीकेशन करून मा. न्यायालयासमोर म्हणणे मांडू एनओसी

कूठल्या भागाला दयायची कोणत्या भागाला नाही दयायची. याची मागणी करू शकतो.

श्री.संजय जोशी : ५००० चौ. मी. जागेलाच एनओसी देता येते उर्वरीत ७९०० चौ. मी. जागेला एनओसी देता येत नाही हे नगररचना अधिकारी यांनी वकीलास ब्रीफ करायला पाहिजे.

मा. महापौर : या प्रकरणात साधारणत: ५००० चौ. मी. तसेच ७९०० चौ. मी. अशा जमिनी आहेत. मा.उच्च न्यायालयाचा निर्णय आहे की त्यांना एनओसी दयावी टेन्टेटयूव लेआऊट मंजूर करावा यात विकसीत आणि ना विकसीत अशा दोन्ही जमिनीचा आहेत. त्यासाठी महानगरपालिकेने परत मा.उच्च न्यायालयास विनंती करावी जी ना विकास भागात जमिन आहे त्यावर कोणत्याही प्रकारचे डेव्हलपमेंट न करता नो डेव्हलपमेंन्ट झोन आहे ती जमिन तशीच ठेवावी. तसा विनंती अर्ज मा. उच्च न्यायालयात करण्यात यावा.

श्री.संतोष खेंडके : मा.उच्च न्यायालयाकडे विनंती अर्ज करावा किंवा या निर्णयाच्या अधिन राहून मा.सर्वोच्च न्यायालयात सूध्दा अपील करता येईल.

श्री.हिम्मतराव दाभाडे : मा.उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहे पुन्हा विनंती अर्ज कोणत्या कायदयानूसार करता येतो.विनंती अर्ज केल्यानंतर तो मंजूर होणार का ?

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : रिव्ह्युव अर्ज करता येतो. जर रद्य झाल्यानंतर करता येत नाही.

मा.महापौर : निर्णय झाल्यानंतर परत जाता येते का?

विधी सल्लागार : मा. उच्च न्यायालयाकडे विनंती अर्ज करता येईल.विनंती अर्ज केल्यानंतर तो मंजूर करायचा की नाही हा मा. न्यायालयाचा अधिकार आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : जेंव्हा मा. न्यायालयात हे प्रकरण चालू होते विधी सल्लागार यांनी या प्रकरणात जातीने लक्ष दयायला पाहिजे होते ते दिले नाही.

मा. महापौर : या विषयावर बरीच चर्चा झालेली आहे. विधी सल्लागार यांचे मत आहे की मा.न्यायालयासमोर परत अर्ज करू शकतो त्यामध्ये त्यांनी डेव्हलपमेंन्ट झोन व नो डेव्हलपमेंन्ट झोन निश्चित करण्याची गरज आहे. नो डेव्हलपमेंन्ट झोन नियमाप्रमाणे विकसीत करता येत नाही हे मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणून द्यावे. मा.न्यायालयात तसा अर्ज दाखल करावा.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाच्या संदर्भात सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे, मा.उच्च न्यायालयात विनंती अर्ज करता येत असल्याने मा.उच्च न्यायालयासमोर विनंती अर्ज करून गट नं.५ नक्षत्रवाडी पैकी, उत्कर्ष गृह निर्माण संस्थेची सुमारे ५०००/- चौ.मी. जागा निवास भागात असून सुमारे ७९०० चौ.मी. जागा नो डेव्हलपमेंन्ट झोनमध्ये असून, नो डेव्हलपमेंन्ट झोनमध्ये विकास परवानगी देय होत नाही. हे मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देणे व मा.उच्च न्यायालयात तसा विनंती अर्ज दाखल करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## स.सदस्यांचे प्रस्ताव

**विषय क्र. ८७९/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या अस्थापनेवर सद्यस्थितीतील ४ पदे उप आयुक्त संवर्गात मंजूर आहे. या पैकी ३ पदे रिक्त आहेत. ही पदे मनपा अस्थापनेतून भरावयाची आहेत.सदर रिक्तपद वार्ड अधिकारी(तत्कालीन विभागीय अधिकारी संवर्ग)मधुनसेवाभरती नियमाचे अधिन राहुन ज्येष्ठतेने भरण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.पद भरण्याची कार्यवाही पुर्ण होईल पर्यंत सदर संवर्गातील ज्येष्ठ अधिकाऱ्यास सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील

अनुमोदक : श्री.सतिष कटकटे, श्री.रविकांत गवळी, श्री.बाबासाहेब डांगे,श्री.विजय खुडे, श्री.पुरूषोत्तम ठाकुर,सौ.कला सुरेश बोरामणीकर

**चर्चा :**

श्री.अ.रशिद खॉन : तीन उपआयुक्तांची पदे रिक्त आहे. महापालिकेच्या वार्ड कार्यालयात वर्ग -१ मध्ये येणारे अधिकारी आहे त्यांच्या मुलाखतीही घेतलेल्या आहे. बाहेरील शासनाचे अधिकारी आल्यास महापालिकेच्या वर्ग-१ सवंर्गात येणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांचे कन्ट्रोल मध्ये काम करावे लागेल श्री.जरारे, श्री.जावरे यांनी मुलाखत दिलेली आहे. कुणावर अन्याय होणार नाही याची दखल घेण्यात यावी.वर्ग -१ मध्ये येणाऱ्याचा उल्लेख करावयास पाहिजे.

श्री.भगवान घडमोडे : महानगरपालिकेमध्ये उपआयुक्तांची ०४ पदे, तीन उपआयुक्तांची पदे रिक्त असून हा प्रस्ताव प्रशासकीय यायला पाहिजे. प्रशासनाचे या प्रस्तावाविषयी मत जाणून घ्यावे. या पदाची आवश्यकता आहे का खूलासा घेण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : ही प्रशासकीय बाब असून प्रशासनाचा ठराव यायला पाहिजे त्यावर चर्चा करून योग्य तो निर्णय घेता येईल.

श्री. काशिनाथ कोकाटे : कोणतेही पद रिक्त झाल्यानंतर तीन महिण्याच्या आत ते भरणे आवश्यक असते परंतू अनेक दिवसापासून अनेक पदे रिक्त आहेत.प्रशासन ते भरती करण्याची कार्यवाही करीत नाही. अनेक विकास कामे करून घ्याची आहे अधिकारी नाही म्हणून ती होत नाही प्रशासन गाढ झोपलेले असावे. म्हणून लोकप्रतिनिधीने प्रशासनाला लक्षात यावे म्हणून कदाचित हा प्रस्ताव ठेवला असेल. ही पदे रिक्त आहे का सेवा भरती नियमास मंजुरी झालेली आहे. कोणते अधिकारी कुठल्या कॅडरमध्ये काम द्यायचे हे प्रशासनाकडून सविस्तर माहिती घेतल्यानंतरच त्यावर अभ्यास व्हावा, नंतर चर्चा करावी.

श्री.संजय जगताप : जेष्ठतेप्रमाणे जे अधिकारी या पदासाठी पात्र असतील त्याचा विचार होणे आवश्यक असून प्रशासनाच्या वतीने प्रस्ताव यावा व मागावर्गीयावर अन्याय होणार नाही याची दखल घ्यावी. ११२४ नोकर भरती प्रकरणात १० कर्मचारी बडतर्फ केले त्यात सर्व कर्मचारी हे मागासवर्गीय आहे.त्या कर्मचाऱ्याचा काहीही दोष नाही ज्या अधिकाऱ्यानी त्यांची नियूक्ती केली त्यांचेवर कार्यवाही व्हावी.त्या कर्मचाऱ्यांना कामावर घेण्यात यावे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : अशासकीय प्रस्ताव आला प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले की या पदाच्या जागा रिक्त आहे. महापालिकेत अनेक नॉन टेक्नीकल कर्मचाऱ्याकडे वेगवेगळया पदाचा प्रभारी पदभार दिलेला आहे. अतांत्रिक बरेच अधिकारी इंचार्ज आहेत. वेगवेगळे विभाग आहेत. ज्यांचा संबंध येत नाही, अशांकडे पदभार दिलेले आहे. असे होवू नये. अधिकाऱ्यांनी सदस्यांना सांगावे व सदस्यांनी प्रस्ताव आणावा, नगरसेवकांच्या माध्यमातून प्रस्ताव आणलेला आहे. रिक्त जागा असतील नियमानूसार जे पद शासनाकडून भरायचे आहे ते शासनाकडून मागवावे. प्रमोशनची जागा असेल तर नियमाने आरक्षण करावे.जेष्ठता यादी तयार करावी ज्यांचे काम चांगले आहे ११२४ नोकर भरती प्रकरणासारखे इतर प्रकरणात गुंतलेले नाही किंवा त्यांचेवर चार्ज नाही, त्यांचा विचार करावा.

श्री.वसंत नरवडे : महापालिकेच्या ज्या ही अधिकाऱ्याना प्रमोशन दिले असेल त्यांचेसाठी नियमावलीनूसार या जागा भरता येतात का? नियमावलीत काय तरतूद आहे याचा खूलासा घेण्यात यावा. तरतूद असेल तर दोन महानगरपालिकेतून भरती करण्यात यावे.दोन शासनाकडील अधिकारी असावे जेणेकरून महापालिकेच्या कामकाजावर नियत्रंण राहील. माझ्या माहितीप्रमाणे नियमावलीमध्ये तसा उल्लेख नाही. नियमात जे बसते त्यानुसार काम करावे.

श्री.कचरू मोरे : या महापालिकेत वर्ग -१ मध्ये काम करणारे काही अधिकारी आहेत जेष्ठ असून गुणवंत पुरस्कार सूध्दा घेतलेला आहे. सेवाभरती नियमाच्या अधिन राहून किंवा गुणवत्ता पुरस्कार प्राप्त अधिकाऱ्यांची उपआयुक्त पदावर भरती करावी लिपीक असलेले कर्मचारी वार्ड अधिकारी झाले. वार्ड अधिकाऱ्यामधून उपआयुक्त पदावर नियुक्ती केल्यास जे वर्ग -१ मध्ये काम करणारे अधिकारी यांना लिपीका मधून झालेल्या अधिकाऱ्याच्या हाताखाली काम करावे लागेल. हा प्रशासकीय ठराव यावा वर्ग-१ च्या अधिकाऱ्यावर अन्याय होवू नये.

श्री.कैलास गायकवाड : या पदावर शैक्षणिक पात्रता बघुत नियूक्ती करावी. तसेच वर्ग -१ मध्ये चांगले काम करणारे अधिकारी असेल ते प्रथम बघावे, त्यांची नियूक्ती प्राधान्याने करावी. तसेच ज्या अधिकाऱ्याना शासनाचे चांगले काम केल्याचे पुरस्कार मिळालेले असतील ज्यांना अगाऊ वेतनवाढ मिळालेली असतील या सर्व बाबतीचा विचार करून सत्यता बघून हे पद भरण्यात यावे.

श्री.संतोष खेंडके : हा प्रस्ताव मीच ठेवलेला आहे. सदस्यांचा गैरसमज झालेला दिसतो. दोन ते चार महिण्यापासून एकच उपआयुक्त काम करीत आहे. तीन उपआयुक्ताची पदे रिक्त आहे त्या अनुशंगाने हा ठराव ठेवलेला होता.सेवा भरती नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजूरी दयावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे : यात उल्लेख केला आहे की, ज्येष्ठतेने भरती करण्यांत येणार आहे. महापालिकेत अनेक ज्येष्ठतेचे लोक आहे, त्यांना भरती करणार आहात की, बाहेरून घेणार आहात. जर बाहेरून घ्यायचे असेल, तर महापालिकेत असलेल्या ज्येष्ठ अधिकाऱ्यांना घेतले जात नाही, त्यांचेवर अन्याय केला जातो, त्या अधिकाऱ्यांना उपआयुक्त पदावर का घेण्यात येवू नये.

श्री.संजय जगताप : दोन उपआयुक्त कोण आले, सभागृहाला माहित नाही. सभागृहाला माहिती द्यावी.

मा.महापौर : रूजू करून घेण्यासाठी ६ महिन्यात ठराव यायला पाहीजे तो येईल.

सौ.मेहरून्नीसा खान : दोन उपआयुक्त पदावर बाहेरील शासनाचे व दोन उपआयुक्त पदावर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यामधून पात्रतेनूसार नियुक्त करावे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : कार्यमूक्त करायला परवानगी लागते. रूजू होण्यासाठी परवानगी लागत नाही का.

मा.महापौर : प्रस्ताव येईल.

श्री.भाऊसाहेब ताठे :दोन उपआयुक्त शासनाकडून उपलब्ध झालेले आहे. दोन मागवून घ्यावे,एक पद रिक्त आहे त्यावरही शासनाचे अधिकारी मागविण्यात यावे. भांडणे होणार नाही.

मा. महापौर : या संदर्भात प्रशासनाने खूलासा करावा.

उपआयुक्त (प्र.) : महापालिकेत कर मुल्य निर्धारक व संकलक या सह तीन उपआयुक्त पदे असून या चार पदाची वेतनश्रेणी सारखीच आहे. उपआयुक्त महसूल म्हणून कालच श्री.घुगे हे रूजू झाले.त्यांनी त्यांचा परीचय सभागृहाला दयावा.

उपआयुक्त(म.) : मी उध्द्वव घुगे उपजिल्हाधिकारी म्हणून कार्यरत होतो. काल दुपारी ५.३०वा महापालिका औरंगाबाद येथे उपआयुक्त (म.)या पदावर रूजू झालेलो आहे. महसूल खात्यात १९९४ मध्ये तहसीलदार म्हणून रूजू झालो. पाच वर्ष तहसीलदार,उद्गीर ,१९९९उपजिल्हाधिकारी या पदावर पदोन्नती,१९९९ ते २००० पर्यत एक वर्ष उपजिल्हाधिकारी रो.ह.यो. नांदेड,तीन वर्ष एसडीएम म्हणून भूम ,तीन वर्ष जिल्हा पूरवठा अधिकारी हिंगोली , चार महिने एसडीएम म्हणून वैजापूर,चार महिने विशेष भुसंपादन अधिकारी औरंगाबाद येथे काम केले त्यानंतर काल या महानगरपालिकेत उपआयुक्त(म.)म्हणून रूजू झालो आहे.

उपआयुक्त(सिडको) : मी सोमनाथ शेट्ये सन १९८९ मध्ये महाराष्ट्र लोक सेवा आयोग मार्फत माझी मुख्याधिकारी म्हणून नेमणूक झालेली आहे. बुलढाणा जिल्हा,नगरपालिका, श्रीरामपूर नगरपालिका, संगमनेर नगरपालिका ,जालना नगरपालिका इचलकरंजी नगरपालिका येथे काम केलेले आहे. १२ एप्रिल २००७ रोजी माझी वर्ग -१ मध्ये पदोन्नती झालेली आहे. ७ जुलै २००७ पासून शासनाने माझी नवीन सिडकोसाठी निर्माण केलेले उपआयुक्त पदावर नियुक्ती केलेली असून त्यानूसार १२ जुलै २००७ रोजी या औरंगाबाद महापालिकेत रूजू झालो आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :दोन्ही अधिकाऱ्याचा कार्यकाळ चांगला जावा. सिडकोसाठी जे अधिकारी नियुक्त केले, त्यांनी सिडकोसाठी चांगले काम करावे एवढीच अपेक्षा करतो.

श्री.मिलींद दाभाडे : शैक्षणिक पात्रतेचा विचार तसेच महानगरपालिकेत चांगले काम केलेल्या अधिकाऱ्याची या पदावर नियुक्ती करावी.

मा. महापौर : महापालिकेत एकूण चार उपआयुक्त पदाच्या जागा आहेत त्यापैकी उपआयुक्त प्र. म्हणून महानगरपालिकेत श्री.कांबळे साहेब कार्यरत असून शासनाकडून नूकतेच दोन उपआयुक्त म्हणून अधिकाऱ्याची नियुक्ती झालेली आहे. आता एक पद रिक्त आहे ते पद भरतांना सभागृहांच्या भावना लक्षात घेता ५० टक्के बाहेरील व ५० टक्के महानगरपालिकेच्या सेवेतील घ्यावे म्हणून

त्यासाठी पण काही नियम आहेत. सर्व नियम विचारात घेवून महानगरपालिका सेवा भरती नियम विचारात घेवून या बाबतीत प्रशासनानेच निर्णय घ्यावा. तसा प्रशासकीय ठराव येईल महानगरपालिकेचे जे अधिकारी चांगले काम करतात त्यांची लेखी, तोंडी मुलाखत घ्यावी लागेल ती प्रोसेस प्रशासनाने करावी. ज्यांचे गोपनीय अहवाल चांगले आहे. त्यांचे बाबतीत कोणतीही चौकशी चालू नाही,सर्व नियम पाहूनच प्रशासनाने हे पद भरावे.

श्री.भगवान घडमोडे : सद्या अधिवेशन चालू आहे. त्यात आपले महानगरपालिकेचेच विषय आहेत. नियमाचे काटेकोरपणे पालन करून योग्य ती सुधारणा करावी.

श्री.सलिम खान : प्रत्येक समाजाचा विचार करावा.

श्री.अ.रशिद खॉन मामू : अल्पसंख्याकांमधून भरण्यात यावे.

श्रीमती जयश्री किवळेकर : महापालिकेची जेष्ठता यादी विचारात घेता तसेच शासन नियमानूसार यात चांगले काम करणारे महिला अधिकारी यात बसत असतील तर त्यांचाही विचार करावा.

मा. महापौर : या सूचनेची प्रशासनाने दखल घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महानगरपालिकेतील उपआयुक्तांची मंजूर पदे वार्ड अधिकारी संवर्गातून सेवा भरती नियमाच्या अधिन राहून भरण्यात यावे व तोपर्यंत वार्ड अधिकारी यांचे संवर्गातून ज्येष्ठते प्रमाणे सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात यावा,सदरील ठराव मंजूर करण्यांत येतो. तसेच यासंदर्भात झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेने सेवाभरती नियम विचारात घेवून प्रशासनाने तसा प्रशासकीय प्रस्ताव ठेवण्यास तसेच ज्याचे गोपनिय अहवाल चांगले आहेत व त्यांच्या विरूध्द कोणतीही चौकशी चालू नाही, याचा विचार करूनच पद भरण्याची कार्यवाही करण्यास तसेच महिला अधिकारी यात बसत असेल तर, त्याचाही विचार करण्याची प्रशासनाने दखल घेण्यासह मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

(याच वेळी पिठासीन अधिकारी म्हणून स.सदस्य श्री.संतोष खेंडके स्थानापन्न होतात. वेळ दु. १.५५ वा.)

मा.पिठासीन अधिकारी : विषय क्र .४,५,६ मंजूर.

**विषय क्र. ८८०/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.२५ आयोध्यानगर येथील खालील कामांचे लेखाशिर्षक बदलण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१. | अर्थसंकल्प २००७-२००८ पृष्ठ क्र.डब्ल्यु २३० वरील अनुक्रमांक ५ वर प्रभाग क्र.२५ अयोध्यानगर अंतर्गत एन ७ इंदीरा गांधी मार्केट ते सप्तपदी मंगल कार्यालयापर्यंत वाहणारी मुख्य जलनिसारण वाहीनी बदलणेसाठी रक्कम रू.१७.०० लक्षची तरतुद करण्यात आली आहे. | प्रभाग क्र.२५ आयोध्यानगर येथील विविध सेक्टर मधील विविध गल्यात पेव्हींग ब्लॉक बसविणे. |

सुचक : सौ.विमल तुकाराम बेंद्रे अनुमोदक : श्री.बाबासाहेब डांगे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२५ आयोध्यानगर करीता अर्थसंकल्पातील खालीलप्रमाणे कामांचे लेखाशिर्षक बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१. | अर्थसंकल्प २००७-२००८ पृष्ठ क्र.डब्ल्यु २३० वरील अनुक्रमांक ५ | प्रभाग क्र.२५ आयोध्यानगर |

| | | |
|---|---|---|
| | वर प्रभाग क्र.२५ अयोध्यानगर अंतर्गत एन ७ इंदीरा गांधी मार्केट ते सप्तपदी मंगल कार्यालयापर्यंत वाहणारी मुख्य जलनिसारण वाहीनी बदलणेसाठी रक्कम रू.१७.०० लक्षची तरतुद करण्यात आली आहे. | येथील विविध सेक्टर मधील विविध गल्यात पेव्हींग ब्लॉक बसविणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८८१/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-८४ मध्ये सर्व्हे क्रमांक -५१ भाग, गारखेडा-विजयनगर येथील श्री.उदगीरे व श्री.जेहूरकर यांचे ले-आऊट मध्ये महानगरपालिकेच्या मालकीच्या भूखंडावर शाळा बांधण्यात यावी. सदरील भुखंड १५५१ स्के.मी.क्षेत्रफळाचा असून हा शाळेसाठी राखीव आहे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.शशांक दामोधर विसपूते अनुमोदक : श्री.विजय खुडे, श्री.प्रल्हाद निमगांवकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-८४ मध्ये सर्व्हे क्रमांक -५१ भाग, गारखेडा-विजयनगर येथील श्री.उदगीरे व श्री.जेहूरकर यांचे ले-आऊटमध्ये शाळेसाठी राखीव असलेल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या भूखंडावर शाळा बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८८२/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, राज्यातील खेळाडूंना वाव मिळावा या उद्देशाने ''राज्यस्तरीय महापौर चषक स्केटींग स्पर्धा'' औरंगाबाद जिल्हा रोलर स्केटींग असोसिएशन, औरंगाबादच्या सहकार्याने आयोजित करण्यात यावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.बाबासाहेब डांगे अनुमोदक : श्री.सतिष कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, राज्यस्तरीय महापौर चषक स्केटींग स्पर्धा औरंगाबाद जिल्हा रोलर स्केटींग असोसिएशन, औरंगाबादच्या सहकार्याने आयोजित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८८३/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,सन २००७-०८ या वर्षात अखिल भारतीय महापौर चषक स्पर्धेत मुकबधिर मुला/मुलीसाठी खुली बुध्दीबळ स्पर्धेचा समावेश करण्यात यावा.याकरीता औरंगाबाद जिल्हा मुकबधिर संघटनेने विनंती केलेली आहे.करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

सुचक : श्री.प्रल्हाद निमगांवकर अनुमोदक : श्री.विजय खुडे, श्री.सतिष कटकटे

**चर्चा :**

श्री.गजानन बारवाल : महापौर चषक स्पर्धा अनेक वर्षापासून घेत आहोत. एक स्पेसीफिक म्हणून बजेट ठेवतो या वर्षी बजेट मध्ये आणखी कोणकोणत्या स्पर्धा घ्यायच्या तसेच राष्ट्रीय दर्जा सुधारावा आणि राज्य स्तरीय स्पर्धा किंवा राष्ट्रीय स्तरावर स्पर्धा कशा पध्दतीने घ्यायच्या याची नियोजन आजच केल्यास योग्य होईल.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : खेळाच्या संदर्भात महापालिका प्रशासनाचे उदार धोरण आहे त्याबध्दल प्रशासनाचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन.ज्या संघटना आपण बघतो टोर्नामेंन्ट आपल्या समोर येते ते रजिस्टर्ड आहेत का,असोशिएशन आहेत का तसेच सरकार मान्य आहेत का हे सर्व बघीतले जाते का या संदर्भात काही नियम महापालिकेने

काही केलेले आहेत काय जे खेळ घेतले जाते त्यावर एवढा खर्च होतो या सर्व बाबीचा विचार करून मंजुर करण्यात यावे.

मा.पिठासीन अधिकारी : स.सदस्य श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर यांनी केलेल्या सूचनेची प्रशासनाने नोंद घ्यावी. त्यानूसार कार्यवाही करावी हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००७-०८ या वर्षात अखिल भारतीय महापौर चषक स्पर्धेत मुकबधिर मुला/मुलीसाठी खुली बुध्दीबळ स्पर्धेचा समावेश करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ८८४/८ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,सन २००७-२००८ या वर्षात अखिल भारतीय महापौर चषक स्पर्धेत राज्यस्तरीय खुली जलतरण स्पर्धेचा समावेश करण्यात यावा. याकरीता औरंगाबाद जिल्हा हौशी जलतरण संघटनेने विनंती केलेली आहे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील अनुमोदक : श्री.सतिष कटकटे,श्री.विजय खुडे,श्री.प्रल्हाद निमगांवकर

मा.पिठासीन अधिकारी : विषय मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,सन २००७-२००८ या वर्षात अखिल भारतीय महापौर चषक स्पर्धेत राज्यस्तरीय खुली जलतरणस्पर्धेचा समावेश करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ८८५/९ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा सर्वसाधारण सभा दि.२०.६.२००७ मधील विषय क्र.१० मध्ये ''नागरी दलित वस्ती सुधार योजना '' मध्ये वार्ड क्र.२७ शताब्दीनगर या भागाचा समावेश करण्यात आलेला नाही या भागामध्ये जवळपास ७०% दलित समाजाचे लोक राहतात व सर्व रहिवासी हे दारिद्र रेषेखाली येतात.

करीता माझ्या वार्डातील सदरील भागात जलवाहिनीची व्यवस्था करणे, व अंतर्गत गल्यात पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचा सदरील योजनेमध्ये समावेश करून आर्थिक तरतुद करण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय जगताप अनुमोदक : अब्दुल साजेद अब्दुल सत्तार

**<u>चर्चा :</u>**

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : यापूर्वी अनेक लोकांना जमिनीचा मोबदला दिला असून अजूनही ताब्यात घेतलेल्या नाही. रेल्वेस्टेशनच्या बऱ्याच भागाचा मोबदला दिलेला आहे. जे पूर्वी अर्धवट राहिलेले आहे ते करण्यात यावे.

मा.पिठासीन अधिकारी : नागरी दलित वस्ती सुधार योजनेचा प्रस्ताव करून पाठवावा. एकत्रित सर्व प्रस्तावांचा समावेश करून तसा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यास मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार,नागरी दलित वस्ती सुधार योजनेचे सर्व प्रस्ताव एकत्रित करून तसा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८८६/१० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गारखेडा परिसरातील शिवाजीनगर पूर्व सिडको एन.एस.-१ सर्व्हे क्रमांक १२६,१२७ सेक्टर एच, सेक्टर जी या भागास ''देवगिरी हिलस्'' असे नामकरण करणे बाबत सदरील भागातील नागरीकांची मागणी आहे. नागरीकांनी केलेली मागणी विचारात घेता सदर परिसरास ''देवगिरी हिलस्'' असे नाव देणे बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.शशांक विसपूते अनुमोदक : श्री.प्रल्हाद निमगांवकर

मा.पिठासीन अधिकारी : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गारखेडा परिसरातील शिवाजीनगर पूर्व सिडको एन.एस.-१ सर्व्हे क्रमांक १२६,१२७ सेक्टर एच, सेक्टर जी या भागास ''देवगिरी हिलस्'' असे नांव देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८८७/११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, इंदिरानगर, बायजीपुरा येथील मयत असद शेख पिता मुस्ताक शेख यांचे विद्युत तारेमुळे करंट लागून त्यांचा मृत्यू झाला तरी आपल्या म.न.पा तर्फे सदर मुलाच्या वडिलास १ लाख रूपयाचा नुकसान भरपाई देण्यात यावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.कैलास गायकवाड,श्रीमती शमशाद बेगम हफीज खान अनुमोदक : श्री.रशीद खान मामू

श्री.सतिष कटकटे : अशा प्रकरणांत रूपये २५/- हजार देण्यांत यावे.

मा.पिठासीन अधिकारी : रू.२५/- हजार मंजुर करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,इंदिरानगर, बायजीपुरा येथील मयत असद शेख पिता मुस्ताक शेख यांचे विद्युत तारेमुळे करंट लागून मृत्यू झालेला असल्यामूळे सदर मुलाच्या वडिलास र.रू. २५/- हजार देण्यास मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.पिठासीन अधिकारी : विषय क्र १२,१३ मंजूर.

**विषय क्र. ८८८/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, लोककवि वामनदादा कर्डक हे फुले, शाहु, आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मानवतावादी विचाराचा गाडा संपूर्ण आयुष्यभर जोमाने ओढला, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांना तुरूंगवास भोगावा लागला. वामनदादा कर्डक हे एक स्वतंत्र सेनानी होते. त्यांच्या विचाराची तमाम आंबेडकरी जनतेला व्हावी. करीता ज्युब्ली पार्क येथील ट्रॅफिक सिग्नल जवळील मनपाच्या दगडी बेटा शेजारी पुर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती लक्ष्मी शंकर आशन्ना

अनुमोदक : श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार,श्री.कैलास गायकवाड,श्री.मिलींद दाभाडे,
सौ.मंगला प्रकाश गायकवाड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लोककवि वामनदादा कर्डक यांचा पुर्णाकृती पुतळा ज्युब्ली पार्क येथील ट्रॅफिक सिग्नल जवळील मनपाच्या दगडी बेटा शेजारी उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८८९/१३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,प्रभाग क्र.७३ अंतर्गत सांडपाण्याचा निचरा करणेसाठी आर.सि.सि. गटार बांधणे व ढापे टाकणे यासाठी सन २००७-२००८ ह्या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु-१७४ वरील अनुक्रमांक १९ वर रक्कम रू.६.०० लक्षची तरतुद करण्यात आली आहे.

त्या ऐवजी सदरील रक्कम सारा कासलीलवाल परीसरात १८ मिटर च्या रोड लगत पेव्हर ब्लॉक बसवुन फुटपाथ तयार करणे. या कामासाठी रू.६.०० लक्ष वळती करण्यात यावे.

यासाठी सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.दामोधर माधवराव शिंदे अनुमोदक : सौ.पुष्पा बाळुनाना शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७३ अंतर्गत सांडपाण्याचा निचरा करणेसाठी आर.सि.सि. गटार बांधणे व ढापे टाकणे यासाठी सन २००७-२००८ ह्या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु-१७४ वरील अनुक्रमांक १९ वर रक्कम रू.६.०० लक्षची करण्यांत आलेली तरतुद **याऐवजी** सारा कासलीवाल परीसरात १८ मिटर च्या रोड लगत पेव्हर ब्लॉक बसवुन फुटपाथ तयार करणे,या कामासाठी र.रू.६.०० लक्ष वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८९०/१४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पैठणरोड व बीड रोडला जोडणारा महानुभव आश्रम जवळ श्री.चक्रधर स्वामी चौकात सध्या सर्वात जास्त वाहतुक असुन हा चौक शहराची आकर्षक ठरला आहे.

**करीता या चौकात**

१) २० मी उंचीचा हायमास्ट लाईट बसविणे.

२) वाहतुक सिग्नल बसविणे.

३) चौकात सुशोभिकरण करणे.

इ.कामे अर्थसंकल्पीय तरतुद करून हाती घेण्याचा प्रस्ताव सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.अनिता नंदकुमार घोडेले अनुमोदक : श्री.गजानन बारवाल

मा.पिठासीन अधिकारी : सदर वार्डात यासाठी तरतूद केलेली आहे त्यातून हायमास्ट बसविण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पैठणरोड व बीड रोडला जोडणाऱ्या महानुभव आश्रम जवळील श्री.चक्रधर स्वामी चौकामध्ये १) २० मी उंचीचा हायमास्ट लाईट बसविणे २)वाहतुक सिग्नल बसविणे ३)चौकात सुशोभिकरण करणे इ.कामाकरीता अर्थसंकल्पात तरतुद करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८९१/१५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्र.क्र.९८, मध्ये चार विटखेडा, नक्षत्रवाडी, कांचनवाडी ''अ'' व कांचनवाडी ''ब''असे चार स्लम असुन यामध्ये ५०% पेक्षा जास्त दलितवस्ती आहे.चारही स्लममध्ये जसे एकतानगर,काश्मिरनगर,नाथनगर,विजयनगर,नक्षत्रवाडी,शहानगर याभागामध्ये महानगरचा भाग पालीकेच्या निधीतून मुलभूत सुविधा, जसे जलवाहिनी, जलनि:सारण वाहीनी,खडी व डांबरी रस्ते, सांडपाण्याच्या गटारी, विद्युत पथदिवे इ. विकासाची कामे करण्याकरीता शासनाकडून मिळणारा विशेष निधी नागरी दलीत

वस्ती सुधार योजना या अंतर्गत रू.५०,००,०००/- पन्नास लक्षची तरतुद उपलब्ध करून देणे बाबतचा प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करून मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावा.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव व वैधानिक कार्यवाहीस्तव सादर.

सुचक : सौ.अनिता नंदकुमार घोडेले    अनुमोदक : श्री.गजानन रामकिसन बारवाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्र.क्र.९८, मधील चार विटखेडा, नक्षत्रवाडी, कांचनवाडी ''अ'' व कांचनवाडी ''ब'' या चार स्लम भागाकरीता मुलभूत सुविधा, जसे जलवाहिनी, जलनि:सारण वाहीनी,खडी व डांबरी रस्ते, सांडपाण्याच्या गटारी, विद्युत पथदिवे इ. विकासाची कामे करण्याकरीता शासनाकडून मिळणाऱ्या नागरी दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत निधीतून र.रू.५०,००,०००/- पन्नास लक्षची तरतुद उपलब्ध करून देणेस व तसा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८९२/१६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,सन२००७-२००८यावर्षात अखिल भारतीय महापौर चषक स्पर्धे अंतर्गत आंतरराष्ट्रीय रेटींग खुली बुध्दीबळ स्पर्धेचा समावेश करण्यात यावा.याकरीता औरंगाबाद जिल्हा बुध्दीबळ संघटनेने विनंती केलेली आहे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

सुचक : ॲड.राजेश गुलाबचंद व्यास (पप्पू)

अनुमोदक : श्री.संतोष खेंडके पाटील, श्री.रेणुकादास वैद्य, श्री.सतिष कटकटे, श्री.विजय खुडे

**चर्चा :**

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : महापौर चषक अंतरराष्ट्रीय की मराठवाडयासाठी आहे कि अखिल भारतीय आहे. महापौर चषक हे महाराष्ट्र पुरते मर्यादित आहे अशी दुरूस्ती करावी.

मा.पिठासीन अधिकारी : दुरूस्तीसह प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन२००७-२००८ या वर्षात अखिल भारतीय महापौर चषक स्पर्धे अंतर्गत आंतरराष्ट्रीय रेटींग खुली बुध्दीबळ स्पर्धेचा समावेश करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, तसेच महापौर चषक हे महाराष्ट्रापुरते मर्यादित आहे, अशी दुरूस्ती करण्यांसही मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८९३/१७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.५४ संजय नगर गल्ली क्र.सी-६ शिवनारायण लाठी यांचे घराजवळ दिनांक १८.३.२००५ सायंकाळी मनपाच्या विद्युत पोलला चिटकुण प्रमोद कैलास साळुंके वय वर्षे १३ यांचे निधन झाले होते. सदर प्रकरणी मनपाचे लाईन मन श्री.आसराम कुलकर्णी यास दिड वर्षासाठी निलंबीत करण्यात आले. या प्रकरणाची संपुर्ण कार्यवाही बाबतची संचिका मनपा विद्युत विभागात जमा करण्यात आलेली आहे.

तथापी महानगरपालिका तर्फे मयताचे कुटुंबास कुठल्याही प्रकारची आर्थिक सहाय्यता करण्यात आली नाही. त्यामूळे मी आपणास विनंती करतो की, संदर्भीय विषया प्रमाणे ह्या कुटुंबास देखील आर्थिक सहाय्य म्हणून रू.१.०० लक्ष मंजुर करण्यात यावे.

सुचक : श्री.संतोष सुधाकर जेजुरकर    अनुमोदक : श्री.त्र्यंबक तुपे

मा.पिठासीन अधिकारी : विषय क्र.११ नुसार दुरूस्ती करून रू.२५/- हजार मंजूर करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.५४ संजय नगर गल्ली क्र.सी-६ शिवनारायण लाठी यांचे घराजवळ दिनांक १८.३.२००५ रोजी मनपाच्या विद्युत पोलला चिकटून मयत झालेल्या प्रमोद कैलास साळुंके यांच्या कुटूंबियास ठराव क्र.११ प्रमाणे र.रू.२५/- हजार अर्थसहाय्य देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.पिठासीन अधिकारी : विषय क्र १८ ते २० मंजूर.

**विषय क्र. ८९४/१८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भिमनगर भावसींगपुरा या वार्डात हजारोची लोकसंख्या असून या ठिकाणी नागरीकांना सार्वजनिक कार्यक्रम घेण्यासाठी एकही समाज मंदीर किंवा सांस्कृतिक सभागृह नसल्याने मोठ्या प्रमाणात नागरीकांची मागणी असल्याने खालील नमुद कामे वळती करून सांस्कृतिक सभागृह बांधण्यासाठी मान्यता द्यावी. ही नम्र विनंती.

वळती करण्यात येणाऱ्या कामाची यादी.

१. डब्ल्यु-६१ भिमनगर, भावसींगपुरा अंतर्गत स्मशानभूमी जवळ पुलाची दुरूस्ती.
२. डब्ल्यु-६५ शौचालयाची दुरूस्ती
३. डब्ल्यु-६७ पेव्हींग ब्लॉक
४. डब्ल्यु-७१ जलनि:सारण वाहिनीची दुरूस्ती.

सुचक : श्री.मिलींद दाभाडे अनुमोदक : श्री.प्रकाश अत्तरदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भिमनगर भावसींगपुरा या वार्डात सार्वजनिक कार्यक्रमासाठी समाजमंदीर किंवा सांस्कृतिक सभागृह बांधणेस व या कामासाठी खालील अर्थसंकल्पात असलेली तरतूद या कामासाठी वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१. डब्ल्यु-६१ भिमनगर, भावसींगपुरा अंतर्गत स्मशानभूमी जवळ पुलाची दुरूस्ती.
२. डब्ल्यु-६५ शौचालयाची दुरूस्ती
३. डब्ल्यु-६७ पेव्हींग ब्लॉक
४. डब्ल्यु-७१ जलनि:सारण वाहिनीची दुरूस्ती. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८९५/१९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१३ मधील अर्थसंकल्प २००७-०८ मधील काम.

१. प्रभाग क्र.१३ विविध ठिकाणी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे. (पान क्र.५९ र.५.००) (अ.क्र.१७)
२. प्रभाग क्र.१३ स्लम विभाग गितानगर स्लम अंतर्गत रस्त्याचे पुर्न :डांबरीकरण करणे (पान क्र.०७ र.३.००) (अ.क्र.१२) **या कामाऐवजी**
१. प्रभाग क्र.१३ विश्वासनगर येथे विविध ठिकाणी पोलसह विद्युत दिवे बसविणे (एकुण र.८ लाख) **तसेच**
१. प्रभाग क्र.१३ विश्वासनगर अंतर्गत विविध भागातील नवीन डांबरीकरण करणे (पान क्र.६६ रक्कम २.००) (अ.क्र.०४) **या कामाऐवजी**
१. वार्ड क्र.१३ हर्षनगर, गितानगर येथे नवीन जलवाहिणी टाकणे. (२ लाख)

**तसेच** १. प्रभाग क्र.१३ देखभाल दुरूस्ती कामे करणे (पान क्र.५५ रक्कम ७५ हजार) (अ.क्र.१०)
२. अण्णाभाऊ साठे चौक समर्थनगर रोड दुभाजक व वाहतुक बेटाची देखभाल दुरूस्ती कामे करणे. (पान क्र.६० रक्कम ४४०.०००) (अ.क्र.२)

**या कामाऐवजी**

१. प्रभाग क्र.१३ गीतानगर, पाठीमागील नाल्यातील दगळी गटर उर्वरीत काम करणे (ए. र.५.१५ लाख)

तरी सदरील कामे रहिवासीयांच्या सुविधेसाठी अत्यंत आवश्यक असल्याने सदरील कामाचे हेड चेंज करून आर्थिक तरतुद मंजुर करावे करीता प्रस्ताव मंजुरी

सुचक :सौ.मसरत बेगम युनुस पटेल अनुमोदक :श्री.अ.साजेद अ.सत्तार,श्री.सलीम खान यासीन खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१३ मधील कामासाठी अर्थसंकल्प २००७-०८ मध्ये असलेल्या खालीलप्रमाणे कामांचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१. प्रभाग क्र.१३ विविध ठिकाणी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे. (पान क्र.५९ र.५.००) (अ.क्र.१७)

२. प्रभाग क्र.१३ स्लम विभाग गितानगर स्लम अंतर्गत रस्त्याचे पुर्न :डांबरीकरण करणे (पान क्र.०७ र.३.००) (अ.क्र.१२) **या कामाऐवजी**

१. प्रभाग क्र.१३ विश्वासनगर येथे विविध ठिकाणी पोलसह विद्युत दिवे बसविणे (एकुण र.८ लाख) **तसेच**

१. प्रभाग क्र.१३ विश्वासनगर अंतर्गत विविध भागातील नवीन डांबरीकरण करणे (पान क्र.६६ रक्कम २.००) (अ.क्र.०४)

**या कामाऐवजी**

१. वार्ड क्र.१३ हर्षनगर, गितानगर येथे नवीन जलवाहिणी टाकणे. (२ लाख)

**तसेच** १. प्रभाग क्र.१३ देखभाल दुरूस्ती कामे करणे (पान क्र.५५ रक्कम ७५ हजार) (अ.क्र.१०)

२. अण्णाभाऊ साठे चौक समर्थनगर रोड दुभाजक व वाहतुक बेटाची देखभाल दुरूस्ती कामे करणे. (पान क्र.६० रक्कम ४४०.०००) (अ.क्र.२) **या कामाऐवजी**

१. प्रभाग क्र.१३ गीतानगर, पाठीमागील नाल्यातील दगडी गटर उर्वरीत काम करणे (ए. र.५.१५ लाख)

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८९६/२० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ गेट समोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा रस्त्याच्या मध्यभागी असल्याने अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यदा कदाचित अपघात झालाच तर संपुर्ण शहरात नव्हे तर महाराष्ट्रात याचे पडसाद उमटतील. त्यामुळे मे.साहेबांनी कुठलीही अप्रिय घटना घडण्याच्या अगोदर मध्य रस्त्यात असलेल्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा गेटच्या शेजारी जागेवर स्थलांतरीत करून लगतच्या परिसरामध्ये सुशोभित उद्यान उभारावे ही विनंती.

सुचक : श्री.मिलींद दाभाडे

अनुमोदक : सौ.लता दलाल, श्री.त्र्यंबक तुपे,श्री.संतोष खेंडके पाटील, श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार श्री.भगवान (बापू) घडमोडे,श्री.मोहन मेघावाले,सौ.मंगला गायकवाड,श्री.सय्यद खुसरो, श्री.बाबासाहेब डांगे,श्रीमती लक्ष्मी शंकर आशन्ना,श्री.संजय केनेकर,श्री.राजेश व्यास(पप्पू)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ गेट समोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा गेटच्या शेजारी जागेवर स्थलांतरीत करून लगतच्या परिसरामध्ये सुशोभित उद्यान उभारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८९७/२१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून विविध संगणक प्रशिक्षण देण्यांत येते व त्यासाठी खाजगी संस्थाकडून प्रशिक्षण दिल्या जाते. मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र कार्यान्वीत झालेले असून सद्या या इमारतीत संगणक प्रशिक्षणासाठी जागा उपलब्ध आहे.हा भाग शहर व सिडको रहिवाशी यांचेसाठी उपयुक्त आहे. तरी महानगरपालिकेतर्फे २/३/६ महिन्याचे किंवा एका वर्षाचे विविध संगणक शिक्षण/प्रशिक्षण विद्यार्थी (मुले व मुली) आणि महिलांना व महानगरपालिका शिक्षकांना देण्यांत यावे. तसेच या प्रशिक्षणासाठी २-३ शिक्षक/ निदेशक यांचे आऊटसोर्सने घेवून कमी खर्चात संगणक शिक्षण/प्रशिक्षण देण्यांत यावे. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : ०१.श्री.अ.रशिद खान मामु,०२.सौ.लता श्रीनिवास दलाल,०३.श्री.संतोष खेंडके पाटील

अनुमोदक : ०१. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे,०२.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार

**संवाद :**

श्रीमती जयश्री किवळेकर : एक ठिकाणी प्रशिक्षण केंद्र न ठेवता शहरात किमान चार ठिकाणी संगणक प्रशिक्षण ठेवण्यात यावे जेणे करून महिला व मुलींना त्यांचा लाभ घेता येईल. विविध ठिकाणी ठेवावे.

मा.पिठासीन अधिकारी : दुरूस्तीसह हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

श्री.संजय जोशी : उदा. पुंडलिकनगरच्या विदयार्थ्यांना या प्रशिक्षण केद्रावर येणे जाणे परवडणारे नाही.रिक्षाच्या खर्चात त्याच भागात त्या विदयार्थीनीचे प्रशिक्षण होईल.

मा. पिठासीन अधिकारी : या शहरात चार ठिकाणी प्रशिक्षण केंद्र ठेवण्यात यावे त्यात सिडको हडको भागात गारखेडा तसेच इतर दोन ठिकाणी ठेवावे.

श्री.संजय जोशी : यापूर्वी पध्दत वेगळी होती निविदा मागविण्यात येत असे ज्यांची सर्वांत कमी दराने प्रशिक्षणाची निविदा येत असे त्यांचेकडे प्रशिक्षणार्थी पाठविले जात असे तीच पध्दत चालू ठेवावी. या प्रस्तावास माझा विरोध नाही. हा प्रस्ताव मंजूर करावा. पूर्वीची पध्दत राहू द्यावी.

मा. पिठासीन अधिकारी : दूरूस्तीसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र या इमारतीत संगणक प्रशिक्षणासाठी जागा उपलब्ध असल्याने व हा भाग शहर व सिडको रहिवाशी यांचेसाठी उपयुक्त असल्याने महानगरपालिकेतर्फे २/३/६ महिन्याचे किंवा एका वर्षाचे विविध संगणक शिक्षण/प्रशिक्षण विद्यार्थी (मुले व मुली) आणि महिलांना व महानगरपालिका शिक्षकांना देण्यांस तसेच या प्रशिक्षणासाठी २-३ शिक्षक/ निदेशक यांचे आऊटसोर्सने घेवून कमी खर्चात संगणक शिक्षण/प्रशिक्षण देण्यांस मंजुरी देण्यांत येते, तसेच सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे शहरात विविध ४ ठिकाणी प्रशिक्षण केंद्र चालू करण्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.पिठासीन अधिकारी : विषय क्र २२ ते २७ मंजूर.

**विषय क्र. ८९८/२२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शुरवीर महाराणा प्रताप यांचा पुतळा औरंगाबाद शहरात उभारणे अत्यंत आवश्यक आहे. त्यादृष्टीने औरंगाबाद शहरातील छावणी भागातील होली क्रॉस हायस्कुल समोरील रस्त्यावर महाराणा यांचा भव्य पुतळा उभारणे व सदर पुतळा उभारणे बाबत छावणी बोर्डाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. कंवरसिंग बैनाडे, श्री.संतोष खेंडके पाटील, सौ.लता दलाल

अनुमोदक : श्री.शिंदे दामोधर माधवराव,श्री.भाऊसाहेब ताठे,श्री.पुरूषोत्तम ठाकुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शुरवीर महाराणा प्रताप यांचा भव्य पुतळा शहरातील छावणी भागातील होलीक्रॉस हायस्कुल समोरील रस्त्यावर उभारणेस व सदर पुतळा उभारणे बाबत छावणी बोर्डाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८९९/२३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु-३२ पवननगर येथे खुल्या जागेत जिम्नॅशियम हॉल बांधणे तरतुद १० लाख मागील वर्षी परंतु तेवढ्या रकमेत ते काम पूर्ण होत नाही त्याऐवजी पेज नं.९१ वरील १:५० रकमेतून जलनि:सारण वाहीनी व देखभाल दुरूस्ती या कामातून १.५० रूपये वरील कामासाठी वळती करण्यात यावे ही विनंती.

सुचक : श्री.प्रकाश अत्तरदे अनुमोदक : श्री.भाऊसाहेब ताठे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु-३२ पवननगर येथे खुल्या जागेत जिम्नॅशियम हॉल बांधणेसाठी असलेल्या र.रू.१० लाखामध्ये सदर काम पूर्ण होत नसल्यामूळे पा.नं.९१ वरील जलनि:सारण वाहीनी व देखभाल दुरूस्ती या कामातून र.रू.१.५० लक्ष या कामासाठी वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९००/२४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु-१८० वर पुर्न:डांबरीकरण करणे. रक्कम ०९ लाख (नऊ लाख) या कामाऐवजी कॉंक्रीटींग करण्याचे काम करावयाचे आहे.

सुचक : श्री.प्रकाश अत्तरदे अनुमोदक : श्री.भाऊसाहेब ताठे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु-१८० वर पुर्न:डांबरीकरण करणे र.रू.९.०० लाख (नऊ लाख) **या कामाऐवजी** कॉंक्रीटींग करण्याचे काम करणे असे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९०१/२५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प २००७-०८ मधील पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-२१५ अ.क्र.१३ वार्ड क्रमांक १७ मध्ये मोठ्या व्यासाची जलवाहीनी टाकणे बाबत रूपये ६ लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे.

**वरील कामा ऐवजी**

१) वार्ड क्रमांक १७ मध्ये आवश्यक त्या ठिकाणी फुटपाथ तयार करून पेव्हींग ब्लॉक बसविणेसाठी (रू.४ लक्ष)

२) वार्ड क्रमांक १७ मध्ये आवश्यक त्या ठिकाणी जलवाहीनी टाकणेसाठी (२ लक्ष) तरतुद करण्यात यावी.

वरील प्रस्ताव मान्यतेसाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येत आहे.

सुचक : श्री.महेश माळवतकर अनुमोदक : श्री.अनिल जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००७-०८ मधील पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-२१५ अ.क्र.१३ वार्ड क्रमांक १७ करीता असलेली र.रू.६.०० लाख तरतूद **याऐवजी** १) वार्ड क्रमांक १७ मध्ये आवश्यक त्या ठिकाणी फुटपाथ तयार करून पेव्हींग ब्लॉक बसविणे र.रू.४ लक्ष व २) वार्ड क्रमांक १७ मध्ये आवश्यक त्या ठिकाणी जलवाहीनी टाकणे र.रू.२ लक्ष तरतूद करणे करीता लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९०२/२६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प २००७-०८ मधील पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-२०० अ.क्र.१३ वार्ड क्रमांक १७ मध्ये क्रिडांगण विकसित करण्यासाठी रूपये ३ लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे.

**तसेच**

अर्थसंकल्प २००७-०८ मधील पृष्ठ क्र.डब्ल्यु- २११ अ.क्र.७ वार्ड क्रमांक १७ मधील विविध नाले आवश्यकतेनुसार रिपेरिंग करण्यासाठी रूपये २ लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे.

**या दोन्ही कामा ऐवजी**

वार्ड क्रमांक १७ एन-९ सुलभ शौचालयापासून सुरू होणाऱ्या नाल्यापासुन एन-९ सत्संग भवन पर्यंतच्या नाल्यास चॅनेलिंग करण्यात यावी व आवश्यक त्या ठिकाणी रिपेरिंग करणेसाठी रूपये ५ लाखाची तरतुद करण्यात यावी.

वरील प्रस्ताव मान्यतेसाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येत आहे.

सुचक : श्री.महेश माळवतकर अनुमोदक : श्री.अनिल जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००७-०८ मधील पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-२०० अ.क्र.१३ वार्ड क्रमांक १७ मध्ये क्रिडांगण विकसित करण्यासाठी असलेली र.रू.३ लाखाची तरतुद **तसेच** पृष्ठ क्र.डब्ल्यु- २११ अ.क्र.७ वार्ड क्रमांक १७ मधील विविध नाले आवश्यकतेनुसार रिपेरिंग करण्यासाठी असलेली र.रू.२ लाखाची तरतुद **याऐवजी** वार्ड क्रमांक १७ एन-९ सुलभ शौचालयापासून सुरू होणाऱ्या नाल्यापासुन एन-९ सत्संग भवन पर्यंतच्या नाल्यास चॅनेलिंग करण्यास व आवश्यक त्याठिकाणी रिपेरिंग करणेसाठी र.रू.५ लाख असे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९०३/२७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प २००७-०८ मधील पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-२१९ अ.क्र.३ वार्ड क्रमांक १७ श्रीकृष्णनगर येथील एन-९ किर्ती मंगल कार्यालयाजवळ कल्व्हर्ट बॉक्स (पुल बांधणे) साठी रूपये २० लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे.

**या कामा ऐवजी**

वार्ड क्रमांक १७ पवार हॉस्पिटल एम-२ रोड एन-९ मनपा शाळा ते हॉटेल दुर्गापर्यंत पुन:डांबरीकरण करण्यासाठी रूपये २० लाखाची तरतुद करण्यात यावी.

वरील प्रस्ताव मान्यतेसाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येत आहे.

सुचक : श्री.महेश माळवतकर अनुमोदक : श्री.अनिल जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००७-०८ मधील पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-२१९ अ.क्र.३ वार्ड क्रमांक १७ श्रीकृष्णनगर येथील एन-९ किर्ती मंगल कार्यालयाजवळ कल्व्हर्ट बॉक्स (पुल बांधणे) साठी असलेली र.रू.२० लाखाची तरतुद **याऐवजी** वार्ड क्रमांक १७ पवार हॉस्पिटल एम-२ रोड एन-९ मनपा शाळा ते हॉटेल दुर्गापर्यंत पुन:र्डबंरीकरण करणे र.रू.२० लाख तरतुद असे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**पुरवणी विषय**

**विषय क्र. ९०४/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.०९ मध्ये मो.शांतीपुरा भागातील पावसाचे सांडपाणी काढण्यासाठी गटार बांधणेकरीता सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात पृष्ट क्र.डब्ल्यु ३७ वर १० लक्ष ची तरतूद करण्यात आलेली आहे. तथापी ज्या भागात गटार बांधण्यात येत आहे, त्या ठिकाणच्या नागरीकांनी अक्षेप नोंदवून प्रकरण न्यायप्रविष्ट केलेले आहे. करीता या कामा ऐवजी शांतीपुरा भागात सार्वजनिक स्टेज, अंतर्गत पेव्हर ब्लॉक तसेच प्रभाग क्र.९ मध्ये शौच्छालय बांधण्यात यावे. या करीता लेखाशिर्षक बदलण्याच्या प्रस्तावास सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.पुरूषोत्तम रघुविरसिंह ठाकुर अनुमोदक : श्री.विजय किसनराव खुडे

**चर्चा :**

कार्य.अभियंता(विद्यु.ड्रे.) : सदर काम सुरू झालेले आहे. यात न्याय प्रविष्ठ प्रकरण म्हटलेले आहे न्यायालयात प्रकरण होते परंतू महापालिकेच्या बाजूने निकाल लागलेला आहे.काम सूरू केलेले आहे. या भागातील लोकांनी नेहमीच या विषयी तक्रार असते.हा रद्य करावे.

श्री.पुरूषोत्तम ठाकुर : नामंजुर करावे.

मा.पिठासीन अधिकारी : नामंजुर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव नामंजूर करण्यांस मान्यता देण्यांत आली.

मा.पिठासीन अधिकारी : विषय क्र २ ते ६ मंजूर.

**विषय क्र. ९०५/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.९३ वेदांतनगर अंतर्गत अर्थसंकल्पातील कामांचे लेखाशिर्ष बदलण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा, ही विनंती.

| अर्थसंकल्प पान क्र. | कामाचे नांव (रद्द करावयाची कामे) | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| डब्ल्यु १६७ | वार्ड क्र.९३ भगिरथनगर अंतर्गत गटार बांधणे- ५.०० लक्ष | वार्डक्र.९मधील वेदांतनगर पाण्याचे टाकी जवळील खूल्या जागेत बहुउद्देशीय हॉल बांधणे -१५.०० लक्ष |
| डब्ल्यु २२८ | वार्डक्र.९३वेदांतनगर अंतर्गत वार्डात विविध विकासाची कामे करणे-१०.०० | |
| डब्ल्यु ३४ | वार्ड क्र.९३ कबीरनगर येथे महिलांसाठी सार्वजनिक शौचालयबांधणे-७.०० लक्ष | वार्ड क्र.९३ एमआयडीसी रेल्वेस्टेशन रोड येथे बालभारती जवळ साचणाऱ्या पावसाच्या पाण्याचा निचरा करणेसाठी नाला बांधणे- ७.०० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| डब्ल्यु १९९ | वार्डक्र.९३वेदांतनगर येथील उद्यानाच्या भिंतीची उंची वाढविणे-३ लक्ष | वार्ड क्र.९३ पदमपाणी कॉलनी येथील पेव्हींग ब्लॉक बसविणे |

सुचक : श्री.संजय शिरसाट अनुमोदक : श्री.प्रल्हाद निमगांवकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९३ वेदांतनगर अंतर्गत अर्थसंकल्पातील खालीलप्रमाणे कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पान क्र. | कामाचे नांव (रद्द करावयाची कामे) | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| डब्ल्यु १६७ | वार्ड क्र.९३ भगिरथनगर अंतर्गत गटार बांधणे- ५.०० लक्ष | वार्डक्र.९३मधील वेदांतनगर पाण्याचे टाकी जवळील खूल्या जागेत बहुउद्देशीय हॉल बांधणे -१५.०० लक्ष |
| डब्ल्यु २२८ | वार्डक्र.९३वेदांतनगर अंतर्गत वार्डात विविध विकासाची कामे करणे-१०.०० | |
| डब्ल्यु ३४ | वार्ड क्र.९३ कबीरनगर येथे महिलांसाठी सार्वजनिक शौचालयबांधणे-७.०० लक्ष | वार्ड क्र.९३ एमआयडीसी रेल्वेस्टेशन रोड येथे बालभारती जवळ साचणाऱ्या पावसाच्या पाण्याचा निचरा करणेसाठी नाला बांधणे- ७.०० लक्ष |
| डब्ल्यु १९९ | वार्डक्र.९३वेदांतनगर येथील उद्यानाच्या भिंतीची उंची वाढविणे-३ लक्ष | वार्ड क्र.९३ पदमपाणी कॉलनी येथील पेव्हींग ब्लॉक बसविणे |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९०६/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.९ शांतीपुरा येथील खालील कामांचे लेखाशिर्षक बदलण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखा शिर्षक |
|---|---|---|
| ०१ | प्रभाग क्र.९ शांतीपुरा अंतर्गत विविध देखभाल दुरूस्तीची कामे करणे. तरतूद रक्कम ३ लक्ष. | प्रभाग क्र.९ येथे जिम्नॅशिअम हॉल बांधणे ८.०० लक्ष |
| ०२ | प्रभाग क्र.९ येथे विविध ठिकाणी खुली जागा विकसीत करणे. तरतूद रक्कम ५ लक्ष | |

सुचक : श्री.पुरूषोत्तम ठाकुर अनुमोदक : श्री.संतोष खेंडके पाटील

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.९ शांतीपुरा येथील खालीलप्रमाणे कामांचे लेखाशिर्षक बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखा शिर्षक |
|---|---|---|
| ०१ | प्रभाग क्र.९ शांतीपुरा अंतर्गत विविध देखभाल दुरूस्तीची कामे करणे. तरतूद रक्कम ३ लक्ष. | प्रभाग क्र.९ येथे जिम्नॅशिअम हॉल बांधणे ८.०० लक्ष |
| ०२ | प्रभाग क्र.९ येथे विविध ठिकाणी खुली जागा विकसीत करणे. तरतूद रक्कम ५ लक्ष | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९०७/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येते की, अर्थसंकल्प सन २००७-०८ साठी सादर केलेली बजेट बुकमध्ये विकास कामामध्ये तरतूद ठेवण्यात आलेली आहे. त्या कामाची सध्या वार्डात आवश्यकता नसल्यामूळे त्या तरतूदमध्ये बदल करून देण्यात परवानगी देण्यात यावी.

१. वार्ड क्र.३८ मधील विविध सार्वजनिक नळाची दुरूस्ती करणे या कामासाठी तरतूद ३००००० लाख मधून रू. १००००० लाख ठेवून रू.२००००० लाख जी.आय.पोल फिटींगसाठी ठेवण्यात यावे.

२. वार्ड क्र.३८ गांधीनगर अंतर्गत गांधीनगर भागात विविध ठिकाणी कॉंक्रींटींग बाकडे बसविणे. तरतूद रू.५०००००/- मधून रू.३००००० ठेवण्यात यावे व रू.२००००० लाख जी.आय.पोल फिटींगसाठी बदल करून देण्यांत यावे.

३. वार्ड क्र.३८ गांधीनगर अंतर्गत बंजारा कॉलनी, पुरंदरे निवास, माता मंदिर गल्ली अंडर ग्रांऊड पाईप लाईन टाकणे. तरतूद रू.४०००००/- लाख या कामाऐवजी रू.४०००००/- जी.आय.पोल फिटींग लावण्यासाठी ठेवण्यांत यावे.

प्रस्ताव सर्वसाधारण सभेमध्ये मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.संजु रिडलॉन अनुमोदक : श्री.पुनमचंद बमणे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प सन २००७-०८ मध्ये वॉर्ड क्र.३८ करीता असलेल्या खालील विविध कामांचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१. वार्ड क्र.३८ मधील विविध सार्वजनिक नळाची दुरूस्ती करणे या कामासाठी तरतूद ३००००० लाख मधून रू. १००००० लाख ठेवून रू.२००००० लाख जी.आय.पोल फिटींगसाठी ठेवण्यात यावे.

२. वार्ड क्र.३८ गांधीनगर अंतर्गत गांधीनगर भागात विविध ठिकाणी कॉंक्रींटींग बाकडे बसविणे. तरतूद रू.५०००००/- मधून रू.३००००० ठेवण्यात यावे व रू.२००००० लाख जी.आय.पोल फिटींगसाठी बदल करून देण्यांत यावे.

३. वार्ड क्र.३८ गांधीनगर अंतर्गत बंजारा कॉलनी, पुरंदरे निवास, माता मंदिर गल्ली अंडर ग्रांऊड पाईप लाईन टाकणे. तरतूद रू.४०००००/- लाख या कामाऐवजी रू.४०००००/- जी.आय.पोल फिटींग लावण्यासाठी ठेवण्यांत यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९०८/५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.७६ मध्ये विविध विकास कामे सन २००७-२००८ अंतर्गत करणे आवश्यक असल्याने प्राप्त तरतूदीमधून खालील विकास कामांच्या लेखाशिर्षमध्ये बदल करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | अर्थसंकल्प पा.क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | डब्ल्यु २३५ | भांडवली कामे पाणीपुरवठा प्र.क्र.७६ विविध ठिकाणी जलवाहीनी टाकणे- १०.०० लक्ष | वॉर्ड इ. (नविन रस्ते)<br>प्र.क्र. ७६ रामाबाई आंबेडकरनगर कॉंक्रीट रस्ते तयार करणे. १०.०० लक्ष |
| २ | डब्ल्यु १७५ | वि.योजना भूखंड संरक्षण प्र.क्र.७६ मधील विविध खूल्या जागा विकसीत करणे २०.०० लक्ष | वॉर्ड इ. (नविन रस्ते)<br>१.प्र.क्र.७६ अंतर्गत रस्ते तयार करणे १०.०० लक्ष<br>२.रामनगर प्रभागात अंतर्गत ३.०० मी. रूंद रस्ता तयार करणे ५.०० लक्ष<br>विद्युत विभाग<br>१.प्र.क्र.७६ उर्जा बचत दिवे बसविणे २.५० लक्ष. |

करीता उपरोक्त प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.भगवान (बापु) घडमोडे अनुमोदक : श्री.संजय केनेकर, श्री.पुनमचंद बमणे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७६ करीता सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पातील खालीलप्रमाणे कामांचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्प पा.क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | डब्ल्यु २३५ | भांडवली कामे पाणीपुरवठा प्र.क्र.७६ विविध ठिकाणी जलवाहीनी टाकणे-१०.००लक्ष | वॉर्ड इ. (नविन रस्ते)<br>प्र.क्र. ७६ रामाबाई आंबेडकरनगर कॉंक्रीट रस्ते तयार करणे. १०.०० लक्ष |
| २ | डब्ल्यु १७५ | वि.योजना भूखंड संरक्षण प्र.क्र.७६ मधील विविध खूल्या जागा विकसीत करणे २०.०० लक्ष | वॉर्ड इ. (नविन रस्ते)<br>१.प्र.क्र.७६ अंतर्गत रस्ते तयार करणे १०.०० लक्ष<br>२.रामनगर प्रभागात अंतर्गत ३.०० मी. रूंद रस्ता तयार करणे ५.०० लक्ष<br>विद्युत विभाग<br>१.प्र.क्र.७६ उर्जा बचत दिवे बसविणे २.५० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९०९/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद जिल्हा तलवारबाजी संघटना,औरंगाबाद व औरंगाबाद महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने महापौर चषक तलवारबाजी स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. या स्पर्धेकरीता ६५,०००/- (पासष्ट हजार रूपये) खर्च अपेक्षित आहे. तरी मनपा व औरंगाबाद जिल्हा तलवारबाजी संघटना, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने महापौर चषक तलवारबाजी स्पर्धा आयोजीत करण्यास तसेच त्यासाठी लागणाऱ्या खर्चास मंजुरी मिळण्याकरीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे

अनुमोदक : १.श्री.संतोष खेंडके पाटील, २.श्री.विजय खुडे, ३.श्री.अनिल जैस्वाल, ४.श्री.पुरूषोत्तम ठाकुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद जिल्हा तलवारबाजी संघटना व औरंगाबाद महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने महापौर चषक तलवारबाजी स्पर्धेचे आयोजन करण्यास व या स्पर्धेसाठी येणाऱ्या र.रू.६५,०००/- (पासष्ट हजार रूपये) च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९१०/७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट संघटना,औरंगाबाद व औरंगाबाद महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने महापौर चषक व्यसन मुक्ती करंडक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. या स्पर्धेकरीता ६५,०००/- (पासष्ट हजार रूपये) खर्च अपेक्षित आहे. तरी मनपा व औरंगाबाद जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट संघटना, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने महापौर चषक व्यसन मुक्ती करंडक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा आयोजीत करण्यास तसेच त्यासाठी लागणाऱ्या खर्चास मंजुरी मिळण्याकरीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे

अनुमोदक : १.श्री.संतोष खेंडके पाटील, २.श्री.विजय खुडे, ३.श्री.अनिल जैस्वाल, ४.श्री.पुरूषोत्तम ठाकुर

**चर्चा :**

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : या सर्व संघटनेचे रजिष्ट्रेशन तसेच शासनाचे जे क्रिंडा विभाग आहे त्याशी या सर्वाची सलग्नता आहे काय याची माहिती घेतल्याशिवाय या बाबत कार्यवाही होवू नये.

मा.पिठासीन अधिकारी : या संबधीत प्रशासनाने माहिती घ्यावी दुरूस्तीसह या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट संघटना व औरंगाबाद महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने महापौर चषक व्यसन मुक्ती करंडक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यास व या स्पर्धेकरीता येणाऱ्या र.रू.६५,०००/- (पासष्ट हजार रूपये) च्या खर्चास तसेच या सर्व संघटनेचे रजिष्ट्रेशन,शासनाचे जे क्रिंडा विभाग आहे,त्याशी या सर्वाची सलग्नता आहे काय याची माहिती घेतल्याशिवाय या बाबत कार्यवाही न करणे या दुरूस्तीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९११/८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मनपा सर्वसाधारण सभा दिनांक २०.०६.२००७ मधील विषय क्र.१० मध्ये ''नागरी दलित वस्ती सुधार योजना'' मध्ये वार्ड क्र.०९ शांतीपुरा या भागाचा समावेश करण्यात आलेला नाही या भागामध्ये न्यु नंदनवन कॉलनी, कुतुबपुरा,जयसिंगपुरा,विद्यापीठगेट परिसर, भुजबळनगर,विशालनगर,संगिता कॉलनी,भिमनगर पुलाच्या अलीकडील भागात जवळपास ६० टक्के अनुसूचित जाती व जमातीचे लोक राहतात.

करीता वार्डातील सदरील भागात जलवाहीनीची व्यवस्था करणे,ड्रेनेज लाईनची व्यवस्था करणे व अंतर्गत गल्ल्यात पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचे समावेश करून आर्थिक तरतूद करण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.पुरूषोत्तम रघुविरसिंह ठाकुर

अनुमोदक : श्री.मिलींद दाभाडे,श्री.विजय खुडे, श्री.अनिल जुगललाल जैस्वाल

**चर्चा :**

श्री.रविकांत गवळी : मागिल बैठकीत विषय क्र १० ज्या प्रमाणे आलेले होता त्याप्रमाणे हा विषय आलेला आहे. जे एक कोटी रू. नागरी दलित वस्ती सुधार योजनेसाठी आलेले आहे त्यात जे डिक्लेर स्लम न घेता ज्या भागात ६० ते ७० टक्के दलित वस्ती आहेत तो ही भाग घेण्यात यावा.

मा. पिठासीन अधिकारी : ज्या भागात ५५ टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे तेथे हा निधी वापरण्यात यावा स्लम भागासाठी जो शासनाचा निधी येत असतो तो त्या भागासाठी वापरण्यास मंजूरी देण्यात येते. विषय क्र ९ ते११ मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत जलवाहीनीची व्यवस्था करणे,ड्रेनेज लाईनची व्यवस्था करणे व अंतर्गत गल्ल्यात पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाकरीता वार्ड क्र.०९ शांतीपुरा या भागाचा सर्वसाधारण सभा दि.२०.६.२००७ मधील विषय क्र.१० मध्ये समावेश करण्यास तसेच ज्या भागात ५५ टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे तेथे हा निधी वापरण्यात यावा स्लम भागासाठी

जो शासनाचा निधी येत असतो तो त्या भागासाठी वापरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९१२/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर मुळ मंजुर व अस्तित्वात असलेल्या विकास योजनेनुसार उस्मानपुरा/शहानुरवाडी भागात रेल्वे लाईन लगत उत्तर बाजुने जमिन जिचे अदमासे क्षेत्र ४६०० चौ.मी.आहे. ती दफनभूमीच्या वापरात दर्शविलेली आहे.

सदर ठिकाणी या व्यतिरीक्त दोन जागा या स्मशानभूमि/दफनभूमी (Creamation Ground) साठी दर्शविलेली असून,पैकी,एका जागेवर, जी जागा १५ मी.रूंद विकास योजना रस्त्या लगत आहे, तेथे स्मशानभूमी अस्तित्वात असून, तिचा वापर चालु आहे. दुसरी स्मशानभूमी (Creamation Ground) ची जागा, ही रेल्वेलाईनच्या दक्षिणेस स्थित आहे.

सध्यस्थितीत उक्त नमुद प्रमाणे रेल्वेलाईन लगत उत्तर बाजुने विकास योजना नकाशा जे जमिन क्षेत्र स्मशानभुमीच्या वापरात दर्शविले आहे. तिचे लगतचा भाग निवासी/रहिवासी वापरात असून, येथे रहिवासी क्षेत्र विकसित होत आहे.

सदर ठिकाणी आजमितीस स्मशानभूमि वापर नसुन, नगर भुमापन कार्यालयाचे अभिलेखानुसार न.भु.क्र.१६३१७ वर स्मशानभूमी वापराचा उल्लेख नाही. लगत स्मशानभूमी वापरात असल्याने व सभोवतालच्या परिसरात रहिवासी स्वरूपाने जोमाने विकसीत होत असल्याने सदरचे जमिन क्षेत्र ४६०० चौ.मी. हे लगतच्या निवास वापरात समाविष्ट करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव सादर.

सुचक : श्री.विजय किसनराव खुडे अनुमोदक : श्री.सतिष कटकटे, श्री.संजय जोशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मुळ मंजुर व अस्तित्वात असलेल्या विकास योजनेनुसार उस्मानपुरा/शहानुरवाडी येथील न.भु.क्र.१६३१७ क्षेत्र ४६०० चौ.मी. हे दफनभूमिचा वापर बदलून लगतच्या वापरा प्रमाणेच निवास वापरात समाविष्ट करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९१३/१० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.२८, नेहरूनगर अंतर्गत न्यु.एस.टी.कॉलनी येथे दगडी गटारचे काम ५०% पूर्ण झालेले असून ५०% बाकी आहे.

करीता बजेट कमी पडलेले आहे. त्या करीता नेहरूनगर येथील कॅचपीटचे २५ लाख रूपये अर्थसंकल्प पुस्तक पान क्र.डब्ल्यु २१० वर आहे. त्याऐवजी मला १५ लक्ष रूपये एस.टी.कॉलनी दगडी गटार करीता वळती करून देणे आणि उर्वरीत १० लक्ष रूपये युनूस कॉलनी येथे डांबरीकरण करीता तरतूद करून देणे दगडी गटारचे काम अत्यंत जरूरी आहे. ते काम ताबडतोब कार्योत्तर मंजूरी देण्यांत यावी.

सुचक : श्रीमती खान मेहरून्नीसा हमीद खान अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२८, नेहरूनगर अंतर्गत न्यु.एस.टी.कॉलनी येथे दगडी गटारचे उर्वरीत राहीलेल्या ५०% कामासाठी कॅचपीटचे कामाकरीता अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यु २१० वर असलेल्या र.रू.२५ लाख तरतूदीतून र.रू.१५ लक्ष सदर उर्वरीत काम करणेकरीता आणि उर्वरीत र.रू.१० लक्ष युनूस कॉलनी येथे डांबरीकरण करणे करीता वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९१४/११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोंढा भागातील जाफरगेट समोरील आरक्षण क्र.८२ (डब्ल्यु. एम.एस.सी.पी.) आठवडी बाजार व्यापारी संकुल व वाहतुक बेट यातील बराच भाग महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. याच आरक्षणातील न.भू.क्र.१२९५६ महानगरपालिकेने ताब्यात घेतल्यास आरक्षण विकसीत करणे शक्य होणार आहे. या भागात वाणिज्य वापरासाठी चांगला वाव असून बी.ओ.टी. तत्वावर आरक्षण विकसीत केल्यास महानगरपालिकेचा मोठ्या प्रमाणात फायदा होईल व या भागाचा विकास होईल.

तरी न.भु.क्र.१२९५६ ताब्यात घेण्याची कार्यवाही तातडीने करण्याचे योग्य होईल. मिळकतधारकांकडून खाजगी वाटाघाटी नुसार आरक्षण जागा घेवून त्यांना बाजार मुल्या दरानुसार मोबदला अदा करणे योग्य राहील. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.हाजी शेर खॉन हाजी अब्दुल रहेमान अनुमोदक : श्रीमती शमशाद बेगम शे.हफीज

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोंढा भागातील जाफरगेट समोरील आरक्षण क्र.८२ (डब्ल्यु.एम.एस.सी.पी.) पैकी न.भु.क्र.१२९५६ मिळकत धारकांकडून खाजगी वाटाघाटी नुसार जागा घेणेस व त्यांना बाजारमुल्य दरानुसार मोबदला अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळेचे विषय

**विषय क्र. ९१५ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत औरंगाबाद शहर पाणी पूरवठा योजना दिनांक ०१.०४.१९९८ पासून देखभाल, दुरूस्ती व संचलनासाठी महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेली आहे. सदर हस्तांतरणाच्या वेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे जे अभियंते प्रतिनियुक्तीवर घेण्यात आले होते त्यापैकी श्री.डी.आर.गवई (शा.अ.) यांत्रिकी व श्री.के.पी.धांडे (शाखा अभियंता) स्थापत्य यांच्या प्रतिनियुक्ती कालावधीस अनुक्रमे दिनांक ३०.०६.२००७ व दिनांक ०७.०७.२००७ पर्यंत मान्यता होती. पैकी श्री.डी.आर.गवई (शाखा अभियंता) यांत्रीकी यांची पदोन्नती झाल्यामूळे त्यांना दिनांक ३१.०५.२००७ रोजी महानगरपालिकेच्या सेवेतून कार्यमूक्त करण्यांत आले आहे. त्यामूळे आज रोजी श्री.के.पी.धांडे (शाखा अभियंता) स्थापत्य हे महानगरपालिकेच्या सेवेत जायकवाडी स्थापत्य उप विभागात प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत.

सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या जायकवाडी स्थापत्य उपविभागामार्फत, औरंगाबाद समांतर पाणी पूरवठा योजना सन २०३८, अस्तित्वातील पाणी पूरवठा योजनेची देखभाल दुरूस्ती व संचलन, औरंगाबाद शहर पुनर्रचित वितरण व्यवस्था, शासनाकडे निधी उपलब्धतेसाठी पाठवायचे विविध प्रस्ताव, पाणी व उर्जा परिक्षण, आकस्मिक उदभवणारी अपत्कालीन स्थिती आदी विविध महत्वाचे प्रकल्प राबविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

महानगरपालिकेचे उपरोक्त महत्वाकांक्षी प्रकल्प पाहता, सद्य:स्थितीत श्री.के.पी.धांडे शाखा अभियंता यांना एक वर्षासाठी म्हणजे दिनांक ०७.०७.२००८ पर्यंत प्रतिनियुक्ती कालावधीसाठी मुदतवाढ देणे योग्य राहील.

करीता श्री.के.पी.धांडे (शाखा अभियंता) स्थापत्य यांना दिनांक ०७.०७.२००८ पर्यंत मुदतवाढ देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.पिठासीन अधिकारी : विषय मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत औरंगाबाद शहर पाणी पूरवठा योजना महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेली असल्यामूळे व सदर हस्तांतरणाच्या वेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे प्रतिनियुक्तीवर घेण्यात आलेले श्री.के.पी.धांडे (शाखा अभियंता) स्थापत्य यांना दिनांक ०७.०७.२००८ पर्यंत मुदतवाढ देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ९१६ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील प्रभाग **क** मधील वॉर्ड क्रमांक २७,२८,२९,४०,४१,४२,४३,४४,४५,४६,५१,५२,५३,५४,५५,५६,५७ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्यासाठीचे अंदाजपत्रक रक्कम रूपये ३२,३०,१००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील अंदाजपत्रकीय खर्च अर्थसंकल्प २००७-०८ मधील लेखाशिर्षक ''विद्युत देखभाल व दुरूस्ती'' मधून करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

करीता सदर कामासाठी एकूण रक्कम रूपये ३२,३०,१००/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>चर्चा :</u>**

श्री.मो.जावेद मो.इसहाक : १० लक्षचे लाईट देखभाल दुरूस्तीचे काम एजन्सीला दिल्याने वेळेवर लाईट लावण्यात आलेले नसून कामाची प्रत चांगली नाही. वार्ड कार्यालय क मध्ये अनेक ठिकाणी लाईट बंद दिसून येतील. हा प्रस्ताव रद्द करून महानगरपालिकेच्या माध्यमातून लाईट देखभाल दुरूस्तीचे काम करण्यात यावे. वार्ड क च्या सर्वसदस्यांचा विरोध आहे. १०० टक्के लाईट चालू असायला पाहिजे परंतू तसे होत नव्हते. १५ -१५ दिवस लाईट लावण्यात येत नव्हते. पूर्वी प्रमाणेच चालू ठेवावे.

श्री.संजु रिडलॉन : लाईट बंद झाल्यानंतर तक्रार केल्यास त्यानंतर २४ तासाच्या आत लाईट लावणे एजन्सीला बंधनकारक असतांना लावण्यात येत नसे. अनेक वेळा दुरध्वनी करून १०-१० दिवस काम होण्याची वाट पहावी लागत असे. रेकॉर्डवर दाखवले जाते प्रत्यक्षात काम केले जात नाही. जी एजन्सी वेळेवर लाईट देखभाल दुरूस्तीचे काम करीत असेल तरच टेंडर दयावे नसता सर्व वार्ड कार्यालयाच्या लाईट देखभाल दुरूस्तीसाठी दिलेले टेंडर रद्द करावे.

श्री.रेणुकादास वैद्य : २०-२० वार्डाचे काम एका एजन्सीला देवून प्रभावीपणे काम करीत नाही. महापालिकेकडे मॅन पावर नाही खाजगीकरण करणे गरजेचे आहे परंतू चार ते पाच वार्ड मिळून एक टेंडर काढावे. जेणे करून वेळेवर लाईटची कामे होतील.

श्री.अ.रशिद खान मामु : ९८ वार्डात ९८ लोकांना द्यावे.

श्री.मेहरून्नीसा खान : एजन्सीने लाईट लावण्याचे काम वेळेवर केलेले नाही. तीन महिण्यापासून माझ्या वार्डात ६५ लाईट बंद असून तक्रार देवून ही कार्यवाही केलेली नाही.दिलेले काम रद्द करावे खाजगी एजन्सीला यापूढे काम देवू नये. ज्या एजन्सीने चांगले काम केलेले नाही त्यांचे देयक अदा करू नये.

श्री.सलिम खान : ९८ वार्डात ९८ एजन्सीला द्यावे.

श्री.मधुकर सावंत : साफसफाईचे टेंडर दिले वार्ड १०० टक्के साफसफाई होत नाही. यास कोण जबाबदार आहे.

श्री.सलीम खान : एक वार्डसाठी एका एजन्सीला ठेका देण्यात यावा.

श्री.अ.रशिद खान : ९८ वार्डासाठी ९८ एजन्सीला द्यावे.

श्री.रविकांत गवळी : खाजगी ठेकेदारामार्फत देखभाल दुरूस्तीला हरकत नाही. एका एजन्सीला किमान दोनच वार्ड देण्यात यावे.

मा. पिठासीन अधिकारी : सभागृहाच्या भावना लक्षात घेता यात एका एजन्सीला एकच वार्डातील काम देण्यात येवून ९८ वार्डसाठी ९८ एजन्सीला काम देण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील प्रभाग **क** मधील वॉर्ड क्रमांक २७,२८,२९,४०, ४१,४२,४३,४४,४५,४६,५१,५२,५३,५४,५५,५६,५७ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्यासाठीचे रक्कम रूपये ३२,३०,१००/- चे अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार एका वॉर्डासाठी एक एजन्सीला नेमण्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९१७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील प्रभाग **फ** मधील वॉर्ड क्रमांक ५०,६६, ६७,६८,६९,८५,८६,८७,८८,८९,९०,९२,९३,९६,९७,९८ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्यासाठीचे अंदाजपत्रक रक्कम रूपये ३९,२९,०००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील अंदाजपत्रकीय खर्च अर्थसंकल्प २००७-०८ मधील लेखाशिर्षक ''विद्युत देखभाल व दुरूस्ती'' मधून करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

करीता सदर कामासाठी एकूण रक्कम रूपये ३९,२९,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा.पिठासीन अधिकारी : विषय क्र ३ ते ८ मध्ये वरील विषय क्र २ प्रमाणे मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील प्रभाग **फ** मधील वॉर्ड क्रमांक ५०,६६,६७, ६८,६९,८५,८६,८७,८८,८९,९०,९२,९३,९६,९७,९८ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्यासाठीचे रक्कम रूपये ३९,२९,०००/- चे अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार एका वॉर्डासाठी एक एजन्सीला नेमण्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९१८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील प्रभाग **इ** व प्रभाग **ब** मधील उर्वरीत भागातील वॉर्ड क्रमांक २३,७०,७१,७३,७४,७५,७६,७७,७८,७९,८०,८१,८२,८३,८४,२,२०, २१,२२,१४ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्यासाठीचे अंदाजपत्रक रक्कम रूपये ३९,०७,३५७/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील अंदाजपत्रकीय खर्च अर्थसंकल्प २००७-०८ मधील लेखाशिर्षक ''विद्युत देखभाल व दुरूस्ती'' मधून करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

करीता सदर कामासाठी एकूण रक्कम रूपये ३९,०७,३५७/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील प्रभाग **इ** व प्रभाग **ब** मधील उर्वरीत भागातील वॉर्ड क्रमांक २३,७०,७१,७३,७४,७५,७६,७७,७८,७९,८०,८१,८२,८३,८४,२,२०,२१,२२,१४ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्यासाठीचे र.रू.३९,०७,३५७/- चे अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार एका वॉर्डासाठी एक एजन्सीला नेमण्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९१९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील प्रभाग **ब** अंतर्गत एन-६,एन-७,एन-८, एन-९,एन-११,एन-१२,एन-१३,मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्यासाठीचे अंदाजपत्रक रक्कम रूपये २९,९४,३५०/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील अंदाजपत्रकीय खर्च अर्थसंकल्प २००७-०८ मधील लेखाशिर्षक ''विद्युत देखभाल व दुरूस्ती'' मधून करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

करीता सदर कामासाठी एकूण रक्कम रूपये २९,९४,३५०/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील प्रभाग **ब** अंतर्गत एन-६,एन-७,एन-८, एन-९, एन-११,एन-१२,एन-१३,मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्यासाठीचे रक्कम रूपये २९,९४,३५०/- चे अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार एका वॉर्डासाठी एक एजन्सीला नेमण्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९२० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील एन-१ ते एन-५, टाऊन सेंटर व शिवाजीनगर मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्यासाठीचे अंदाजपत्रक रक्कम रूपये २९,७४,०००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील अंदाजपत्रकीय खर्च अर्थसंकल्प २००७-०८ मधील लेखाशिर्षक ''विद्युत देखभाल व दुरूस्ती'' मधून करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

करीता सदर कामासाठी एकूण रक्कम रूपये २९,७४,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील एन-१ ते एन-५, टाऊन सेंटर व शिवाजीनगर मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्यासाठीचे र.रू.२९,७४,०००/- चे अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार एका वॉर्डासाठी एक एजन्सीला नेमण्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९२१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील प्रभाग **ड** मधील वॉर्ड क्रमांक ३३,३६, ३७,३८,३९,५८,५९,६०,६१,६२,६३,६४,६५,९१,९४ व ९५ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह

पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्यासाठीचे अंदाजपत्रक रक्कम रूपये ३९,६७,३००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील अंदाजपत्रकीय खर्च अर्थसंकल्प २००७-०८ मधील लेखाशिर्षक ''विद्युत देखभाल व दुरूस्ती'' मधून करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

करीता सदर कामासाठी एकूण रक्कम रूपये ३९,६७,३००/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील प्रभाग **ड** मधील वॉर्ड क्रमांक ३३,३६,३७,३८, ३९,५८,५९,६०,६१,६२,६३,६४,६५,९१,९४ व ९५ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्यासाठीचे रक्कम रूपये ३९,६७,३००/- चे अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार एका वॉर्डासाठी एक एजन्सीला नेमण्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९२२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील प्रभाग **अ** मधील वॉर्ड क्रमांक ०१,०४, ०५,०६,०७,०८,०९,१०,११,१२,१३,३०,३१,३२,३४ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्यासाठीचे अंदाजपत्रक रक्कम रूपये ३८,९६,८५०/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील अंदाजपत्रकीय खर्च अर्थसंकल्प २००७-०८ मधील लेखाशिर्षक ''विद्युत देखभाल व दुरूस्ती'' मधून करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

करीता सदर कामासाठी एकूण रक्कम रूपये ३८,९६,८५०/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील प्रभाग **अ** मधील वॉर्ड क्रमांक ०१,०४,०५, ०६,०७,०८,०९,१०,११,१२,१३,३०,३१,३२,३४ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्यासाठीचे रक्कम रूपये ३८,९६,८५०/- चे अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार एका वॉर्डासाठी एक एजन्सीला नेमण्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९२३ :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, शहराच्या (सुधारीत) मंजुर विकास योजनेतील प्रस्तावीत (क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन) ४०.०० मी. रूंद रस्त्यापैकी हॉलिडे कॅम्प ते बीड बाय पास ४०.०० मीटर रूंद रस्त्यात बाधीत जमिनीचे भूसंपादनाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभा दिनांक १८.०५.२००७ मधील ठराव क्रमांक ८०७/६ नूसार मंजुर झालेला आहे. त्यानुसार भूसंपादनाचा रितसर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे सादर करण्याच्या कार्यवाही अंतर्गत आहे.

मध्यंतरी उक्त रस्त्यात बाधीत मिळकत न.भू.क्र.१९२५९ चे मिळकत धारक मेसर्स अस्मिरा कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी उक्त मिळकती मधील बाधीत क्षेत्राचा मोबदला खाजगी वाटाघाटीने घेण्यासाठी विनंती अर्ज सादर केला आहे. वरील न.भू.क्र.१९२५९ मधील जागा उक्त ४०.०० मी.रूंद विकास योजना रस्त्यात अंशत: बाधीत होत आहे. शहराच्या मूळ विकास योजनेतील (सन १९७५) उक्त रस्ता ३०.०० मी रूंदीचा प्रस्तावित होता. उक्त मिळकतीचे ३०.०० मी. रूंद विकास योजना रस्त्यात बाधीत क्षेत्र ४९४.७०

चौ.मी. चा मोबदला विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक औरंगाबाद यांचेकडून मिळकत धारकास देण्यांत आलेला असून उक्त ३०.०० मी. रूंद रस्त्यात बाधीत क्षेत्र ४९४.७० चौ.मी. चा ताबा महानगरपालिकेला विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक औरंगाबाद यांचेकडून मिळालेला आहे. शहराच्या (सुधारीत) विकास योजनेतील प्रस्तावानुसार ३०.०० मी. रूंदीचा रस्ता ४०.०० मी. रूंद प्रस्तावित आहे.अर्जदाराने४०.०० मीटर रूंद रस्त्यात बाधीत क्षेत्राच्या मोबदल्याची मागणी केलेली आहे.खाजगी वाटाघाटीने मोबदला देण्यास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सक्षम कार्यालयाकडून रितसर मोजणीनुसार उक्त रस्त्यात बाधीत होणाऱ्या क्षेत्र मोबदल्यासाठी विचारात घेण्यात येईल.

करीता न.भू.क्र.१९२५९ मधील ४०.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्यात बाधीत क्षेत्राचे खाजगी वाटाघाटीने संपादन करण्यास भूसंपादनाचा प्रस्ताव भूसंपादनाच्या खर्चासह मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.अ.रशिद खॉन मामू : या जमिनीवर आरक्षण क्र.३२८ कमर्शियल आहे. पूर्वी ३० मी. चे केले आता कमर्शियल आहे. ३५ मी. पर्यत जागा घेत आहे, कमर्शियल रेट द्यावे.

मा.पिठासीन अधिकारी : या विषयाच्या संदर्भात नगररचना विभागाने नियमानूसार कमर्शियलप्रमाणे दर देण्यात यावे. या प्रस्तावास स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :मोबदला कूणाला दयायचा जागा कूणाची आहे या संदर्भात महानगरपालिकेने पूर्ण खात्री केल्याशिवाय देवू नये.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सुधारीत मंजुर विकास योजनेतील प्रस्तावीत क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन या ४०.०० मी. रूंद विकास योजना रस्त्यापैकी न.भू.क्र.१९२५९ या मिळकतीचे बाधीत क्षेत्र खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करण्यास व विषयाच्या संदर्भात नगर रचना विभागाने नियमानुसार कमर्शियल दर देय असल्यास त्यानुसार मोबदला देणेस व भूसंपादनासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९२४ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद शहरात सद्यस्थितीत महानगरपालिकेने शहरातील नागरीक आणि खेळाडुंकरिता विविध ठिकाणी संकुले व खेळांची मैदाने तसेच क्रिडा सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत. परंतु या बाबत शहरातील नागरीकांना पूर्ण कल्पना व सुविधांची माहिती नसल्याने त्यांना त्याचा उपभोग घेता येत नाही. त्या करीता या उपलब्ध असलेल्या ठिकाणी एकूण सहा नागरी क्रिडा केंद्राची स्थापना करून त्या ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या क्रिडा सुविधा, क्रिडा प्रकार, प्रशिक्षण शिबीरे यांची एकत्रित माहिती नागरीकांना व खेळाडूंना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या प्रस्तावाद्वारे करण्याचा विचार असून यामूळे शहरातील खेळाडूंची प्रगती व्हावी व नागरीकांचे स्वास्थ चांगले रहावे हा दृष्टीकोण ठेवून तसेच शहरातील क्रिडाक्षेत्रात आमुलाग्र बदल करण्याचा विचार समोर ठेवून शहरातील क्रिडापटुंनी राज्यस्तरावर व राष्ट्रीय स्तराव नावलौकिक मिळावा या उद्देशाने खालीलप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रात एकूण सहा नागरी क्रिडा केंद्राची स्थापना करण्यात येत आहे.

केंद्राचे नांव

०१. सिध्दार्थ जलतरण तलाव क्रिडा केंद्र

०२. बन्सीलालनगर क्रिडा केंद्र

०३. ज्योतीनगर क्रिडा केंद्र

०४. सिडको एन-३ क्रिडा केंद्र
०५. एन-२ सिडको क्रिडा केंद्र
०६. एन-५, टाऊन सेंटर क्रिडा केंद्र

सदर केंद्रावर एक केंद्र प्रमुख, दोन सहाय्यक कर्मचारी व आवश्यकतेनुसार स्वच्छता कर्मचारी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. उपरोक्त केंद्रावर शिक्षण विभाग व क्रिडा विभागाशी संबंधीत महानगरपालिका अस्थापनेवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांमधूनच नियुक्त करण्यात येणार आहे तसेच उपरोक्त केंद्राच्या नियंत्रणाकरीता एक समन्वयक असेल तसेच या सर्वांवर एक मुख्य नियंत्रक असेल.

प्रत्येक केंद्रावर शहरातील विविध ठिकाणी असलेल्या क्रिडा संकुलांची व त्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या सुविधांबाबतची संपूर्ण माहिती, शहरातील विविध खेळातील नामांकित खेळाडू, नामांकित प्रशिक्षक व त्यांच्या मार्फत घेण्यात येणारी प्रशिक्षण शिबीरांची माहिती या ठिकाणी उपलब्ध करून देण्यांत येईल. उपरोक्त सहा केंद्रे संगणकीय कार्यप्रणालीद्वारे जोडण्यात येवून प्रत्येक केंद्राकरीता विशेष दूरध्वनी सेवा उपलब्ध करून देण्यांत येईल.

याच माध्यमातून शहरातील नागरीक,खेळाडू/प्रशिक्षक प्रत्येक क्रिडा केंद्रावर चालू असणाऱ्या क्रिडाप्रकारांची व प्रशिक्षण शिबीरांची अद्यावत माहिती प्राप्त करून घेवू शकतील व त्याचा उपयोग घेवू शकतील.

महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेली क्रिडांगणे, तसेच जलतरण तलाव व इतर सुविधा केंद्रे इत्यादी मार्फत शहरात विविध ठिकाणी सद्यस्थितीत उपलब्ध असलेले खेळांच्या प्रकारांची माहिती व शहरातील विविध खेळातील नामाकिंत क्रिडापटु व प्रशिक्षक यांना उपरोक्त क्रिडासंकुलात प्रशिक्षण शिबीरे चालविण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेनुसार व निर्धारित केलेल्या शुल्क आकारून प्रशिक्षण शिबीरे चालविण्यासाठी परवानगी देण्यांत येईल.

वरीलप्रमाणे सहा नागरी क्रिडा केंद्रावर महानगरपालिका अस्थापनेवरील कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत असल्याने त्यांच्यावर होणारा प्रशासकीय खर्चाचा अतिरिक्त बोजा महानगरपालिकेवर राहणार नाही. सोबत क्रिडा केंद्रातील उपलब्ध सुविधा, क्रिडा प्रकार,प्रशिक्षण शुल्क,क्रिडांगण शुल्क या बाबतची सविस्तर माहिती प्रस्तावासोबत जोडण्यात आली आहे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव व धोरणात्मक निर्णयास्तव सादर.

मा.महापौर : विषय मंजूर.

<u>**ठराव :**</u>

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात नागरीक आणि खेळाडूंकरीता विविध ठिकाणी संकुले व खेळांची मैदाने तसेच क्रिडा सुविधा उपलब्ध केलेल्या असून याबाबत शहरातील नागरीकांना पूर्ण कल्पना व सुविधांची माहिती व्हावी व त्याचा उपभोग घेता यावा. त्याकरीता उपलब्ध असलेल्या ठिकाणी प्रस्तावात नमूद केल्यानुसार एकूण सहा नागरी क्रिडा केंद्राची (सिटीजन्स स्पोर्ट क्लब) स्थापना करण्यास तसेच प्रस्तावासोबत दर्शविण्यांत आलेल्या क्रिडा केंद्रावरील क्रिडेच्या सविस्तर प्रकारास तसेच वैयक्तिक शुल्क,सांघिक शुल्क,प्रशिक्षण शुल्क व स्पर्धा शुल्क नमूद केल्यानुसार आकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.महापौर : ऐनवेळी लेखाशिर्षक बदलण्याचे प्रस्ताव आलेले आहे, ते सर्व मंजूर करण्यात येते. तसेच प्रशासकीय विषय आलेले आहे, ते नगर सचिव वाचून दाखवतील.

**विषय क्र. ९२५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.५५ मो.कैसर कॉलनी येथे नॅशनल बाम्बु ते श्री.हमीद खान यांचे घर ते ए-१ बकरा शॉप ते चंपा चौक,चंपा मस्जीद ते लोकमान्य ब्लड बँक पर्यंत मुख्य रस्त्यालगत सी.आर.एस.गटार बांधून त्यावर आर.सी.सी.स्लॅब कव्हर करणेच्या कामाचे अ.प.म.जी.प्रा/सा.बा.दरसूची २००६-०७ प्रमाणे रू.४४,६०,०००/- चे तयार करण्यात आले आहे.

या कामासाठी २००७-०८ च्या अर्थसंकल्पात खूल्या गटारी बांधणे या लेखाशीर्ष अंतर्गत मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेली तरतूद र.रू.१०.०० लक्ष (पा.क्र.डब्ल्यु २३२ अ.क्र.७) व स्थायी समितीने शिफारस केलेली तरतूद र.रू.२०.०० लक्ष (पा.क्र.डब्ल्यु २१० अ.क्र.१६) अशी एकूण र.रू.३०.०० लक्ष उपलब्ध झालेल्या तरतूदीमधून हे काम प्रस्तावित करण्यात आले आहे.

मो.कैसर कॉलनी निवासी भागाची भौगोलीक स्थिती उंच व खोलगट आहे. शहरात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडल्यावर कैसर कॉलनी भागात नॅशनल बाम्बू ते हमीद खान सेल्स टॅक्सवाले यांच्या घरापर्यंत आणि रस्त्यावरील घरात पावसाचे सांडपाणी शिरते. मागील वर्षी देखिल पावसाचे सांडपाणी नागरीकांच्या घरात मोठ्या प्रमाणावर शिरले होते. करिता सदरील भागातून पावसाचे सांड पाणी सुलभरित्या काढण्यासाठी मुख्य रस्त्यामधून उपरोक्त नमूद मार्गक्रमाने सी.आर.एस.गटार बांधणेची आवश्यकता आहे.

उपरोक्त नमूद केल्यानूसार अर्थसंकल्प २००७-०८ मध्ये हे काम करण्यासाठी र.रू.३०.०० लक्ष ची तरतूद उपलब्ध आहे. उर्वरीत र.रू.१४.६० लक्ष काम पूर्ण करणेसाठी सध्या कमी पडत आहे. म्हणून र.रू.३०.०० लक्ष मधून उपरोक्त कामाचा पहिला टप्पा सुरूवात करून घेणे व उर्वरीत लागणारी तरतूद र.रू.१४.६० लक्ष उपलब्धतेनुसार पुढील काम हाती घेण्याचे प्रस्तावित आहे.

अंदाजपत्रक रक्कम रू.४४,६०,०००/- मंजुरीस्तव व उपरोक्त दर्शविल्यानुसार काम करणेस मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा.महापौर : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५५ मो.कैसर कॉलनी येथे नॅशनल बाम्बु ते श्री.हमीद खान यांचे घर ते ए-१ बकरा शॉप ते चंपा चौक,चंपा मस्जीद ते लोकमान्य ब्लड बँक पर्यंत मुख्य रस्त्यालगत सी.आर.एस.गटार बांधून त्यावर आर.सी.सी.स्लॅब कव्हर करणेच्या कामाचे र.रू.४४,६०,०००/- चे अंदाजत्रकास मान्यता देण्यांत येते. तसेच या कामासाठी २००७-०८ च्या अर्थसंकल्पात खूल्या गटारी बांधणे या लेखाशीर्ष अंतर्गत मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेली तरतूद र.रू.१०.०० लक्ष (पा.क्र.डब्ल्यु २३२ अ.क्र.७) व स्थायी समितीने शिफारस केलेली तरतूद र.रू.२०.०० लक्ष (पा.क्र.डब्ल्यु २१० अ.क्र.१६) अशी एकूण र.रू.३०.०० लक्ष उपलब्ध झालेल्या तरतूदीमधून पहील्या टप्प्याचे काम सुरू करणेस तसेच उर्वरीत लागणारी तरतूद र.रू.१४.६० लक्ष उपलब्धतेनुसार पूढील काम हाती घेण्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९२६ :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी सुधारीत प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला त्यांचे ड्रम प्रकल्प (Drum Project) औरंगाबाद शहराच्या भविष्यातील विजेची निकड व वितरण व्यवस्थेत सुधारणा करणेसाठी, शहराच्या विविध भागात विद्युत उपकेंद्र उभारणेसाठी जमिन उपलब्ध करून देणे बाबत विनंती केली आहे.

भारत सरकार व अमेरिका या दोन्ही देशाच्या संयुक्त सहभाग असलेला संपूर्ण केंद्र शासन अनुदानीत प्रकल्प असून विद्युत वितरण प्रणालीमध्ये आमुलाग्र बदल घडवून आणणेसाठी पथदर्शी प्रकल्प अंतर्गत देशातील तीन राज्याची निवड झालेली असून या मध्ये औरंगाबाद शहराची निवड झाली आहे.

महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीने शहरातील, समाधान कॉलनी येथील उद्यान आरक्षणाखालील पैकी (आरक्षण क्रमांक ३१६-न.भू.क्र.१८०९० ते १८०९२ व २०१८३ / पैकी) जागा अंदाजे ४००० चौ.मी. जागा शिघ्रसिध्द गणक दरानुसार, आकारणी करून मालकी हक्काने खरेदीने देणे बाबत विनंती केलेली आहे. यापूर्वीच्या विषय क्रमांक ७५०/३ च्या अनुषंगाने सुधारित परिपूर्ण प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

उक्त नमुद प्रमाणे जागा विद्युत वितरण कंपनीस देणेसाठी, औरंगाबाद शहराच्या मंजुर व अस्तित्वात असलेल्या विकास योजनानुसार समाधान कॉलनी येथील जागा उद्यान आरक्षणाखाली असून सदर मिळकत महानगरपालिकेच्या मालकीची आहे. सदर जागा विद्युत वितरण कंपनीस देणे पूर्वी सदर भूखंडाचे आरक्षण महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम -३७ (१) अन्वये फेरबदल करणे आवश्यक आहे. यासाठी मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक असून तद्नंतर परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करता येईल.

सदर प्रकल्प शहराच्या दृष्टीने महत्वाचा व उपयोगी असून विद्युत वितरण कंपनीस उक्त नमूद जागे व्यतिरिक्त शहरात इतर ही ठिकाणी जागेची आवश्यकता भासणार आहे. सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे, फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करणे इत्यादी बाबीच्या पूर्ततेनंतर शासन मान्यता झाल्यानंतर विद्युत वितरण कंपनीस जागा उपलब्ध करून देणे या प्रक्रीयेस बराच कालावधी खर्ची पडतो व यातून सदर प्रकल्पास होणारा विलंब होतो सदर विलंब टाळणेसाठी विद्युत वितरण कंपनीने मागणी केल्यानुसार महानगरपालिकेने उक्त नमुद प्रमाणे जमिन योग्य ती कार्यवाही करून जमिन सत्वर उपलब्ध करून देणेसाठी योग्य ती कार्यवाही करणेचे अधिकार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-३७ अन्वये मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करणे आवश्यक आहे. करीता वरीलप्रमाणे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य : महापालिकेच्या मालकीच्या जागा असतील त्या ड्रम प्रोजेक्ट साठी वापरण्यास व त्यांचे अधिकार मा. आयुक्तांना देण्यास हरकत नाही परंतू खाजगी जागा असेल त्या या प्रोजेक्टसाठी वापरली जाणार आहे अशा जागाचे भुसंपादनाचे प्रस्ताव नव्याने या सभागृहात मंजूरीसाठी येणे आवश्यक आहे.

श्री.संजय जोशी : सुधारीत प्रस्ताव आलेला आहे. यापूर्वी दि. २८.२.२००७ रोजी ठराव क्र. ७५०/३ आलेला होता. त्यात चाणक्यपूरी, समाधान कॉलनी, तसेच जिल्हा परीषदेच्या मागिल बाजूचा उल्लेख होता. सुधारीत या प्रस्तावात या भागाची नावे वगळली गेली आहे.

मा. महापौर : यापूर्वी तीन जागेला मंजूरी दिलेली होती.

श्री.संजय जोशी : यापूर्वीच्या ठरावात समाधान कॉलनीच्या जागेला मंजूरी दिलेली होती ठराव वाचून दाखवतो. यात फक्त समाधान कॉलनीचाच उल्लेख केला.

मा. महापौर : समाधान कॉलनीच्या जागेला मंजूरी दिलेली आहे तेथून सूरूवात आहे. तसेच ज्या शहरातील जागा लागतील त्याजागेचे अधिकार मा.आयुक्तांना दयावे असा प्रस्ताव आहे.

श्री.संजय जोशी : जो प्रस्ताव आलेला आहे तो समाधान कॉलनीच्या जागेपूरताच आहे नसेल तर तसा खूलासा करावा.सुधारीत करून सादर केला यापूर्वी मंजूर झालेल्या ठरावा विषयी काय निर्णय घेणार आहे. ड्रम प्रोजेक्टसाठी शहरात कूठेच आरक्षण नाही. प्रोजेक्ट मुळात नवीन आहे.

मा. महापौर : समाधान कॉलनीमधील जागा ही उद्यान आरक्षणासाठी आहे. जी जागा आपण घेत आहोत त्यावरती उद्यानसाठी आरक्षण आहे त्या आरक्षणास मॉडीफिकेशन करण्याची परवानगी दयायची आहे.

श्री.संजय जोशी : प्रत्येक ठिकाणचे आरक्षण बदलावे लागणार आहे. चाणक्यपूरी येथे सूध्दा उद्यानसाठी आरक्षण आहे. त्याचा उल्लेख का यात केलेला नाही.

मा.महापौर : आरक्षण बदलावयाचे असेल तर परत प्रशासनाने तसा दुसरा प्रस्ताव ठेवावा आताच स.सदस्य श्री.रेणुकादास वैद्य यांनी म्हटल्याप्रमाणे ज्या महापालिकेच्या जागा आहे त्या जागेवरील आरक्षण काढण्याचे अधिकार या सभागृहालाच आहे.

श्री.संजय जोशी : सूधारीत प्रस्तावात तीन नाव का वगळले गेले प्रशासनाने खूलासा करावा.

मा. महापौर :एमएसईबी मार्फत आलेला प्रोजेक्ट आहे त्यांना विचारणा करावी लागेल.

श्री.गजानन बारवाल :आरक्षण बदणार आहोत परंतू तसे केल्यास मूळ मालकास क्लेम करण्याचा अधिकार आहे. पैठणगेट येथील श्री.अग्रवालच्या जागेच्या संदर्भात आरक्षण बदलून शॉपींग कॉम्प्लेक्स काढले आता महापालिकेला त्याचा त्रास होत आहे म्हणून कायदेशीर बाबी तपासून या बाबत कार्यवाही करावी.

मा. महापौर : महापालिकेच्या हद्दीमध्ये हे ड्रम प्रोजेक्टचे काम करीत असतांना ज्या जागा लागतील त्याचे मॉडीफिकेशन करण्याचे अधिकार मा.आयुक्तांना देण्यात येते. वेळोवेळी सर्वसाधारण सभेसमोर तसे प्रस्ताव प्रशासनाने आणावे. त्याप्रमाणे मा.आयुक्तांनी मॉडीफिकेशन करावे व ड्रम प्रोजेक्टसाठी जागा उपलब्ध करून दयावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला औरंगाबाद शहरात ड्रम प्रोजेक्ट साठी आरक्षण क्र.३१६,समाधान कॉलनी येथील उद्यानासाठी आरक्षित असलेल्या न.भू.क्र.१८०९० ते १८०९२ व २०१८३ पैकी सुमारे ४०००.०० चौ.मी. जागा देणे आणि या आरक्षणासह सर्वसाधारण सभा दि.२८.०२.२००७ विषय क्र.७५०/३ मध्ये प्रस्तावित आरक्षणाच्या जमिनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या ड्रम प्रोजक्टच्या वापरासाठी फेरबदल करणेस आणि सदर फेरबदलाची संपूर्ण कार्यवाही जसे अधिसूचना काढणे, हरकती व सूचना मागविणे, हितसंबंधीतांना सुनावणी देणे व परिपूर्ण प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी पाठविणे ई. अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९२७ :**

आयुक्त,महानगरपालिका यांचेकडून प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सिडको भागातील रस्त्यालगत ग्रिनबेल्ट विकसीत करणे करीता सा.बां.विभागाचे सन २००५-०६ च्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रूपये ७४,९८,९३१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील अंदाजपत्रक

मान्यतेबाबतचा प्रस्ताव दिनांक २०.०४.२००७ रोजी मा.सर्वसाधारण सभेसमोर विषय क्र२ अन्वये सादर करण्यांत आलेला होता. दिनांक १८.०५.२००७ चे इतिवृत्त विषय क्र.८०३/२ अन्वये सदरील प्रस्तावा संदर्भाने सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे शहरातील विविध २० रस्त्यांचे सुशोभिकरण व ग्रीनरी लावणार असून वाहतुक बेट व इतर विकास ते करणार आहेत. यादीत १७ रस्ते आहेत त्यात या रस्त्याचा समावेश करून तसा फेर प्रस्ताव सभागृहासमोर सादर करण्यात यावा असा ठराव पारित करण्यात आलेला आहे.

तथापी सदरील काम हे सिडकोकडून प्राप्त झालेल्या १५.०० कोटी रूपयामधून प्रस्तावित करण्यात आलेले असून सदरील कामाचा खर्च सन २००६-०७ या आर्थिक वर्षा अंतर्गत पान क्र.डब्ल्यु १६६ अ.क्र.२० नुसार ठेवण्यात आलेल्या तरतुदी अंतर्गत करण्यात येईल.

जळगाव टी पॉईट ते गरवारे पर्यंत रस्त्याच्या दुतर्फा ग्रिन बेल्ट विकसीत करून दोन्ही बाजूने चैन लिंक करण्यात येणार आहे. मध्यभागी फुटपाथ ठेवण्यात येणार असून नागरीकांना पायी फिरता येईल. त्याचप्रमाणे तेथे ग्रिनरी विकसीत करून त्यात स्ट्रीट फर्निचर विकसीत करावयाचे आहे. तसेच दोन तीन ठिकाणी सुलभ पध्दतीचे वेगवेगळ्या सुविधा देणारे प्रसाधनगृह बांधावयाचे आहे. सदरील काम हे रस्ते विभागाशी संबंधीत नसून कार्यकारी अभियंता (विद्युत,ड्रेनेज,इमारती व उद्याने) या विभागामार्फत राबविण्यात येणार आहे.

त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये ७४,९८,९३१/- चा फेरप्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.भाऊसाहेब ताठे : जळगांव टी पॉईट हर्सूल टी पॉईट या रस्त्याचे दुतर्फा काम करण्यास यात समावेश करण्यात यावा.

श्री.रविकांत गवळी : दिल्ली गेट ते जळगांव टी पॉईट ते सिडको बसस्टँड सिडकोने ग्रीन झोन डेव्हलप केलेले आहे. त्यानुसार अमंलबजावणी करावी.

श्री.अनिल जैस्वाल : या रस्त्यावरील अगोदर अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी नंतरच खर्च करावा.

मा.महापौर : अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी,दुरूस्तीसह मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको भागातील रस्त्यालगत ग्रिनबेल्ट विकसीत करणे करीता र.रू.७४,९८,९३१/- चे अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार जळगांव टी पॉईट हर्सूल टी पॉईट या रस्त्याचे दुतर्फा काम करण्यास आणि दिल्ली गेट ते जळगांव टी पॉईट ते सिडको बसस्टँड सिडकोने ग्रीन झोन डेव्हलप केलेले आहे, त्यानुसार अमंलबजावणी करणेस तसेच अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करणे या दुरूस्तीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९२८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय (घाटी) परिसरातील रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करणे. यासाठी दि.६.१२.२००६ रोजी अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,औरंगाबाद यांच्या दालनात संबंधीत विभागाचे अधिकारी व मनपा पदाधिकारी व अधिकारी यांच्या संयुक्त बैठकीत अधिष्ठाता यांनी सदर परिसरातील रस्त्यांची स्थिती खुपच खराब झालेली असल्यामूळे रूग्णालयात येणाऱ्या रूग्णांची गैरसोय टाळणेसाठी सदर भागातील डांबरीकरण

महानगरपालिकेतर्फे करणे बाबत विनंती केली होती. त्यानुसार विभागाने सदरील कामाचा प्रस्ताव धोरणात्मक निर्णयास्तव व मंजुरीस्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर यापूर्वी सादर केलेला आहे. त्यास ठराव क्र.८१८/८ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदर कामास सन २००७-०८ या आर्थिक वर्षात पुनर्डांबरीकरण या लेखाशिर्षांतर्गत तरतूद उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. परंतू सदरील काम हे महानगरपालिका कार्यक्षेत्राबाहेरचे असल्या कारणाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८९ नुसार मनपा कार्यक्षेत्राबाहेर खर्च करण्याकरीता मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक असल्यामूळे सदरील कामाचा सुधारीत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय (घाटी) परिसरातील रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करणेकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८९ नुसार सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९२९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.३२ अंतर्गत अर्थसंकल्पातील कामाचे लेखाशिर्षक बदलणेस्तव परवानगी मिळणे बाबत.

| अ.क्र. | पा.क्र. | अर्थसंकल्प २००७- ०८ अ.क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव | अ.प.र.रू. (आकडे हजारात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | W-65 | ०८ | प्रभाग ३२, बुढिलाईन येथे कब्रस्तानची दुरूस्ती करणे बाबत | मा.कबाडीपुरा येथील १५० मी मी व्यासाची आरसीसी लाईन काढून नविन २५० मी मी व्यासाची एसडब्ल्युजी लाईन टाकणे | २०० |
| २ | W-73 | ०९ | प्रभाग ३२ बुढिलाईन अंतर्गत विविध ठिकाणी खूल्या गटारी बांधणे | मो.किलेअर्क येथे जूनी आरसीसी ड्रेनेज लाईन काढून नविन एसडब्ल्युजी लाईन टाकणे | ४८० |

उपरोक्त प्रमाणे लेखाशिर्ष बदलून सुधारीत काम करणेस्तव परवानगी द्यावी हि विनंती.

सुचक : श्री.जावेद हसन खान अनुमोदक : श्रीमती मोमीन सफिया, श्री.सलिम खान यासीन खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.३२ करीता अर्थसंकल्पातील खालीलप्रमाणे कामाचे लेखाशिर्षक बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | पा.क्र. | अर्थसंकल्प २००७- ०८ अ.क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव | अ.प.र.रू. (आकडे हजारात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | W-65 | ०८ | प्रभाग ३२, बुढिलाईन येथे कब्रस्तानची दुरूस्ती करणे बाबत | मा.कबाडीपुरा येथील १५० मी मी व्यासाची आरसीसी लाईन काढून नविन २५० मी मी व्यासाची एसडब्ल्युजी लाईन टाकणे | २०० |
| २ | W-73 | ०९ | प्रभाग ३२ बुढिलाईन अंतर्गत विविध ठिकाणी खूल्या गटारी बांधणे | मो.किलेअर्क येथे जूनी आरसीसी ड्रेनेज लाईन काढून नविन एसडब्ल्युजी लाईन टाकणे | ४८० |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९३० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,महानगरपालिकेच्या सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्र.१९८ वर प्रभाग क्र.३५ अंतर्गत सिध्दार्थ उद्यानात फायबरची खेळणी बसविणे या कामासाठी र.रू.१५.००लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे.परंतू त्या कामाऐवजी प्रभाग क्र.३५ मध्ये कोतवालपुरा येथे ड्रेनेज लाईन कामासाठी र.रू.५.५ लाख व पेव्हर ब्लॉक बसविणेसाठी ९.५ लाख रूपये वळती करण्यात यावे. करिता प्रस्ताव सर्व साधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक- श्री अ.रशिद खान(मामू)    अनुमोदक-श्री.शेख इब्राहिम पटेल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्र.१९८ वर प्रभाग क्र.३५ अंतर्गत सिध्दार्थ उद्यानात फायबरची खेळणी बसविणे या कामासाठी ठेवण्यांत आलेली र.रू.१५.००लाखाची तरतुद **याऐवजी** प्रभाग क्र.३५ मध्ये कोतवालपुरा येथे ड्रेनेज लाईन कामासाठी र.रू.५.५ लाख व पेव्हर ब्लॉक बसविणेसाठी ९.५ लाख रूपये वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९३१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प २००७-०८ मध्ये पृष्ट क्र.२२६ वर अ.क्र.१२ प्रभाग क्र.३५ अंतर्गत विविध विकासाची कामे करण्याकरीता रक्कम रूपये १५.०० लक्षाची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर रक्कमेतून सिध्दार्थ उद्यान येथील नाल्या लगतची संरक्षण भिंत बांधणे या कामासाठी रक्कम रूपये ५,८४,०००/- वळती करण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक- श्री अ.रशिद खान(मामू)    अनुमोदक-श्री.संतोष खेंडके पाटील

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा अर्थसंकल्प २००७-०८ मध्ये पृष्ट क्र.२२६ वर अ.क्र.१२ मध्ये प्रभाग क्र.३५ अंतर्गत विविध विकासाची कामे करण्याकरीता ठेवण्यांत आलेल्या र.रू.१५.०० लक्ष तरतूदीमधून सिध्दार्थ उद्यान येथील नाल्या लगतची संरक्षण भिंत बांधणे या कामासाठी रक्कम रूपये ५,८४,०००/- वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९३२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यू-२१४ अनु.क्र.३ मध्ये वार्ड क्र.२ मयुरपार्क जाधववाडीमध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे करीता र.रू.९ लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे.

सदर रक्कम उपरोक्त कामाकरीता अपुरी पडत असल्याने अर्थसंकल्पातील तरतूद करण्यात आलेल्या खालील दोन्ही तरतूदीतुन अनुक्रमे १४ लक्ष आणि ९ लक्ष ही एकूण २३ लक्ष र.रू.मयुरपार्क जाधववाडीमध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणेच्या कामामध्ये (पान क्र.डब्ल्यू २१४ अनु.क्र.३) वळती करण्यात यावी.

०१. पान क्र.डब्ल्यू १८४/१-वार्ड क्र.२ मयुरपार्क जाधववाडीमध्ये नविन खडी रस्ता तयार करणे र.रू.१४ लक्ष आणि

०२. पान क्र.डब्ल्यू २०७/२-वार्ड क्र.२ मयुरपार्क जाधववाडीमध्ये विविध ठिकाणी जलनि:सारण वाहिनी टाकणे-र.रू.९ लक्ष करिता प्रस्ताव मा.सर्व साधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक- श्री सिताराम सुरे    अनुमोदक- श्री प्रकाश अत्तरदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यू-२१४ अनु.क्र.३ मध्ये वार्ड क्र.२ मयुरपार्क जाधववाडीमध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे करीता र.रू.९ लक्षची करण्यांत आलेली तरतूद अपुरी पडत असल्याने अर्थसंकल्पात करण्यांत आलेली खालीलप्रमाणे तरतूद सदर कामासाठी वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

०१. पान क्र.डब्ल्यू १८४/१-वार्ड क्र.२ मयुरपार्क जाधववाडीमध्ये नविन खडी रस्ता तयार करणे र.रू.१४ लक्ष आणि

०२.पान क्र.डब्ल्यू २०७/२-वार्ड क्र.२ मयुरपार्क जाधववाडीमध्ये विविध ठिकाणी जलनि:सारण वाहिनी टाकणे-र.रू.९ लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९३३ :**

अंदाजपत्रक २००७-०८ मधील प्रभाग क्र.६५ मधील विकास कामाचे लेखाशिर्षमध्ये बदल करणे बाबत.

| अ.क्र. | अर्थसंकल्प पा.क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|---|
| २९ | डब्ल्यू ११८ | पुर्नडांबरीकरण शहर भाग प्रभाग क्र.६५ कुशलनगर येथे डांबरीकरण करणे.५ लक्ष | कुशलनगर येथे उद्यान विकासीत करणे. |
| १० | डब्ल्यू १२१ | स्मशान भूमी विकास प्रभाग क्र.६५ बोहरा कब्रस्थान कुंपन भिंमतीची उंची वाढवण्यासह इतर कामे करणे.३ लक्ष | रणजितनगर येथे उद्यान विकासीत करणे. |
| ३८ | डब्ल्यू १२४ | प्रभाग क्र.६५ कुशलनगर येथे पुथपाथ बनविणे.८ लक्ष | सिंधीकॉलनी येथे उद्यान विकासीत करणे. |
| ३७ | डब्ल्यू १३१ | भांडवली कामे जलनि:सारण प्रभाग क्र.६५ मो.एस.बी.ओ.कॉलनी येथे गटार बांधणे व ढापे टाकणे ३ लक्ष | रामानंदकॉलनी व स्टेट बँक कॉलनी येथे उद्यान विकासीत करणे. |

सुचक - श्री मधुकर सावंत

अनुमोदक- १) श्री काशिनाथ कोकाटे २) सौ.विजयाताई रहाटकर ३)श्री महेश माळवतकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.६५ करीता अर्थसंकल्प २००७-२००८ मधील खालीलप्रमाणे कामांचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्प पा.क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|---|
| २९ | डब्ल्यू ११८ | पुर्नडांबरीकरण शहर भाग प्रभाग क्र.६५ कुशलनगर येथे डांबरीकरण करणे.५ लक्ष | कुशलनगर येथे उद्यान विकासीत करणे. |
| १० | डब्ल्यू १२१ | स्मशान भूमी विकास प्रभाग क्र.६५ बोहरा कब्रस्थान कुंपन भिंमतीची उंची वाढवण्यासह इतर कामे करणे.३ लक्ष | रणजितनगर येथे उद्यान विकासीत करणे. |
| ३८ | डब्ल्यू १२४ | प्रभाग क्र.६५ कुशलनगर येथे पुथपाथ बनविणे.८ लक्ष | सिंधीकॉलनी येथे उद्यान विकसीत करणे. |
| ३७ | डब्ल्यू १३१ | भांडवली कामे जलनि:सारण प्रभाग क्र.६५ | रामानंदकॉलनी व स्टेट बँक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मो.एस.बी.ओ.कॉलनी येथे गटार बांधणे व ढापे टाकणे ३ लक्ष | कॉलनी येथे उद्यान विकासीत करणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९३४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,प्रभाग क्र.४७ सिडको एन-६ येथील खालील कामांचे लेखा शिर्षक बदलण्यासाठी प्रस्ताव सर्व साधारण सभेत विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखा शिर्षक | नविन लेखा शिर्षक |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्र.४७ येथील मातामंदिर ते अविष्कार चौक रस्त्याचे डांबरीकरण करणे.<br>पृ.क्र.४,अ.क्र.३२ तरतुद रक्कम १० लक्ष | प्रभाग क्र.४७ येथील मध्यवर्ती जकात नाका ते आझाद चौक नाली बनविणे. |
| २. | प्रभाग क्र.४७ कब्रस्थान विकसीत करणे.<br>पृ.क्र.१०१ अ.क्र.५ तरतुद रक्कम ५.७० लक्ष | प्रभाग क्र.४७ मध्ये विविध ठिकाणी अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे. |
| ३. | प्रभाग क्र.४७ स्मशान भूमी विकसीत करणे.<br>पृ.क्र.८० अ.क्र.२ तरतुद रक्कम २.४०लक्ष | प्रभाग क्र.४७ ई-५/२ समोरील खुल्या जागेवर शेड बनविणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. |

सुचक- सौ.छाया विलास राऊत                    अनुमोदक- श्री जैस्वाल अनिल जुगललाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.४७ सिडको एन-६ येथील खालील कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखा शिर्षक | नविन लेखा शिर्षक |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्र.४७ येथील मातामंदिर ते अविष्कार चौक रस्त्याचे डांबरीकरण करणे.<br>पृ.क्र.४,अ.क्र.३२ तरतुद रक्कम १० लक्ष | प्रभाग क्र.४७ येथील मध्यवर्ती जकात नाका ते आझाद चौक नाली बनविणे. |
| २. | प्रभाग क्र.४७ कब्रस्थान विकसीत करणे.<br>पृ.क्र.१०१ अ.क्र.५ तरतुद रक्कम ५.७० लक्ष | प्रभाग क्र.४७ मध्ये विविध ठिकाणी अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे. |
| ३. | प्रभाग क्र.४७ स्मशान भूमी विकसीत करणे.<br>पृ.क्र.८० अ.क्र.२ तरतुद रक्कम २.४०लक्ष | प्रभाग क्र.४७ ई-५/२ समोरील खुल्या जागेवर शेड बनविणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९३५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.१९ अंतर्गत बळीराम पाटील हायस्कुल चौक ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत फुटपाथ तयार करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद नसल्यामूळे खालीलप्रमाणे तरतूद करण्यात यावी.

प्रभाग क्र.७१ न्यायनगर अंतर्गत स्मशानभूमी विकसीत करणेसाठी अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु २२९ वरील अ.क्र.१० वर रक्कम २० लक्ष मधील ५ लक्ष वळती करण्यात यावे. तसेच प्र.क्र.६२ अंतर्गत पोलीस कॉ.येथे पाण्याची लाईन टाकणेसाठी ५ लक्ष वळती करण्यात यावे.

असे एकत्रित रक्कम रू.१० लक्ष रू.प्रभाग क्र.१९ अंतर्गत बळीराम पाटील हायस्कुल चौक ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत फुटपाथ तयार करण्यासाठी तरतूद करण्यात यावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.अनिल जुगललाल जैस्वाल                    अनुमोदक : श्री.संतोष खेंडके पाटील

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.१९ अंतर्गत बळीराम पाटील हायस्कुल चौक ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत फुटपाथ तयार करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद नसल्यामूळे खालीलप्रमाणे तरतूद करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

प्रभाग क्र.७१ न्यायनगर अंतर्गत स्मशानभूमी विकसीत करणेसाठी अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु २२९ वरील अ.क्र.१० वर र.रू.२० लक्ष मधील र.रू.५ लक्ष,तसेच प्र.क्र.६२ अंतर्गत पोलीस कॉ. येथे पाण्याची लाईन टाकणेसाठी असलेली तरतूद र.रू. ५ लक्ष वळती करणे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९३६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.०४ मध्ये बागा देखभाल दुरूस्ती करणे या शिर्षकाखाली ३.५० लक्ष रूपये आहे. याऐवजी वॉर्ड क्र.०४ मध्ये विविध ठिकाणी पोलसह विद्युत दिवे बसविणे रू.३.५० लक्ष.

सुचक : श्री.रविकांत गवळी अनुमोदक : श्री.अनिल जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.०४ मध्ये बागा देखभाल दुरूस्ती करणे या लेखाशिर्षकाखाली असलेली तरतूद र.रू.३.५० लक्ष **याऐवजी** वॉर्ड क्र.०४ मध्ये विविध ठिकाणी पोलसह विद्युत दिवे बसविणे र.रू.३.५० लक्ष असे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९३७ :**

वॉर्ड क्र.६९ जवाहर कॉलनी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे.करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| डब्ल्यू-१९९<br>डब्ल्यू-२०१ | वॉर्ड क्र.६९ अशोकनगर,शास्त्रीनगर उद्यानात खेळणी बसविणे-५.००लक्ष<br>वॉर्ड क्र.६९ मनपाच्या मोकळया जागेत विविध विकास कामे करणे-५.००लक्ष | वॉर्ड क्र.६९ मधील शास्त्रीनगर येथील लाल बहादुरशास्त्री उद्यानातील विविध विकास कामे करणे-१०.००लक्ष |

सुचक- डॉ.आशा बिनवडे अनुमोदक- श्री त्र्यंबक तुपे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६९ जवाहरकॉलनी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| डब्ल्यू-१९९<br>डब्ल्यू-२०१ | वॉर्ड क्र.६९ अशोकनगर,शास्त्रीनगर उद्यानात खेळणी बसविणे-५.००लक्ष<br>वॉर्ड क्र.६९ मनपाच्या मोकळया जागेत विविध विकास कामे करणे-५.००लक्ष | वॉर्ड क्र.६९ मधील शास्त्रीनगर येथील लाल बहादुरशास्त्री उद्यानातील विविध विकास कामे करणे-१०.००लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९३८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्रमांक -२१७ वर प्रभाग क्रमांक-१८,पवननगर अंतर्गत पवार हॉस्पिटल ते बळीराम पाटील या रस्त्याचे डांबरीकरण या कामासाठी र.रू.०५ लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु त्या कामाऐवजी प्रभाग क्रमांक-१८,पवननगर,एन-९,एल-१६४समोर वॉलकंपाऊंड करीता र.रू.२,५०,०००/- व ज्ञानेश्वरनगर बस स्टॉप समोरील ओपन जागेमध्ये सांस्कृतिक सभाग्रह(हास्ययोग भवन) साठी शेड करण्याकरीता र.रू.२,५०,०००/-वळती करण्यात यावे.करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक- श्री प्रकाश अत्तरदे अनुमोदक- श्री सतिष कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्रमांक -२१७ वर प्रभाग क्रमांक-१८,पवननगर अंतर्गत पवार हॉस्पिटल ते बळीराम पाटील या रस्त्याचे डांबरीकरण या कामासाठी असलेली तरतूद र.रू.५.०० लाख **याऐवजी** प्रभाग क्रमांक-१८,पवननगर, एन-९,एल-१६४ समोर वॉल कंपाऊंड करीता र.रू.२,५०,०००/- व ज्ञानेश्वरनगर बस स्टॉप समोरील ओपन जागेमध्ये सांस्कृतिक सभाग्रह (हास्ययोग भवन) साठी शेड करण्याकरीता र.रू.२,५०,०००/- वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९३९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.७४ ज्ञानेश्वर कॉलनी,एन-२ सिडको,मुकूंदवाडी येथील खालील कामांचे लेखा शिर्षक बदलण्यासाठी प्रस्ताव सर्व साधारण सभेत विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखा शिर्षक | नविन लेखा शिर्षक |
|---|---|---|
| १. | प्रक्र.७४ ज्ञानेश्वरकॉलनी,सिडको ४ मिटर रूंद रस्त्याचे डांबरीकरण करणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यू १३ अ.क्र.३८ तरतूद रक्कम ७ लक्ष | |
| २. | प्र.क्र.७४ ज्ञानेश्वरकॉलनी अंतर्गत शिवाजी महाराज पुतळा ते मुकूंदवाडी पोलीस स्टेशन समोरील रोड सिमेंट कॉक्रींटीग करणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यू २२१ अ.क्र.४८ तरतूद रक्कम १० लक्ष | प्र.क्र.७४ ज्ञानेश्वरकॉलनी, जे सेक्टर व संघर्षनगर अंतर्गत मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी सदरील १९ लक्ष रू.वळती करण्यात यावे. |
| ३. | प्र.क्र.७४ ज्ञानेशवरकॉलनी अंतर्गत जे सेक्टर मधील विकसीत खुली जागेच्या चारही बाजूनी पावसाचे पाणी व सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी आर.सी.सी.पाईप टाकून नाली बांधणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.२२८ अ.क्र.२४ तरतूद रक्कम २ लक्ष | |

सुचक- श्री बन्सीलाल गांगवे(मामा) अनुमोदक- श्री सतिष कटकटे,श्री बाबासाहेब डांगे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७४ ज्ञानेश्वर कॉलनी,एन-२ सिडको,मुकूंदवाडी येथील खालील कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखा शिर्षक | नविन लेखा शिर्षक |
|---|---|---|
| १. | प्रक्र.७४ ज्ञानेश्वरकॉलनी,सिडको ४ मिटर रूंद रस्त्याचे डांबरीकरण करणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यू १३ अ.क्र.३८ तरतूद रक्कम ७ लक्ष | प्र.क्र.७४ ज्ञानेश्वरकॉलनी, जे सेक्टर व संघर्षनगर अंतर्गत मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी सदरील १९ लक्ष रू.वळती करण्यात यावे. |
| २. | प्र.क्र.७४ ज्ञानेश्वरकॉलनी अंतर्गत शिवाजी महाराज पुतळा ते मुकूंदवाडी पोलीस स्टेशन समोरील रोड सिमेंट कॉक्रींटीग करणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यू २२१ अ.क्र.४८ तरतूद रक्कम १० लक्ष | |
| ३. | प्र.क्र.७४ ज्ञानेशवरकॉलनी अंतर्गत जे सेक्टर मधील विकसीत खुली | |

| | | |
|---|---|---|
| | जागेच्या चारही बाजूनी पावसाचे पाणी व सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी आर.सी.सी.पाईप टाकून नाली बांधणे.<br>अर्थसंकल्पातील पृ.क्र.२२८ अ.क्र.२४ तरतूद रक्कम २ लक्ष | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९४० :**

वार्ड ९६ मधील मनपा अर्थसंकल्प २००७-०८ मधील पान क्र.१६६ वर अ.क्र.१५ वरील काम प्रभाग क्र.९६ अंतर्गत ड्रेनेज लाईन अप्रुटींग करणे या कामासाठी ०५ लाखाची आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. त्या कामाऐवजी सिल्कमील औद्योगिक वसाहत,वतन टेक्सटाईल गुलशन कॉलनी धनगरवाडा या भागात १२ मिटर डी.पी.रोडवरील मुख्य पाणी पुरवठा जागोजागी खराब झाल्याने तेथे ६ इंची १५० एम एम सी.आय.लाईन टाकणेचे कामासाठी सदर निधी करण्याकरीता प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक- श्रीमती मोमीन सफिया फिरदौस अय्युब खान

अनुमोदक- श्री अब्दुल साजेद अब्दुल सत्तार,श्री सय्यद खुसरो स.बुऱ्हानोद्दीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड ९६ मधील मनपा अर्थसंकल्प २००७-०८ मधील पान क्र.१६६ वर अ.क्र.१५ वरील काम प्रभाग क्र.९६ अंतर्गत ड्रेनेज लाईन अप्रुटींग करणे या कामासाठी ठेवण्यात आलेली र.रू.५.०० लाख तरतूद **याऐवजी** सिल्कमील औद्योगिक वसाहत,वतन टेक्सटाईल गुलशन कॉलनी धनगरवाडा या भागात १२ मिटर डी.पी.रोडवरील मुख्य पाणी पुरवठा येथे ६ इंची १५० एम.एम.सी.आय.लाईन टाकणेचे कामासाठी वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते,

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९४१ :**

सन २००७-०८ या अर्थसंकल्पामध्ये प्रभाग ९२ कबीरनगर अंतर्गत कबीरनगर येथील अंतर्गत गल्ल्यामध्ये पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे.डब्ल्यू-२३५ ० अन्वये रू.५.०० लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे.

याबाबत आपणास विनंती करण्यात येते की, सदर हेडचे लेखा शिर्षक बदलुन सदरचा निधी हा मिलिंदनगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा असलेल्या उद्यान विकासाकरीता खर्च करण्यात यावा. तसेच डब्ल्यू-१६० नागसेननगर अंतर्गत गटार बांधणे.सन २००७-०८तरतुद रू.२.००लाख आणि डब्ल्यू-१६० मिलिंदनगर अंतर्गत गटार बांधणे.सन २००७-०८ तरतूद रू.५ लाख उपरोक्त लेखा शिर्षक बदलून मिलिंदनगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा असलेल्या उद्यानाकरीता विकास करीता खर्च करावा. तसेच डब्ल्यू-१६१ अन्वये नागसेननगर मुख्य जुनी गटार तोडून नविन बांधने याकरीता सन २००७-०८ यामध्ये रूपये ५.०० लाखाची तरतुद करण्यात आली आहे. त्याऐवजी नागसेननगर येथे पेव्हर ब्लॉक बसविण्याकरिता निधी खर्च करावा असा लेखा शिर्षकामध्ये बदल करावा.

सुचक- श्री के.व्ही.मोरे अनुमोदक- श्री कैलास गायकवाड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००७-०८ या अर्थसंकल्पामध्ये प्रभाग ९२ कबीरनगर अंतर्गत कबीरनगर येथील अंतर्गत गल्ल्यामध्ये पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे करीता पा.क्र.डब्ल्यू-२३५० वर असलेली र.रू.५.०० लाख तरतूद **याऐवजी** मिलिंदनगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा असलेल्या

उद्यान विकासाकरीता लेखाशिर्ष बदलणेस तसेच डब्ल्यू-१६० वर नागसेननगर अंतर्गत गटार बांधणे करीता सन २००७-०८ तरतुद र.रू.२.०० लाख आणि डब्ल्यू-१६० मिलिंदनगर अंतर्गत गटार बांधणे करीता सन २००७-०८ तरतूद र.रू.५ लाख **याऐवजी** मिलिंदनगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा असलेल्या उद्यानाच्या विकासाकरीता लेखाशिर्ष बदलणेस आणि डब्ल्यू-१६१ वर नागसेननगर मुख्य जुनी गटार तोडून नविन बांधणे करीता सन २००७-०८ मध्ये असलेली र.रू.५.०० लाख तरतुद याऐवजी नागसेननगर येथे पेव्हर ब्लॉक बसविण्याकरिता लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९४२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वर्ष २००७-०८ या अर्थसंकल्पीय वर्षातील कामाचे खालील प्रमाणे शिर्षक बदलण्यात यावे.

| अ. क्र. | कामाचे नांव | नविन कामाचे नांव आणि रक्कम |
|---|---|---|
| १.<br>२. | चाणक्यपुरी येथे रिटेलींग वॉल बांधणे.डब्ल्यू-१६ रू.२.००लाख<br>श्रीकृष्णनगर येथे खडी रस्ता तयार करणे.डब्ल्यू-१४ रू.१.००लाख | ज्ञानेश्वरनगर येथे नाल्यावर स्लॅब टाकणे. रू ३.००लाख |
| ३. | रामतारा कॉलनी येथे आरसीसी पुल तयार करणे.<br>रू.३.०० लाख | हिरण्यनगर येथील मोकळी जागा विकसीत करणे. रू.३.०० लाख |
| ४.<br>५.<br><br>६. | रामतारा कॉलनी रिटेलींग वॉल बांधणे.डब्ल्यू-१४ रू.२.०० लाख<br>प्रभाग क्र.२१,उल्कानगरी येथे उद्यान विकसीत करणे.<br>रू.२.०० लाख<br>उद्यान विकसीत करणे.डब्ल्यू-२७ रू.१.०० लाख प्रभाग क्र.२१, | प्रभाग क्र.८७ येथील ज्ञानेश्वरनगर मधील ओपन स्पेस सांस्कृतिक हॉल बांधणे. रू.५.०० लाख |

सुचक- सौ.अंजली दिलीप कोंडेकर  अनुमोदक- सौ.विमल बेंद्रे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००७-०८ या अर्थसंकल्पीय वर्षातील कामाचे खालीलप्रमाणे लेखाशिर्षक बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ. क्र. | कामाचे नांव | नविन कामाचे नांव आणि रक्कम |
|---|---|---|
| १.<br>२. | चाणक्यपुरी येथे रिटेलींग वॉल बांधणे.डब्ल्यू-१६ रू.२.००लाख<br>श्रीकृष्णनगर येथे खडी रस्ता तयार करणे.डब्ल्यू-१४ रू.१.००लाख | ज्ञानेश्वरनगर येथे नाल्यावर स्लॅब टाकणे. रू ३.००लाख |
| ३. | रामतारा कॉलनी येथे आरसीसी पुल तयार करणे.<br>रू.३.०० लाख | हिरण्यनगर येथील मोकळी जागा विकसीत करणे. रू.३.०० लाख |
| ४.<br>५.<br>६. | रामतारा कॉलनी रिटेलींग वॉल बांधणे.डब्ल्यू-१४ रू.२.०० लाख<br>प्रभाग क्र.२१,उल्कानगरी येथे उद्यान विकसीत करणे. रू.२.०० लाख<br>उद्यान विकसीत करणे.डब्ल्यू-२७ रू.१.०० लाख प्रभाग क्र.२१, | प्रभाग क्र.८७ येथील ज्ञानेश्वरनगर मधील ओपन स्पेस सांस्कृतिक हॉल बांधणे. रू.५.०० लाख |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९४३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यू २३४ अनु.क्र.८ मध्ये प्रभाग क्र.२३ मसनतपुर चिकलठाणा अंतर्गत मनसनतपुर येथे पुर्ण वॉटर लाईन बदलून सी.आय.टाकणे करीता र.रू.५ लक्षची तरतुद करण्यात आलेली आहे.

सदर रक्कम उपरोक्त कामाकरीता अपुरी पडत असल्याने अर्थसंकल्पातील तरतुद करण्यात आलेल्या खालील तिन्ही रद्य करून यातील रक्कम प्रत्येकी ५ लक्ष अशी एकूण १५ लक्ष र.रू.प्रभाग क्र.२३ मसनतपुर चिकलठाणा अंतर्गत मसनतपुर येथे पुर्ण वॉटर लाईन बदलुन सी.आय.टाकणेच्या कामामध्ये (पान क्र.डब्ल्यू २३४ अनु.क्र.८) वळती करण्यात यावी.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | डब्ल्यू १८२/४ | वार्ड क्र.२३ २३ शहानगर येथील अर्ध गोलाकार गटारी तयार करणे. | ५०० | काम रद्य |
| २. | डब्ल्यू १८३/६ | वार्ड क्र.२३ शहानगर येथील रस्ते कॉक्रीटींग करणे | ५०० | काम रद्य |
| ३. | डब्ल्यू २०९/४२ | रामचंद्रनगर येथे ड्रेनेजची व्यवस्था करणे | ५०० | काम रद्य |

करिता प्रस्ताव मा.सर्व साधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक- श्रीमती मिराताई रामराव शिंदे		अनुमोदक-श्रीमती जयश्री किवळेकर,सौ.सरिता ससाणे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यू २३४ अनु.क्र.८ मध्ये प्रभाग क्र.२३ मसनतपुर चिकलठाणा अंतर्गत मनसनतपुर येथे पुर्ण वॉटर लाईन बदलून सी.आय.टाकणे करीता र.रू.५ लक्षची करण्यांत आलेली तरतुद अपुरी पडत असल्याने अर्थसंकल्पातील तरतुद करण्यात आलेली खालील तिन्ही कामे रद्य करून प्रत्येकी र.रू.५ लक्ष याप्रमाणे एकूण र.रू.१५ लक्ष उपरोक्त कामासाठी वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | डब्ल्यू १८२/४ | वार्ड क्र.२३ २३ शहानगर येथील अर्ध गोलाकार गटारी तयार करणे. | ५०० | काम रद्य |
| २. | डब्ल्यू १८३/६ | वार्ड क्र.२३ शहानगर येथील रस्ते कॉक्रीटींग करणे | ५०० | काम रद्य |
| ३. | डब्ल्यू २०९/४२ | रामचंद्रनगर येथे ड्रेनेजची व्यवस्था करणे | ५०० | काम रद्य |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९४४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,महाराष्ट्र शासनाने राज्यातील हिंदू,बौध्द,जैन अशी धर्मस्थळे आणि देवळे याकरिता अधिनियम करून व सरकारी अमंलाखाली आणून त्यामधील १२ते १५% अंशदान महसुली रूपातून घेण्याचे विधेयक पारित करण्यात येणार आहे. राज्यातील तिजोरातील खडखडाट संपवून आणि या निमित्ताने लोकभावनेचा विचार न करता या पैशांचा अनेक प्रकारे दुरूपयोग करण्याचा सरकारचा विचार असल्याचे स्पष्ट होत आहे.राज्यात सुमारे ५११ लक्ष धार्मिक न्यास आहेत. त्यामधून कितीतरी कोटी रूपयाचा महसूल पवित्र समजल्या जाणाऱ्या धार्मिक संस्थाकडून उकळण्याचा प्रकार सुरू झालेला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील लोकांचे आराध्यदैवते समजल्या जाणाऱ्या धार्मिक स्थळांतून अशाप्रकारे वसुली करणाऱ्या शासनाचा आम्ही तीव्र निषेध करित असून शासनाच्या हया निर्णयामुळे आम जनतेच्या भावना अतिशय दुखावल्यामुळे सदरचा निर्णय रद्य करण्याकरिता मान्यता द्यावी तसेच यापूर्वी प्रचलित असणाऱ्या पध्दतीनुसार कार्यवाही ठेवण्यासही मान्यता द्यावी अशी आम्ही मागणी करीत आहोत.

तसेच तथाकथित अंधश्रध्दा निर्मूलन उर्फ महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट प्रथांचे समुळ उच्चांटन विधेयक सन २००५ या विधेयकाकरिता हिंदुच्या धर्मग्रंथ व रूढी परंपरा यावर सरकार आघात करीत आहे. यामुळे सदर कायदाही रद्य करण्यास मा.महाराष्ट्र शासनाकडे ही सभा मागणी करीत आहे.

सुचक- १) श्री संतोष खेंडके पाटील (२)सौ.लता दलाल (३)सौ.विजया रहाटकर (४)श्री राजू वैद्य
(५)श्री रविकांत गवळी (६) ॲड पप्पु व्यास

अनुमोदक- १) श्री संजय जोशी (२) श्री किशनचंद तनवाणी (३) श्री भगवान घडमोडे
(४)श्री अब्दुल साजेद अ.सत्तार (५) श्री पुनमचंद बमणे (६) श्री किशोर तुळशीबागवाले
(७)श्री अ.रशिदखान (मामू) (८) श्री मिलिंद दाभाडे (९) श्री सतिश कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाने राज्यातील हिंदू,बौध्द,जैन अशी धर्मस्थळे आणि देवळे याकरिता अधिनियम करून व सरकारी अमंलाखाली आणून त्यामधील १२ ते १५% अंशदान महसुली रूपातून घेण्याचे विधेयक पारित करण्यात येणार असल्यामूळे व राज्यात सुमारे ५११ लक्ष धार्मिक न्यास असून त्यामधून कितीतरी कोटी रूपयाचा महसूल पवित्र समजल्या जाणाऱ्या धार्मिक संस्थाकडून उकळण्याचा प्रकार सुरू झालेला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील लोकांचे आराध्यदैवते समजल्या जाणाऱ्या धार्मिक स्थळांतून अशाप्रकारे वसुली करणाऱ्या शासनाचा तीव्र निषेध म्हणून व शासनाच्या हया निर्णयामुळे आम जनतेच्या भावना अतिशय दुखावल्यामुळे सदरचा निर्णय रद्य करण्याकरिता मान्यता व शासनास यापूर्वी प्रचलित असणाऱ्या पध्दतीनुसार कार्यवाही ठेवण्यास मान्यता द्यावी अशी मागणी करणेस शासनाकडे कळविणेस तसेच अंधश्रध्दा निर्मूलन उर्फ महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट प्रथांचे समुळ उच्चांटन विधेयक सन २००५ या विधेयकाकरिता हिंदुच्या धर्मग्रंथ व रूढी परंपरा यावर सरकार आघात करीत असल्यामूळे हा कायदाही रद्य करण्यास महाराष्ट्र शासनाकडे मागणी करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९४५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या वतीने मागील चार वर्षापासून आर.सी.एच. प्रकल्प राबविण्यात येत असून या प्रकल्पात काम करणाऱ्या महिलांनी मागील चार वर्षात कुपोषण निर्मूलन, बाळंतपण,साथीचे आजार,पल्स पोलिओ ई.आजारांचे शहराच्या सर्व भागात आरोग्यासंबंधी काम उत्तमरित्या सांभाळलेले आहे. आर.सी.एच.फेज -२ दिनांक १.४.२००७ पासून सुरू झालेला असून यामध्ये सरकारच्या वतीने केवळ प्रत्येकी ५००/- रू.मानधन दिले जाणार आहे. महिलांना वस्तीत जावून दररोज चार ते पाच तास व महानगरपालिकेच्या दवाखान्यात देखील २ ते ३ तास काम करावे लागते तसेच आता डाटा सेंटरचे देखील सिम्प्यटरद्वारे काम करायचे आहे. त्यामूळे सरकारच्या वतीने दिले जाणारे मानधन अत्यंत तुटपुंजे आहे. त्याकरीता आर.सी.एच.प्रकल्पात सद्या ९० कम्युनिटी वर्कर व ६ कम्युनिटी ऑर्गनायझर कार्यरत आहेत. मात्र फेज २ मध्ये ऑर्गनायझरचे पद नाही मात्र सदरील सर्व काम सुरळीतपणे करून घेण्यासाठी ऑर्गनायझर या पदाची आवश्यकता आहे. करीता फेज-१ मध्ये कम्युनिटी वर्कस यांना १७५०/- रू.प्रती माह व कम्युनिटी ऑर्गनायझर यांना २५००/- प्रती माह मानधन दिले जात असे. तसेच मानधन नियमित फेज २ मध्येही दि.१.४.२००७ पासून मनपाच्या खर्चातून दिले जावे कारण फेज २ मध्ये युरोपीयन कमीशनचे अनुदान बंद झाल्यावर महानगरपालिका हा प्रकल्प पूर्ण स्वखर्चाने भविष्यात राबवेन असा ठराव दि.२०.३.१९९९ प्रस्ताव क्र.२४९ वर घेण्यात आला होता व त्या संबंधीचे हमी पत्र महाराष्ट्र शासनाला जावक क्र.मनपा/आरोग्य/४५९/९९ दिनांक १६.४.१९९९ रोजी देण्यात आले होते

त्यानुसार पूढील प्रकल्प मनपा स्वत: राबविणार आहेत तसेच या सर्व महिला कार्यकर्त्यांना मुदतवाढ देण्यात यावी तसेच आर.सी.एच.मध्ये सर्व महिलांच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी देखरेख व मदत भारत सरकार पुरस्कृत जन शिक्षण संस्थान अर्थात श्रमिक विद्यापीठ यांच्यावर होती तशीच पूर्वीप्रमाणे सहकार्य व मदत महानगरपालिकेच्या या प्रकल्पाला सदैव मिळावे या करिता त्यांनाही आदेश द्यावेत. या सर्व विषयाबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.लता दलाल,श्री.संतोष खेंडके पाटील,श्री.गजानन बारवाल,श्री.त्र्यंबक तुपे,श्री.संतोष जेजुरकर, श्री.अ.साजेद अ.सत्तार,श्री.बाबासाहेब डांगे

अनुमोदक : श्री.बन्सीलाल गांगवे,श्री.संजय शिरसाट,श्रीमती नजमा बेगम युनूस,श्रीमती खान मेहरून्नीसा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या वतीने मागील चार वर्षापासून आर.सी.एच. प्रकल्प राबविण्यात येत असून या प्रकल्पात काम करणाऱ्या कम्युनिटी वर्कर महिला यांना फेज-१ मध्ये रू.१७५०/- प्रती माह व कम्युनिटी ऑर्गनायझर यांना रू.२५००/- प्रती माह मानधन दिले जात असे त्याप्रमाणे फेज २ मध्ये दिनांक १.४.२००७ पासून रू.५००/- शासनाच्या वतीने दिले जाणारे मानधन व महापालिकेतर्फे रू.१७५०/- असे एकूण रू.२२५०/- तसेच कम्युनिटी ऑर्गनायझर यांना रू.५००/- शासनाच्या वतीने दिले जाणारे मानधन व महापालिकेतर्फे रू.२५००/- असे एकूण रू.३,०००/- दि.१.४.२००७ पासून महापालिकेच्या खर्चातून देणेस तसेच या सर्व महिला कार्यकर्त्यांना मुदतवाढ देण्यास आणि आर.सी.एच.प्रकल्पामध्ये सर्व महिलांच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी देखरेख व मदत भारत सरकार पुरस्कृत जन शिक्षण संस्थान अर्थात श्रमिक विद्यापीठ यांच्यावर होती तशीच पूर्वीप्रमाणे चालू ठेवणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९४६ :**

वार्ड क्र.९८ नक्षत्रवाडी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खाली दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे.करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

<table>
<tr><th>अर्थसंकल्प पान.</th><th>कामाचे नांव</th><th>सुधारीत कामाचे नांव</th></tr>
<tr><td>W-२२६</td><td>वॉर्ड क्र.९८ साई वृध्दावंन येथील उद्यान विकसीत करणे-२.५० लक्ष</td><td rowspan="5">१. पैठणरोड ते हिंदूस्थान आवास व पैठणरोड ते (वाळूजरोड)हिंदुस्थान आवास पर्यन्त विद्यूत पथ दिवे लावणे-२.५० लक्ष<br>२. प्रभाग क्र.९८ अंतर्गत विविध ठिकाणी ७० व्हॅट सोडीयम फिटींग लावणे-२.५० लक्ष<br>३. शेकुदादा मोटे यांच्या घरापासून मनपा हद्दीपर्यन्त रस्ता कॉंक्रिट करणे-५.५० लक्ष<br>४.नाथपुरम येथे पुर्ण डांबरीकरण करणे-२.००लक्ष<br>५. समतानगर येथे पुर्ण डांबरीकरण करणे-२.००लक्ष</td></tr>
<tr><td>W-२२६/१२</td><td>अजिंक्य सोसायटी येथील उद्यान विकसीत करणे-३.०० लक्ष</td></tr>
<tr><td>W-७/७</td><td>वॉर्ड क्र.९८ विटखेडा गाव येथे पुर्नडांबरीकरण करणे-५.००लक्ष</td></tr>
<tr><td>W-२७/२१</td><td>वार्ड क्र.९८ येथील एम.आय.टी.कॉलेज समोरील शोधन रेखांकनातील खुली जागा विकसीत करणे-१.५० लक्ष</td></tr>
<tr><td>W-१६६/८</td><td>प्रभाग क्र.९८ अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे.-२.५०</td></tr>
<tr><td>W-१८१/४३</td><td>वॉर्ड क्र.९८ शेकुदादा मोटे यांच्या घरापासून मनपा हद्दीपर्यन्त रस्ता डांबरीकरण करणे-५.००लक्ष</td><td>वॉर्ड क्र.९८ शेकुदादा मोटे यांच्या घरापासून मनपा हद्दीपर्यन्त रस्ता कॉंक्रीट करणे-५.००लक्ष</td></tr>
</table>

सुचक-सौ.अनिता घोडेले                                   अनुमोदक-श्री गजानन बारवाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९८ नक्षत्रवाडी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खाली दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पान न. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| डब्ल्यू २२६ | वॉर्ड क्र.९८ साई वृध्दावंन येथील उद्यान विकसीत करणे-२.५० लक्ष | १. पैठणरोड ते हिंदूस्थान आवास व पैठणरोड ते (वाळूजरोड)हिंदुस्थान आवास पर्यन्त विद्यूत पथ दिवे लावणे-२.५० लक्ष |
| डब्ल्यू२२६ /१२ | अजिंक्य सोसायटी येथील उद्यान विकसीत करणे-३.००लक्ष | २. प्रभाग क्र.९८ अंतर्गत विविध ठिकाणी ७० व्हॅट सोडीयम फिटींग लावणे-२.५० लक्ष |
| डब्ल्यू-७/७ | वॉर्ड क्र.९८ विटखेडा गाव येथे पुर्नडांबरीकरण करणे-५.००लक्ष | ३. शेकुदादा मोटे यांच्या घरापासून मनपा हद्दीपर्यन्त रस्ता कॉंक्रीट करणे-५.५० लक्ष |
| डब्ल्यू २७/२१ | वार्ड क्र.९८ येथील एम.आय.टी.कॉलेज समोरील शोधन रेखांकनातील खुली जागा विकसीत करणे-१.५० लक्ष | ४.नाथपुरम येथे पुर्ण डांबरीकरण करणे-२.००लक्ष |
| डब्ल्यू १६६/८ | प्रभाग क्र.९८ अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे.-२.५० | ५. समतानगर येथे पुर्ण डांबरीकरण करणे-२.००लक्ष |
| डब्ल्यू१८१ /४३ | वॉर्ड क्र.९८ शेकुदादा मोटे यांच्या घरापासून मनपा हद्दीपर्यन्त रस्ता डांबरीकरण करणे-५.००लक्ष | वॉर्ड क्र.९८ शेकुदादा मोटे यांच्या घरापासून मनपा हद्दीपर्यन्त रस्ता कॉंक्रीट करणे-५.००लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९४७ :**

महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकेच्या स्वीकृत सदस्यांचे परिषद आपल्या औरंगाबाद शहरात घेण्यात यावी.

सुचक- श्री संजय केनेकर      अनुमोदक- ॲड राजेश गुलाबचंद व्यास

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकेच्या स्वीकृत सदस्यांची परिषद औरंगाबाद शहरात घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९४८ :**

वॉर्ड क्र.९८ नक्षत्रवाडी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| डब्ल्यू १९९/४२ | वॉर्ड क्र.९८ अंतर्गत उद्यान विकसीत करणे-५.००लक्ष | १. वॉर्ड क्र.९८ नक्षत्रवाडी अंतर्गत विविध ठिकाणी उद्यान विकसीत करणे-२०.५० लक्ष (एकत्रित अंदाजपत्रक) |
| डब्ल्यू २०२/५४ | वॉर्ड क्र.९८ रेवती हौ.सो.खुली जागा विकसीत करणे-५.००लक्ष | |
| डब्ल्यू २०२/५५ | वॉर्ड क्र.९८ सचिन मुळे ले-आऊट मधील (साईवृंदावन) मनपाची खुली जागा विकसीत करणे-५.००लक्ष | |
| डब्ल्यू२२६/११ | दत्तनगर येथील उद्यान विकसीत करणे-३.००लक्ष | |
| डब्ल्यू२८/४४ | नाथपुरम येथील उद्यान विकसीत करणे-२.५०लक्ष | |
| डब्ल्यू२२९/ १६ | कांचननगर येथे सांस्कृतिक सभागृह बांधणे-५.००लक्ष | २. कांचनवाडी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ बहुउद्येशीय हॉल बांधणे-५.००लक्ष |

सुचक- सौ.अनिता नंदकुमार घोडेले      अनुमोदक-श्री गजानन बारवाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९८ नक्षत्रवाडी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| डब्ल्यू १९९/४२ | वॉर्ड क्र.९८ अंतर्गत उद्यान विकसीत करणे-५.००लक्ष | १. वॉर्ड क्र.९८ नक्षत्रवाडी अंतर्गत विविध ठिकाणी उद्यान विकसीत करणे-२०.५० लक्ष (एकत्रित अंदाजपत्रक) |
| डब्ल्यू २०२/५४ | वॉर्ड क्र.९८ रेवती हौ.सो.खुली जागा विकसीत करणे-५.००लक्ष | |
| डब्ल्यू २०२/५५ | वॉर्ड क्र.९८ सचिन मुळे ले-आऊट मधील (साईवृंदावन) मनपाची खुली जागा विकसीत करणे-५.००लक्ष | |
| डब्ल्यू२२६/११ | दत्तनगर येथील उद्यान विकसीत करणे-३.००लक्ष | |
| डब्ल्यू२८/४४ | नाथपुरम येथील उद्यान विकसीत करणे-२.५०लक्ष | |
| डब्ल्यू२२९/ १६ | कांचननगर येथे सांस्कृतिक सभागृह बांधणे-५.००लक्ष | २. कांचनवाडी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ बहुउद्येशीय हॉल बांधणे-५.००लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९४९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.७१ न्यायनगर येथील खालील कामाचे लेखाशिर्षक बदलण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्पातील लेखा शिर्षक | पृ.क्र. | अ.क्र. | नविन लेखा शिर्षक |
|---|---|---|---|
| वार्ड क्र.७१ निरंतर बाग खुल्या जागेस संरक्षक भिंत बांधणे.<br>तरतुद रक्कम ५ लक्ष | डब्ल्यु-१३८ | २७ | चौडेश्वरी सोसायटी व भुषननगर येथील खुल्या जागेस असलेल्या संरक्षक भिंतीस ग्रिल बसविणे. |
| वार्ड क्र.७१ फॉरेस्ट कॉ.डांबरीकरण करणे.<br>तरतुद रक्कम ५ लक्ष | डब्ल्यु-१८४ | १७ | वार्ड क्र.७१ मधील विविध सोसायटी मधील रोडचे डांबरीकरण करणे. |
| वार्ड क्र.७१ न्यायनगर अंतर्गत प्रभागात आरोग्य क्रेद्र बांधणे.<br>तरतुद रक्कम १० लक्ष | डब्ल्यु-२२८ | ४ | १. वार्ड क्र.७१ मध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणेसाठी रू.५ लक्ष<br>२. वार्ड क्र.७१ मध्ये जुनी ड्रेनेज लाईन बदलणेसाठी रू.५लक्ष वळती करणे. |

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील  अनुमोदक : श्री.संजय शिरसाट

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७१ न्यायनगर येथील खालील कामाचे लेखाशिर्षक बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्पातील लेखा शिर्षक | पृ.क्र. | अ.क्र. | नविन लेखा शिर्षक |
|---|---|---|---|
| वार्ड क्र.७१ निरंतर बाग खुल्या जागेस संरक्षक भिंत बांधणे.<br>तरतुद रक्कम ५ लक्ष | डब्ल्यु-१३८ | २७ | चौडेश्वरी सोसायटी व भुषननगर येथील खुल्या जागेस असलेल्या संरक्षक भिंतीस ग्रिल बसविणे. |
| वार्ड क्र.७१ फॉरेस्ट कॉ.डांबरीकरण करणे. | डब्ल्यु- | १७ | वार्ड क्र.७१ मधील विविध सोसायटी |

| | | | |
|---|---|---|---|
| तरतुद रक्कम ५ लक्ष | १८४ | | मधील रोडचे डांबरीकरण करणे. |
| वार्ड क्र.७१ न्यायनगर अंतर्गत प्रभागात आरोग्य क्रेद्र बांधणे.<br>तरतुद रक्कम १० लक्ष | डब्ल्यु-२२८ | ४ | ३. वार्ड क्र.७१ मध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणेसाठी रू.५ लक्ष<br>४. वार्ड क्र.७१ मध्ये जुनी ड्रेनेज लाईन बदलणेसाठी रू.५लक्ष वळती करणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,प्रभाग क्र.७१ न्यायनगर येथील खालील कामांचे लेखाशिर्षक बदलण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्पातील लेखा शिर्षक | पृ.क्र. | अ.क्र. | नविन लेखा शिर्षक |
|---|---|---|---|
| प्र.क्र.७१ कल्पतरू सो.५० फुट रूंद रस्त्यास फुटपाथ बांधणे. तरतुद रक्कम ५ लक्ष.<br>प्र.क्र.७१ विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. तरतुद रक्कम ५ लक्ष. | डब्ल्यु-१९०<br>डब्ल्यु-२०९ | १७<br>३० | प्रभाग क्र.७१ अंतर्गत चौंडेश्वरी कॉ.येथे सभागृह बांधणेसाठी १० लक्ष रू. वळती करणे. |
| प्र.क्र.७१ न्यायनगर अंतर्गत १०० फुट रोडला पेव्हर ब्लॉक बसविणे तरतुद रक्कम ५ लक्ष | डब्ल्यु-२२१ | ४५ | प्रभाग क्र.७१ अंतर्गत फॉरेस्ट कॉ. येथील ड्रेनेज लाईन मोठी करणे. |
| प्र.क्र.७१न्यायनगर प्रभागांतर्गत विविध ठिकाणी जलवाहीनी टाकणे. तरतुद रक्कम १० लक्ष | डब्ल्यु-२३२ | १६ | प्रभाग क्र.७१ अंतर्गत कल्पतरू सो. येथे सभागृह बांधणे. |
| प्रभाग क्र.७१ अंतर्गत नाला गटारीवर ढापे टाकणे. तरतुद रक्कम ५ लक्ष.<br>प्रभाग क्र.७१ न्यायनगर अंतर्गत विविध ठिकाणी विकासाची कामे करणे. तरतुद रक्कम ७.५० लक्ष | डब्ल्यु-१५१<br>डब्ल्यु-२२७ | ८<br>२३ | प्रभाग क्र.७१ अंतर्गत भुषननगर येथे खुल्या जागेवर खुले सभागृह बांधणेसाठी ३ लक्ष वळती करणे.<br>प्रभाग क्र.७१ निरंतर बाग खुल्या जागेवर खुले सभागृह बांधणेसाठी ३.५ लक्ष वळती करणे.<br>प्रभाग क्र.७१ भुषननगर ते चौंडेश्वरी येथे ५० मेन रोडला डांबरीकरण करणेसाठी ३ लक्ष वळती करणे. |
| प्रभाग क्र.७१ न्यायनगर अंतर्गत स्मशानभूमी विकसीत करणे. तरतुद रक्कम १५ लक्ष | डब्ल्यु-२२९ | १० | १.निरंतर बाग अंतर्गत विकास काम करणे ५ लक्ष.<br>२.कल्पतरू सो.मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व विविध अंतर्गत काम करणे.५ लक्ष<br>३.भुषननगर येथील ओपन स्पेसमध्ये खेळणी बसविणे व पेव्हर ब्लॉक बसविणे ५ लक्ष. |
| वार्ड क्र.७१ न्यायनगर प्रभाग अंतर्गत विविध ठिकाणी रोडचे कॉंक्रीटीकरण करणे<br>तरतुद रक्कम १० लक्ष | डब्ल्यु-२२१ | ४४ | १. चौंडेश्वरी,भुषननगर मध्ये रोड साईट स्ट्रॉम वॉटर ड्रेन बनविणे ३ लक्ष<br>२. सह्याद्रीनगर येथे गटारीवर ढापे टाकणे. २ लक्ष.<br>३.चौंडेश्वरी खुल्या जागेवर जॉगींग ट्रॅक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | बनविणे व पेव्हर ब्लॉक बसविणे.५ लक्ष |

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील अनुमोदक : श्री.बाबासाहेब डांगे, सौ.वीणा सिध्द

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७१ न्यायनगर येथील खालील कामांचे लेखाशिर्षक बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्पातील लेखा शिर्षक | पृ.क्र. | अ.क्र. | नविन लेखा शिर्षक |
|---|---|---|---|
| प्र.क्र.७१ कल्पतरू सो.५० फुट रूंद रस्त्यास फुटपाथ बांधणे. तरतुद रक्कम ५ लक्ष.<br>प्र.क्र.७१ विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. तरतुद रक्कम ५ लक्ष. | डब्ल्यु-१९०<br>डब्ल्यु-२०९ | १७<br><br>३० | प्रभाग क्र.७१ अंतर्गत चौंडेश्वरी कॉ.येथे सभागृह बांधणेसाठी १० लक्ष रू. वळती करणे. |
| प्र.क्र.७१ न्यायनगर अंतर्गत १०० फुट रोडला पेव्हर ब्लॉक बसविणे तरतुद रक्कम ५ लक्ष | डब्ल्यु-२२१ | ४५ | प्रभाग क्र.७१ अंतर्गत फॉरेस्ट कॉ. येथील ड्रेनेज लाईन मोठी करणे. |
| प्र.क्र.७१न्यायनगर प्रभागांतर्गत विविध ठिकाणी जलवाहीनी टाकणे. तरतुद रक्कम १० लक्ष | डब्ल्यु-२३२ | १६ | प्रभाग क्र.७१ अंतर्गत कल्पतरू सो. येथे सभागृह बांधणे. |
| प्रभाग क्र.७१ अंतर्गत नाला गटारीवर ढापे टाकणे. तरतुद रक्कम ५ लक्ष.<br>प्रभाग क्र.७१ न्यायनगर अंतर्गत विविध ठिकाणी विकासाची कामे करणे. तरतुद रक्कम ७.५० लक्ष | डब्ल्यु-१५१<br>डब्ल्यु-२२७ | ८<br><br>२३ | प्रभाग क्र.७१ अंतर्गत भुषननगर येथे खुल्या जागेवर खुले सभागृह बांधणेसाठी ३ लक्ष वळती करणे.<br>प्रभाग क्र.७१ निरंतर बाग खुल्या जागेवर खुले सभागृह बांधणेसाठी ३.५ लक्ष वळती करणे.<br>प्रभाग क्र.७१ भुषननगर ते चौंडेश्वरी येथे ५० मेन रोडला डांबरीकरण करणेसाठी ३ लक्ष वळती करणे. |
| प्रभाग क्र.७१ न्यायनगर अंतर्गत स्मशानभूमी विकसीत करणे. तरतुद रक्कम १५ लक्ष | डब्ल्यु-२२९ | १० | १.निरंतर बाग अंतर्गत विकास काम करणे ५ लक्ष.<br>२.कल्पतरू सो.मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व विविध अंतर्गत काम करणे.५ लक्ष<br>३.भुषननगर येथील ओपन स्पेसमध्ये खेळणी बसविणे व पेव्हर ब्लॉक बसविणे ५ लक्ष. |
| वार्ड क्र.७१ न्यायनगर प्रभाग अंतर्गत विविध ठिकाणी रोडचे कॉंक्रीटीकरण करणे<br>तरतुद रक्कम १० लक्ष | डब्ल्यु-२२१ | ४४ | १. चौंडेश्वरी,भुषननगर मध्ये रोड साईट स्ट्रॉम वॉटर ड्रेन बनविणे ३ लक्ष<br>२. सह्याद्रीनगर येथे गटारीवर ढापे टाकणे. २ लक्ष.<br>३.चौंडेश्वरी खुल्या जागेवर जॉगींग ट्रॅक बनविणे व पेव्हर ब्लॉक बसविणे.५ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.७१ अंतर्गत नाला गटारीवर ढापे टाकण्यासाठी अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु-१५१ वरील अ.क्र.८ वर रक्कम रू.५ लक्षची तरतुद करण्यात आली होती तथापी त्यातील ३ लक्ष रू.दुसऱ्या कामासाठी वळती करण्यात आले आहेत तथापी उर्वरीत रक्कम रू.२ लक्ष

व अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु-२२७ वरील २३ वर वार्ड क्र.७१ विविध विकास कामासाठी ७.५ लक्षची तरतुदी पैकी रक्कम रू.६.५ लक्ष दुसऱ्या कामासाठी वळती करण्यात आले आहे. तथापी त्यातील उर्वरीत रक्कम १ लक्ष व वरील उर्वरीत २ लक्ष असे एकुण ३ लक्ष रू.वार्ड क्र.७१ चौंडेश्वरी सोसायटी येथे कमान बनविणेसाठी वळती करण्यात यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील अनुमोदक : श्री.विजय खुडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७१ अंतर्गत नाला गटारीवर ढापे टाकण्यासाठी अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु-१५१ वरील अ.क्र.८ वर रक्कम रू.५ लक्षची तरतुद करण्यात आली होती तथापी त्यातील रू.३ लक्ष दुसऱ्या कामासाठी वळती करण्यात आले असल्यामूळे उर्वरीत रक्कम रू.२ लक्ष व अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु-२२७ वरील २३ वर वार्ड क्र.७१ विविध विकास कामासाठी ७.५ लक्षची तरतुदी पैकी रक्कम रू.६.५ लक्ष दुसऱ्या कामासाठी वळती करण्यात आले असल्यामूळे त्यातील उर्वरीत रक्कम १ लक्ष असे एकुण रू.३ लक्ष वार्ड क्र.७१ चौंडेश्वरी सोसायटी येथे कमान बनविणेसाठी वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प २००७-२००८ मध्ये पान क्र.२२८ वर वार्ड क्र.९७ येथे विकासाचे विविध कामे करण्याकरीता ५० लक्ष रूपयाची आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे. त्या तरतुदीतून चेलीपुरा चौकात पोलीस चौकी जवळ हायमस्ट लाईट लावण्यात यावे यासाठी उपरोक्त तरतुदीतून रक्कम रूपये ०५ लक्षाची रक्कम सदर कामासाठी वळती करण्यात यावी सदर ठिकाणी नेहमी सनवारासाठी वर्दळ राहते तसेच रहदारी तथा वाहतुकीची हि वर्दळ असते त्या ठिकाणी असलेला प्रकाश योग्य प्रमाणांत नसल्याने अपघाताची शक्यता नाकारता येत नाही करीता या ठिकाणी त्वरीत सदर तरतुदीतुन हायमस्ट लाईट लावण्यात यावा.

सदर कामाचे त्वरीत अंदाजपत्रक तयार करून काम त्वरीत सुरू करण्याकरीता संबंधित अधिकारी यांना योग्य ते आदेश देण्यात यावे हि विनंती.

सुचक :श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार अनुमोदक :श्री.खान निसार मोहम्मद खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००७-२००८ मध्ये पान क्र.२२८ वर वार्ड क्र.९७ करीता विविध कामे करण्याकरीता र.रू.५० लक्षची करण्यांत आलेल्या आर्थिक तरतुदीतून चेलीपुरा चौकात पोलीस चौकी जवळ हायमस्ट लाईट लावण्याकरीता र.रू.५.०० लक्ष वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९७ मध्ये विविध ठिकाणी पोलसह विद्युत व्यवस्था करणेच्या कामासाठी सन २००७-०८ ह्या आर्थीक वर्षात मा.स्थायी समितीने शिफारस केल्यानुसार

लेखाशिर्षक ''नविन पथदिवे व्यवस्था'' पान क्र.डब्ल्यु.१९८ अ.क्र.७७ वर रू.५.०० लक्षाची तरतुद केलेली आहे.

त्याऐवजी सदरील रक्कमे वार्ड क्र.२४ एम.आय.डी.सी.चिकलठाणा येथे एनर्जी सेव्हींग फिटींग पोलसह लावणेच्या कामासाठी रू.३.०० लाख वळती करण्यात यावेत.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.अ.साजेद अ.सत्तार                    अनुमोदक : श्री.संतोष खेंडके पाटील

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९७ मध्ये विविध ठिकाणी पोलसह विद्युत व्यवस्था करणेच्या कामासाठी सन २००७-०८ आर्थीक वर्षात मा.स्थायी समितीने शिफारस केल्यानुसार लेखाशिर्षक नविन पथदिवे पान क्र.डब्ल्यु.१९८ अ.क्र.७७ वर असलेली र.रू.५.०० लक्षची तरतुद **याऐवजी** सदरील रक्कमेतून वार्ड क्र.२४ एम.आय.डी.सी.चिकलठाणा येथे एनर्जी सेव्हींग फिटींग पोलसह लावणेच्या कामासाठी र.रू.३.०० लाख वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-२३४, वर प्रभाग क्रमांक -३८, गांधीनगर अंतर्गत महाराणा प्रताप हायस्कुल समोरील भागात नवीन जलवाहीनी टाकणे या कामासाठी र.रू.०४ लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे.

परंतु त्या कामाऐवजी प्रभाग क्रमांक -३८ गांधीनगर येथे प्रवेशव्दार उभा करणे या कामासाठी र.रू.०२ लाखाची तरतुद करण्यात यावी. तसेच बापूनगर भागात खुली जागा विकसित करणे या कामासाठी र.रू.०२ लाखाची तरतुद करण्यात यावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजु सुग्रीम रिडलॉन                    अनुमोदक : सौ.सरिता अशोक ससाणे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-२३४, वर प्रभाग क्रमांक -३८, गांधीनगर अंतर्गत महाराणा प्रताप हायस्कुल समोरील भागात नवीन जलवाहीनी टाकणे या कामासाठी असलेली र.रू.४.०० लाखाची तरतुद **याऐवजी** प्रभाग क्रमांक -३८ गांधीनगर येथे प्रवेशव्दार उभे करणे या कामासाठी र.रू.२.०० लाख तसेच बापूनगर भागात खुली जागा विकसित करणे या कामासाठी र.रू.२.०० लाख वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२८, नेहरूनगर अंतर्गत, कटकट गेट नाल्यावर आरसीसी च्या पुल करीता रू.५ लाख बजट बुक पान क्र.डब्ल्यु-२१९ वर विविरण आहे. तरी ही मला हेड बदलून विविध ठिकाणी कॉंक्रीटींग व नालीवर/सीव्हर वर स्लॅब टाकण्याकरीता हेड बदली करून देणे. कारण की माझ्या वार्ड मध्ये कॉंक्रीटींग व नालीवर स्लॅबची फारच आवश्यकता आहे, तरी हेड बदली करावे, ही विनंती.

सुचक : श्रीमती.खान मेहरून्नीसा हमीद खान, श्री.अ.साजेद अ. सत्तार

अनुमोदक : श्री.सय्यद खुसरो सय्यद बुऱ्हानोद्दीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२८, नेहरूनगर अंतर्गत, कटकट गेट नाल्यावर आरसीसी च्या पुल करीता रू.५ लाख पान क्र.डब्ल्यु-२१९ वर असलेली तरतूद विविध ठिकाणी कॉंक्रीटींग व नालीवर/सीव्हर वर स्लॅब टाकण्याकरीता लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या वार्ड क्र.२८, नेहरूनगर अंतर्गत कटकट गेट जवळ नाल्यास भिंत बांधणे. या करीता रू.१ लाख बजट बुक पान क्र.डब्ल्यु-१०१ वर विवरण आहे.

तरी वार्ड क्र.२८ येथे ड्रेनिज ऑपरेटींग करण्याकरीता हेड बदली करून देणे, ही विनंती

सुचक : श्रीमती.खान मेहरून्नीसा हमीद खान, श्री.अ.साजेद अ. सत्तार

अनुमोदक : श्री.सय्यद खुसरो सय्यद बुऱ्हानोद्दीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२८, नेहरूनगर अंतर्गत कटकटगेट जवळ नाल्यास भिंत बांधणेकरीता र.रू.१ लाख पान क्र.डब्ल्यु-१०१ वर असलेली तरतूद वार्ड क्र.२८ येथे ड्रेनिज ऑपरेटींग करण्याकरीता लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,माझ्या वार्ड क्र.२८, नेहरूनगर अंतर्गत युनूस कॉलनी मनपा शाळा क्र.३ मध्ये रूम बांधण्यात यावे. या करीता रू.५० हजार बजट बुक पान क्र.डब्ल्यु-९५ वर विवरण आहे.

तरी वार्ड क्र.२८ येथे विविध ठिकाणी पेचव्युल रस्ता दुरूस्ती करण्यात करीता हेड बदलुन देण्यात यावे, ही विनंती.

सुचक : श्रीमती.खान मेहरून्नीसा हमीद खान, श्री.अ.साजेद अ. सत्तार

अनुमोदक : श्री.सय्यद खुसरो सय्यद बुऱ्हानोद्दीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र.२८, नेहरूनगर अंतर्गत युनूस कॉलनी मनपा शाळा क्र.३ मध्ये रूम बांधण्याकरीता रू.५० हजार पान क्र.डब्ल्यु-९५ वर असलेली तरतूद वार्ड क्र.२८ येथे विविध ठिकाणी पेचव्युल रस्ता दुरूस्ती करण्याकरीता लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या वार्ड क्र.२८, नेहरूनगर अंतर्गत रविंद्रनगर स्मशानभूमि विकसीत करून देण्यात यावे. याकरीता रू.५० हजार बजट बुक पान क्र.डब्ल्यु-१०२ वर विवरण आहे.

तरी मला हेड बदली करून विविध ठिकाणी कॉंक्रीटींग करून देण्यात यावे, ही विनंती.

सुचक : श्रीमती.खान मेहरून्नीसा हमीद खान, श्री.अ.साजेद अ.सत्तार

अनुमोदक : श्री.सय्यद खुसरो सय्यद बुऱ्हानोद्दीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२८,नेहरूनगर अंतर्गत रविंद्रनगर स्मशानभूमिचा विकास अर्थसंकल्पात असलेल्या पान क्र.डब्ल्यु-१०२ वर असलेल्या र.रू.५० हजार च्या तरतूदीतुन करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या वार्ड क्र.२८, नेहरूनगर अंतर्गत,ड्रेनेज ची नवीन लाईन करीता ८ लाख रूपये मिळालेले आहे. बजट बुक पान क्र.डब्ल्यु-२३१, वर विवरण आहे. तरी मला हेड बदलून फुटकळ काम व विविध ठिकाणी देखभाल दुरूस्ती करण्याकरीता देण्यात यावे. कारण की ड्रेनेज देखभाल दुरूस्ती करीता माझ्या वार्डमध्ये बजट कमी आहे म्हणून हेड बदली करून देणे ही विनंती.

सुचक : श्रीमती.खान मेहरून्नीसा हमीद खान, श्री.अ.साजेद अ.सत्तार

अनुमोदक : श्री.सय्यद खुसरो सय्यद बुऱ्हानोद्यीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२८, नेहरूनगर अंतर्गत,ड्रेनेजची नवीन लाईन करीता पान क्र.डब्ल्यु-२३१, वर असलेली र.रू.८.०० लक्ष तरतूद **याऐवजी** फुटकळ कामे व विविध ठिकाणी देखभाल दुरूस्ती करण्याकरीता लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९६० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-१७०, अ.क्र.-०४ वर प्रभाग क्रमांक -०३, यादवनगर अंतर्गत ग्रीन बेल्ट विकसित करण्यासाठी र.रू.२.५० लाखाची तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

परंतु त्या कामाऐवजी प्रभाग क्रमांक -०३ यादवनगर अंतर्गत विकास योजने अंतर्गत भुखंड संरक्षण अंतर्गत पान क्र.२०० अ.क्र.-१ वरील र.रू.०५ लक्षची ठेवण्यात आलेल्या तरतूदीमध्ये वरील कामाची र.रू.२.५० लक्ष वळती करण्यात यावेत. त्यामूळे भूखंड संरक्षण अंतर्गतचा निधी र.रू.७.५० लक्ष एवढा होईल. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.भाऊसाहेब ताठे अनुमोदक : श्री.हिम्मतराव दाभाडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-१७०, अ.क्र.-०४ वर प्रभाग क्रमांक -०३, यादवनगर अंतर्गत ग्रीन बेल्ट विकसित करण्यासाठी ठेवण्यात आलेली र.रू.२.५० लाखाची असलेली तरतुद,प्रभाग क्रमांक -०३ यादवनगर अंतर्गत विकास योजनेअंतर्गत भुखंड संरक्षण पान क्र.२०० अ.क्र.-१ वरील र.रू.०५ लक्ष या तरतुदीमध्ये सदर र.रू.२.५० लक्ष या रकमेचा समावेश करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९६१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.२५ आयोध्यानगर येथील खालील कामांचे लेखाशिर्षक बदलण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१. | प्रभाग क्र.२५ आयोध्यानगर येथील विविध भागातील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण अथवा पुनर्डांबरीकरण करणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.२२० अ.क्र.११ तरतूद र.रू.५.०० लक्ष | प्रभाग क्र.२५ आयोध्यानगर येथील विविध भागातील रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे अर्थसंकल्पातील पृ.क्र.२२० अ.क्र.११ तरतूद र.रू.५.०० लक्ष या कामासाठी वळती करण्यांत यावे. |

सुचक : सौ.विमल तुकाराम बेंद्रे अनुमोदक : श्री.त्र्यबंक तुपे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२५ आयोध्यानगर येथील खालील कामांचे लेखाशिर्षक बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१. | प्रभाग क्र.२५ आयोध्यानगर येथील विविध भागातील रस्त्याचे काँक्रीटीकरण अथवा पुनर्डांबरीकरण करणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.२२० अ.क्र.११ तरतूद र.रू.५.०० लक्ष | प्रभाग क्र.२५ आयोध्यानगर येथील विविध भागातील रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे अर्थसंकल्पातील पृ.क्र.२२० अ.क्र.११ तरतूद र.रू.५.०० लक्ष या कामासाठी वळती करण्यांत यावे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९६२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.२५ आयोध्यानगर येथील खालील कामांचे लेखाशिर्षक बदलण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखा शिर्षक | नविन लेखा शिर्षक |
|---|---|---|
| ०१ | **पुतळे खरेदी व देखभाल**<br>वार्ड क्र.२५ मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परीसर विकसीत करणे.<br>अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु१९१ अ.क्र.२ तरतुद रक्कम ५ लक्ष. | **विकास योजने अंतर्गत विविध विकास कामे**<br>प्रभाग क्र.२५ आयोध्यानगर येथील एन ७ सिडको मुकुल मंदीर शाळे समोरील खुल्या जागेवर खेळणी बसविणे व परिसर विकसीत करणे. तरतुद रक्कम ५ लक्ष. |

सुचक : सौ. विमल तुकाराम बेंद्रे अनुमोदक : सौ.पुष्पा बाळुनाना शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२५ आयोध्यानगर येथील खालील कामांचे लेखाशिर्षक बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखा शिर्षक | नविन लेखा शिर्षक |
|---|---|---|
| ०१ | **पुतळे खरेदी व देखभाल**<br>वार्ड क्र.२५ मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परीसर विकसीत करणे.<br>अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु१९१ अ.क्र.२ तरतुद रक्कम ५ लक्ष. | **विकास योजने अंतर्गत विविध विकास कामे**<br>प्रभाग क्र.२५ आयोध्यानगर येथील एन ७ सिडको मुकुल मंदीर शाळे समोरील खुल्या जागेवर खेळणी बसविणे व परिसर विकसीत करणे. तरतुद रक्कम ५ लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९६३ :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, घनकचरा हाताळणी व व्यवस्थापनाची कार्यवाही मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानूसार आणि वने, पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांच्या २५ सप्टेंबर २००० च्या नोटी फिकेशन प्रमाणे करणे आवश्यक आहे.

घनकचरा व्यवस्थापन नियम २००० मधील मुद्दे.

१. कचरा इतस्तत: न टाकता तो एकत्रीत जमा करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा नागरीकांना पुरविणे.

२. कचरा वेगवेगळा जमा करून वेगवेगळ्या कचरा कुंड्यात टाकणे.
३. घरोघर जाऊन कचरा जमा करून त्याची वाहतूक डंपींग स्टेशन पर्यंत करणे.
४. कचऱ्याची वाहतूक बंद वाहनातूनच करणे.
५. कचऱ्याची हाताळणी करताना मानवी बळाचा वापर कमी करून यांत्रीकी पध्दतीने हाताळणी करणे.

तथापी औरंगाबाद महानगरपालिकेकडे घनकचरा व्यवस्थापन नियम २००० चे पालन करण्यासाठी आवश्यक असणारी साधन सामुग्री व मनुष्य बळ उपलब्ध नसल्यामुळे घनकचरा व्यवस्थापनाचे खाजगी करण करणे गरजेचे झाले आहे.

घनकचरा व्यवस्थापनाच्या नियमा मध्ये झालेल्या अमुलाग्र बदलांचे पालन करण्याच्या दृष्टीने औरंगाबाद महानगरपालिकेने या कामी All India Institute of Local Self Government, Mumbai या संस्थेची प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट (पी.एम.सी.) म्हणून नियुक्ती केली आहे.

All India Institute of Local Self Government, Mumbai यांनी औरंगाबाद शहराच्या घनकचरा व्यवस्थापनासाठी केलेल्या सखोल अभ्यासाव्दारे तयार केलेल्या प्रकल्प अहवालात प्राप्त झाला असून त्यानुसार घनकचरा व्यवस्थापनाच्या Collection, transfer & Transportation चा प्रकल्प रू.९,१३,३८,०००/- खर्चाचा आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. Total cost for Biodegredable & Recyclable Waste | --- | Rs. 7,7901000/- |
| 2. Total Capital Cost of one time Supply items | --- | Rs. 81,60000/- |
| 3. Total Cost for Debries & Green Waste | --- | Rs. 52,77000/- |
| **Total Project Cost** | | **Rs. 9,13,38000/-** |

प्रकल्प अहवालामध्ये प्रस्तावीत करण्यात आलेले दर पुढील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| 1) Biodegredable &Recyclable Waste | Rs. 728 Per Ton |
| 2) Debries Green Waste | Rs. 309 Per Ton |

सरासरी प्रतीटन रू.६४३.८८/- असा दर प्रकल्प अहवाला मध्ये प्रस्तावीत करण्यात आला आहे.

करीता All India Institute of Local Self Government, Mumbai यांनी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी साठी दिलेला प्रकल्प अहवाल मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

श्री.संतोष खेंडके : मागील इतिवृत्तातील विषय क्र.८३९ हा मंजूर करण्यांत यावा.

मा.महापौर : मंजूरी देण्यांत येते. तसेच ऐनवेळचे अंधश्रध्दा निर्मूलनचा प्रस्ताव आहे तसेच एक आरसीएच संबंधी आहे, हे प्रस्ताव मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घनकचरा हाताळणी व व्यवस्थापनाची कार्यवाही मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानूसार आणि वने, पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांच्या २५ सप्टेंबर २००० च्या नोटी फिकेशन प्रमाणे करणेस तसेच घनकचरा व्यवस्थापनाच्या नियमा मध्ये झालेल्या अमुलाग्र बदलांचे पालन करण्याच्या दृष्टीने औरंगाबाद महानगरपालिकेने या कामी All India Institute of Local Self Government, Mumbai या संस्थेची प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट (पी.एम.सी.) म्हणून नियुक्ती करणेस व All India Institute of Local Self Government, Mumbai यांनी औरंगाबाद शहराच्या घनकचरा व्यवस्थापनाच्या Collection, transfer & Transportation चा रू.९,१३,३८,०००/- खर्चाच्या प्रकल्प अहवालास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.सतीश कटकटे : प्रश्न विचारलेला होता त्यांचे उत्तर अदयाप मला मिळाले नाही.

मा. महापौर : कोणता प्रश्न विचारलेला होता नगरसचिव यांनी माहिती दयावी.

नगर सचिव : प्रश्न क्र. ७३ नुसार माहिती विचारलेली होती ती शहर अभियंता तसेच सहा.संचालक नगररचना यांचे संबधीत असून त्यांना दिं. १२.६.२००७ रोजी पत्र आणि प्रश्न पाठविलेला आहे त्यांचे उत्तर प्राप्त न झाल्याने स.सदस्य उत्तराची मागणी करीत आहे.

**प्रश्न क्र.७३ :**

०१. महापालिकेने आज पर्यन्त किती भुसंपादन केले? कोठे कोठे?किती जागा व कोणत्या दराने?

०२. भुसंपादनापोटी आजपावेतो किती रक्कम अदा करण्यात आली?(प्रतिवर्ष)व कोणाकोणास?

०३. भुसंपादन केलेल्या कोणकोणत्या जागेवर PR कार्डवर मनपाची नोंद घेण्यात आली? व कोणकोणत्या जागेवर PR कार्डवर मनपाची नावाची नोंद घेणे बाकी आहे?

०४. आतापर्यंत भुसंपादन केलेल्या मनपाच्या मालकीच्या जागेस संरक्षित (तार फेन्सींग) करण्यात आले. आहे काय? त्या ठिकाणी मनपाचा बोर्ड लावण्यात आला काय?

०५. भुसंपादन केल्यावर PR कार्डवर नाव टाकून घेण्याची जबाबदारी मनपाची आहे की? भुसंपादन करून देणाऱ्या व्यक्तीची?संबंधितास भुसंपादनाचा धनादेश अदा करण्याची नियमावली काय? केव्हा अदा करावा?

**उत्तर :** अप्राप्त.

मा. महापौर : संबधीत अधिकारी यांनी खूलासा करावा.

उपअभियंता नगर रचना : सदर प्रश्नानूसार महापालिका स्थापन झाल्यापासूनची माहिती विचारलेली आहे. ही सर्व माहिती काढण्यासाठी मा.आयुक्त यांनी विशेष अधिकाऱ्याची नियुक्ती केली असून दीड महिण्याचा वेळ दिलेला आहे. पूर्ण माहिती काढणे झाल्यानंतर देण्यात येईल.

मा. महापौर : ही माहिती काढण्यासाठी दीड महिण्याचा वेळ दिलेला होता. आणखी पंधरा दिवसात संपूर्ण माहिती स. सदस्यांना दिली जाईल.यानंतर ११२४ ची नोंकर भरती संदर्भात चर्चा करावी.

श्री.कैलास गायकवाड : ११२४ नोकर भरतीतील १० कर्मचाऱ्याना बडतर्फ करण्यात आले सकाळपासून त्यांचे कुटूंबसह ते उपोषणास बसलेले आहे. ज्या कर्मचाऱ्यांनी १५ वर्ष साफसफाईचे काम केले त्यांना कोणत्या नियमानूसार मा. आयुक्तांनी बडतर्फ केलेले आहे.त्यांचेवर उपासमारीची वेळ आलेली आहे.

श्री.संजय रिडलॉन : या दहा कर्मचाऱ्यांना कसा न्याय मिळेल यासाठी कार्यवाही करावी. यापूर्वी अनेक प्रकारच्या चौकशा चालू आहे. कर्मचाऱ्यानां सेवेतून काढले अधिकाऱ्यावर काय कार्यवाही होणार आहे. यात १६,१७ वर्षाचे कर्मचारी भरती केले यास अधिकारी दोषी आहेत. या कर्मचाऱ्यावर आज उपासमारीची वेळ आलेली आहे.यांचे बरोबर अधिकाऱ्यावरही कार्यवाही करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे : नोकर भरती करतांना अनेक नियमाचे उल्लघंन झाले.दोन्ही सभागृहात यावर चर्चा झाली प्रशासनाच्या निदर्शनास ही बाब आणून दिली त्यानंतरही कार्यवाही

झाली नाही.त्यावर स्थायी समितीने या संदर्भात सखोल चौकशीचे आदेश करून श्री.कमलाकर फड यांना चौकशी करण्याचे सूचविले. दोन वर्ष उलटले लोकप्रतिनिधीने वेळोवेळी माहिती घेण्याचा प्रयत्न केला. तसेच दै.सकाळ या वृत्तपत्राच्या माध्यमातून हा विषय किती महत्वाचा व चौकशी होणे गरजेचे आहे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. नोकर भरतीचा हा प्रश्न विधान सभेमध्ये आमदाराच्या माध्यमातून मांडण्यात आला त्यावेळी नगरविकास राज्यमंत्री यांनी या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल व दोषी अधिकाऱ्यावर कार्यवाही केली जाईल असे म्हटले होते. त्यावेळी तीन चार प्रकरणाची चौकशी लावलेली होती. पूढे अधिवेशनात या संदर्भात कार्यवाही काय केली म्हणून माहिती मागविण्यात आली त्यावेळी संपूर्ण चौकशी करण्यात येईल असे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले. जेंव्हा मा.मुख्यमंत्री व राज्यमंत्री यांना लेखी स्वरूपात माहीती देण्याची वेळ आली व अधिवेशन सुरू होत आहे म्हणून थातूर मातूर उत्तर प्रशासनाच्या वतीने त्यावेळी देण्यात आले. या सभागृहाने चौकशी समिती नियुक्त केली अहवाल या सभागृहासमोर यायला पाहिजे होता.प्रशासनाने ठराविक कार्यवाही केलीयात कूणाचा किती दोष आहे स्पष्ट केले नाही विधान सभेत जी माहिती दिली जाणीवपूर्वक दिशाभूल करण्याच्या दृष्टीने कार्यवाही केल्याचे दाखविले आहे.त्याचा निषेध व धिक्कार करतो. प्रशासनावर कार्यवाही होवू नये म्हणून दहा कर्मचाऱ्यावर कार्यवाही केली परंतू त्या कर्मचाऱ्याचा दोष होता का याची शहानिशा करायला पाहिजे होती ती केली नाही ११२४ नोकर भरती प्रकरणाचा हा महत्वाचा विषय असतांना आयुक्त आज सभेला उपस्थित नसल्याने त्यांनी या प्रश्नाचे उत्तर दिले असते. उपआयुक्त प्रशासन यांना प्राधिकृत केलेले आहे. आयुक्त म्हणून बसलेले आहे. त्यांनाच या प्रकरणात नोटीस दिली तर याचे उत्तर कोण देणार आहे. १० कर्मचाऱ्यावर कार्यवाही करून हा प्रश्न मिटणार नसून वस्तूस्थितीला धरून कार्यवाही व्हावी. ३५० कर्मचाऱ्यावर अन्याय झालेला आहे. ११२४ मधील भरतीतील ज्याची बोगस भरती केली ते कर्मचारी काम करीत नाही चौकशीचा अहवाल या सभागृहासमोर ठेवायला पाहिजे होता. त्यावर चर्चा करून योग्य तो निर्णय घेता आला असता अहवाल प्रशासनाने या सभागृहासमोर का ठेवला नाही. १० कर्मचारी कसे दोषी, त्यांचा किती दोष आहे, त्यावर चर्चा होणे योग्य होईल.

श्री.मिलींद दाभाडे : १० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यावर अशी कार्यवाही होणार असल्याचे समजते. परंतू ज्यावेळी या कर्मचाऱ्याना सेवेत घेण्यात आले त्यावेळी त्यांचे वय कमी होते परंतू त्यानंतर जेंव्हा त्याचे वय सेवेत भरती करण्यास पात्र ठरले. तेंव्हा पासून त्याची सेवा ग्राहय धरावी जोपर्यत वयाने पात्र ठरत नव्हते तोपर्यत या कर्मचाऱ्यांना दंडात्मक कार्यवाही म्हणून जे की त्यांचे पगारातील ४०० ते ५०० रू. कपात करावी. त्यांना कायमस्वरूपी नोकरीतून कमी करण्यात येवू नये. बडतर्फी आदेश रद्द करावा.

श्री.सलीम खान :या कर्मचाऱ्यांना जेंव्हा सेवेत घेतले गेले त्यावेळी जे अधिकारी होते त्यांनी पूर्ण शहानिशा करून नियुक्ती केलेली नव्हती काय?सदर कर्मचारी हे दहा बारा

वर्षापासून काम करीत होते. ज्या अधिकाऱ्यांनी भरती केली,त्यांना बडतर्फ करण्यात यावे. जे गरीब आहे त्यांचेवर अन्याय होतो तो दूर करावा.

श्री.सतिष कटकटे : भरती करतांना त्यांना समजले नाही का. यापूर्वीही ६ लोकांना निलंबीत केले.

मा.महापौर : विधान सभेत मा. आमदार यांनी प्रश्न उपस्थित केला म्हणून ही चौकशी होत आहे.चौकशी योग्य झाली किंवा अयोग्य झाली कूणावर कार्यवाही झाली कूणावर केली नाही व कुणावर कार्यवाही होणार तो अहवाल सभागृहासमोर येईलच जेंव्हा हा प्रश्न विधान सभेत उपस्थित झाला त्यावेळी दोषीवर कार्यवाही करण्यात येईल असे राज्यमंत्री मा. ना. श्री. राजेश टोपे साहेब यांनी स्पष्ट म्हटलेले होते.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :१० कर्मचाऱ्याना बडतर्फ केले आणखी काही कर्मचाऱ्यावर कार्यवाही होणार आहे. ही संख्या ४०० पर्यत जाईल. यात वय कमी असलेल्यांना नोकरी दिलेली आहे. वय तपासून नोकरी देणे हे प्रशासनाचे काम होते. या कर्मचाऱ्याना ज्या अधिकाऱ्यानी नोकरी दिली त्यांचेवर कार्यवाही व्हावी. विधान सभेत हा प्रश्न उपस्थित झाला तो भाग वेगळा आहे परंतू या कर्मचाऱ्याना कामावर घेण्याचे या सभागृहाला अधिकार आहे. कोणत्याही कर्मचाऱ्याना बडतर्फ करण्या अगोदर स्थायी समितीची मान्यता लागते ती घेतली नाही.स्थायी समिती अधिकार आयुक्तांनी कोणत्या नियमानूसार वापरले,सदर कर्मचारी न्यायालयात या विषयी दाद मागवू शकतात कोर्टही त्यांचे बाजूने निर्णय देईल, स्थायी समितीची मान्यता घेवूनच बडतर्फ करणे नियमाने योग्य होते.

श्री.सतीश कटकटे : कमी वयाचे कर्मचारी आहे म्हणून याची शहानिशा न करता अधिकाऱ्यानी नियुक्ती पत्र दिले त्याचेवर कार्यवाही झाली पाहिजे. ज्या कर्मचाऱ्यानी महापालिकेचे आर्थिक नुकसान केलेले आहे अशा लोकांना कामावर घेतले या कर्मचाऱ्यानी पाच ते सहा वर्ष सेवा केली त्यांनी कोणतेही आर्थिक नुकसान केलेले नाही त्यांना कामावर घ्यावे. जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :११२४ नोकर भरती प्रकरण हे महापालिकेला लागलेला आजार आहे.वरीष्ठापासून कार्यवाही व्हावी.१० कर्मचाऱ्याचा दोष नाही.त्यांना कामावर घेण्यात यावा ज्या अधिकाऱ्यानी भरती केले ते त्यांनी जाणूनबूजून केलेले आहे. त्यांचेवर पोलीसात कार्यवाही करून निलंबीत करावे.

श्री.भगवान घडमोडे : या भरती प्रकरणाची माहिती वृत्तपत्राच्या माध्यमातून मिळत आहे सभागृहापर्यत कोणतीही माहिती आलेली नाही. ज्यांना बडतर्फ केले ते दोषी आहेत का कोणत्या कारणामूळे कोणत्या नियमाने निलंबीत केले यात बरेच अशिक्षीत असून नोकरीकशा प्रकारे मिळते हे सूध्दा माहित नाही नोकरीवर ज्यांनी घेतले त्याचे मोठे रॅकेट त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे. काहीचे मा. न्यायालयाचे आदेश आणले त्यांनी ते कसे मिळविले वकील कोण होते.त्यांनी काय बाजू मांडली माझ्या माहिती प्रमाणे बोगस चौकशी करून जे गरीब आहे त्यांचेवर अन्याय होत आहे. जे दोषी आहे त्यांचेवर कार्यवाही केली नाही. माझ्या वार्डातील विजय शेंडगे नावाचा मूलागा महापालिकेत त्यांनी सेवाच केली नाही. परंतू मा. न्यायालयाच्या यादीत त्याचे नाव आहे व त्या यादीनूसार नोकरीवर घेण्याची तो मागणी करीत आहे. सर्व

काही गोलमोल आहे. नोकरी करणाराऱ्याचा दोष नाही. पारदर्शक चौकशी करून जे खरे दोषी असतील त्यांना सजा व्हावी.वयाची चर्चा होत आहे परंतू नोकरीवर घेतले त्यांचेवर सूध्दा त्यावेळी कमी नव्हते. जे कामावरच नव्हते त्यांचे बोगस नाव वय दाखवून तसे कागदपत्र तयार करून मा. न्यायालयाच्या समोर रेकॉर्डवर आणून यादीत घुसडले गेले. कर्मचाऱ्याचा दोष नाही ज्या अधिकाऱ्यानी त्यांचेकडून पैशाचे व्यवहार करून जाणून बूजून हे केले त्यांचेवर कार्यवाही करावी.या कर्मचाऱ्याना कामावर घेण्यात यावे. गेले.

श्री.हिम्मतराव दाभाडे : महापालिकेचे आर्थिक नूकसान व कुणावर अन्याय होवू नये यासाठी व याच बरोबर शहरातील विकास कामे करण्यासाठी सदस्याना नागरीकानी निवडून पाठविले आहे.जो खऱ्या अर्थाने बोलतो त्यांची टिग्गल उडविली जाते.११२४ कर्मचाऱ्याच्या भरती संदर्भात विधान सभेत मुद्या उपस्थित झाला त्यानंतर हे कर्मचारी बोगस भरती केले म्हणून प्रशासनाकडे तसे पत्र आलेले आहे का,वयाची शहानिशा न करता अधिकाऱ्यानी या कर्मचाऱ्याना भरती केले, नोकरी करणाऱ्याचा दोष नाही.अधिकाऱ्यांचा दोष आहे. जी कार्यवाही केली ती नियमात बसत नाही असे माझे मत आहे.जेव्हा या कर्मचाऱ्यांचे वय कमी होते तेंव्हा कामावर घेतले व आता वय पूर्ण झाले तर कामावरून काढणे कितपत योग्य आहे.कामावरून कमी करतांना प्रशासनाने स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली नाही. कुटूंबासहीत ते महापालिकेच्या गेट समोर उपोषणास बसलेले आहे''चोर सोडून सन्यासास फाशी'' असे होत आहे.त्वरीत कामावर घेण्यात यावे यात अधिकारी दोषी आहे त्यांचेवर कडक कार्यवाही करावी.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : या कर्मचाऱ्याना कामावर घ्यावे जे अधिकारी दोषी आहे त्यांचेवर पूढील सभेपर्यत कार्यवाही केली नाही तर आम्ही सर्व सदस्य उपोषणास बसावे लागेल इतपत वेळ येवू नये.

श्री.सतीश कटकटे : नोकर भरती करतांना कोणते अधिकारी /कर्मचारी यांचा सहभाग होता त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.अ.रशिद खॉन :दहा कर्मचाऱ्यांना बडतर्फ केले आणखी होतील.मा. सर्वोच्च न्यायालयाचा असा निकाल आहे की १० वर्षही अस्थायी म्हणून काम केले तर त्यांना कामावरून कमी करता येते. कायम स्वरूपी कर्मचाऱ्यासाठी असे काही आलेले नाही.मी महापौर असतांना ११२४ पदांना मंजूरी दिली होती. ते शासनाकडे पाठवून त्यास मान्यता मिळाली. जेंव्हा भरती केले तेंव्हा नेहरूभवन येथे मुलाखती घेवून नियुक्ती दिली. यात काम करणाऱ्याची की कामावर घेणाऱ्याची चूक आहे. नियुक्ती पत्र दिल्यानंतर सेवेत कायम केले कोणती ही नोटीस न देता त्यांचे म्हणणे एकूण न घेता कोणत्या नियमानूसार काढण्यात आले जे दोषी आहे त्यांचेवर कार्यवाही करावी. या कर्मचाऱ्याना कामावर घेण्यात यावे. चौकशी चालू राहिल. विधान सभेत उत्तर दयायचे म्हणून कर्मचाऱ्यावर बडतर्फीची कार्यवाही करणे योग्य नाही. ११२४ पदाची पूर्ण भरती केली नाही. ३४ते ४० टक्के पद रिक्त आहे. जे अस्थायी ३१७ कर्मचाऱ्याना सेवेत कायम करणायचे आहे त्या पदावर त्यांना घेणार आहे काय?

श्री.सय्यद खुसरो : जी चौकशी केली ती बोगस केलेली आहे. ज्या अधिकाऱ्यांनी भरती केले त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.संजय रिडलॉन :११२४ नोकर भरतीतील बडतर्फ केलेल्या गरीब कर्मचाऱ्याना तात्काळ कामावर घेण्यात यावे त्यांना न्याय दयावा.

श्री.अनिल जैस्वाल :ज्यांनी भरती केली त्या अधिकारी कर्मचारी यांचेवर कार्यवाही करावी. या कर्मचाऱ्यांना कामावर घेण्यात यावे.

श्रीमती मेहरून्नीसा खान:जे कर्मचारी बडतर्फ केले त्यांना न्याय मिळावा. अधिकारी दोषी आहे त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

श्री.कचरू मोरे :ज्या अधिकाऱ्यानी चौकशी केली चौकशीत या कर्मचाऱ्यांना निलंबीत करावे असे कूठे ही म्हटलेले नाही. अनेक वेळा अधिकाऱ्यावर कार्यवाही केली परत सेवेत घेतलेले आहे. यांना बडतर्फ करण्या ऐवजी दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक होते परंतू डायरेक्ट बडतर्फ करणे योग्य नाही.या भरती प्रकरणात जे अधिकारी होते त्यांनी प्रचंड प्रमाणात गैरव्यवहार केलेला असून ज्यांचेवर कार्यवाही केली ते गरीब लोक आहे. नोकरीच्या वेळेत त्यांना पैशाची मागणी केली त्यानी दिले. या कर्मचाऱ्याचे वय कमी नव्हते. मा. आयुक्तांनी जी कार्यवाही केली ती संशयास्पद आहे. श्री. लोखंडे कामगार अधिकारी यांनी काही कर्मचाऱ्याना सेवेत घेतो म्हणून घरी जावून रक्कम आणलेली आहे त्यांना न्याय देण्याचे काम केले नाही. कर्मचाऱ्यांचा यात दोष नाही जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करावी. जी कार्यवाही केली ती स्थायी समितीची मान्यतेने केली नाही. एकतर्फी कार्यवाही करण्याचा आयुक्तांना अधिकार नाही.या कर्मचाऱ्याना दंडात्मक कार्यवाही करावी बडतर्फ करू नये कामावर घेण्यात यावे.

श्री.संजय जगताप : बडतर्फ केले त्याची माहिती या सभागृहाला किंवा स्थायी समितीची मान्यता घेतलेली नाही.विकास कामाच्या संचिका बाजूला ठेवून इतर संचिका घरी मागवून कार्यवाही करण्याचे काम मा.आयुक्तानी केले. मा.आयुक्त हे त्यांचे कॅबीनमध्ये अनेक वेळा गैरहजर असल्याचे दिसून येते. दुपारी एक तास कार्यालयात थांबण्याच्या सूचना मा. महापौरांनी दयाव्यात.चांगले काम करीत नसेल तर परत शासनाकडे पाठविण्याचा ठराव घेण्यात यावा. ज्यांना निलंबीत केले त्यांना कामावर घेण्याची कार्यवाही करावी.जे उपोषणास बसलेले आहे त्यांचे उपोषण सोडवण्यात यावे.

श्री.संतोष खेंडके : आजच्या बैठकीला मा.आयुक्त उपस्थित नाही. उपआयुक्त (प्र.) यांचीच चौकशी चालू आहे. मा. आयुक्त जेंव्हा येतील तेव्हा यावर खूलासा घेण्यात यावा.

मा. महापौर :११२४ कर्मचारी भरती प्रकरणातील दहा कर्मचाऱ्यांना प्रशासनाने बडतर्फ केलेले अजूनही चौकशी चालू आहे. ज्या अधिकाऱ्यांनी या कर्मचाऱ्याची नियुक्ती केली त्यांचेवर कार्यवाही करण्याची गरज असल्याचे सभागृहाचे मत आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर अहवाल सभागृहासमोर, स्थायी समिती समोर ठेवला जाईल. सभा दहा मिनिटासाठी तहकूब करण्यात येते.

( दु. ३.४५ वा. सभा तहकूब पुन्हा सभला सुरूवात दु.४.१० वा)

मा. महापौर : सिडको हडको भागातील समस्या बाबत चर्चा करावी.

श्री.महेश माळवतकर : सिडको हस्तांतर होवून वर्ष झाले महापालिकेचे त्याकडे लक्ष नाही. जेंव्हा हस्तांतर होईल तेंव्हा पासून मालमत्ता कर आकारण्यात येईल असे आश्वासन येथील नागरीकांना दिले होते परंतू दिलेल्या नोटीसा हया अश्वासानाच्या उलट येत असून सर्वसामान्यांना संभ्रम निर्माण करणाऱ्या आहेत. सिडको हडकोच्या लहानशा घरांना ३०० ते ३५० टॅक्स येवू शकतो त्या ऐवजी १५०० ते २००० रू. पर्यत टॅक्सच्या नोटीसा दिल्या जात आहे. ज्यांनी सर्वे केला ते कर्मचारी टेक्नीकल पात्रतेचे नव्हते. घर बघून नुसते आऊटरवर टॅक्स आकारला आहे. नागरीकांचे अक्षेप येते तीन दिवसात त्याचे निवारण होणे गरजेचे आहे परंतू तसे केले जात नाही. ज्यावर्षाचा टॅक्स असेल त्याच वर्षाच्या फेब्रुवारी पर्यत नोटीस येणे आवश्यक असते परंतू अनेक नागरीकांना एप्रिल नंतर नोटीसेस दिलेल्या आहे हे योग्य नाही. टॅक्स कमी करून देण्यासाठी सामान्य नागरीकांची पिळवणूक केली जाते पैसे घेतले जाते. वाटेल ते बदल एजन्सीचे लोक करून टॅक्स कमी करून देत आहेत. सिडको हस्तांतरण केले तेंव्हा जे नागरीकांना मुलभूत सुविधा तसेच मालमत्ता कर आकारणी संदर्भात आश्वासन दिले त्यानूसार टॅक्स आकारण्यात यावा. येथील नागरीकांना न्याय दयावा.

श्री.अनिल जैस्वाल : वार्ड क्र.१९ मध्ये सिडकोने एक मीटर रूंदीचा नाला बांधलेला असून आंबेडकरनगर कडील नाल्याचे पाणी यात सोडलेले आहे.मोठया प्रमाणात पाऊस झाल्यास किमान ४०० घरामध्ये पाणी जाईल. अल्प मुदतीची निविदा काढून त्वरीत हे काम करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

श्रीमती जयश्री किवळेकर :सिडको हस्तांतरण होवून दीड वर्ष झाले. या भागात कंत्राटी पध्दतीने सेवा सूविधा दिल्या जातात परंतू महापालिकेचे त्याकडे लक्ष नाही. हस्तांतरणापूर्वी सिडको कमी खर्चात चांगल्या सुविधा देत होते. परंतू सिडको हस्तांतर केल्यानंतर महापालिकेने ४० कोटी रू. घेतले. हस्तांतरण झाल्यापासून पूढील एक वर्ष २००७ पर्यत टॅक्स आकारावा परंतू टॅक्स लावतांना चूकीच्या पध्दतीने लावलेला आहे. सिडको अस्तित्वात आले तेंव्हापासून ही प्लॅन सिटी होती. घराचा सर्व जागाचे रेकॉर्ड घराचे क्षेत्रफळ सिडकोने महापालिकेला दिलेले असतांना स्पेक एजन्सीला सर्वे देण्याची गरज नव्हती. तेथील सर्व सदस्यांचा या एजन्सीला विरोध असतांना ती प्लॅन सीटी असतांना तेथील नागरीकांवर ही एजन्सील लादली गेली हे योग्य नाही. आजही स्पेक एजन्सीचे लोक आम्हाला महापालिकेने पाठविले. पैसे घेवून टॅक्स कमी करतात.महापालिकेने सर्व रेकॉर्ड नूसार मालमत्ता कर आकारला असता तर वसूली करण्यास त्रास झाला नसता.बीओटी वर देणे पीएमसी नेमणे यातून नागरीकांची पिळवणूक होते सिडको हडकोच्या २० स. सदस्यांच्या वार्डात कोणतेही काम झालेले नाही. आपण भेट दयावी. कामे होत नसतांना या भागातील नागरीकांना घराचा टॅक्स आकारला जातो हे योग्य वाटत नाही. सर्व रेकॉर्ड असतांना एजन्सी नियुक्त करण्याचे कारण काय याचा खूलासा करावा.

श्री.रविकांत गवळी : सिडकोचे हस्तांतर झाले. त्या माध्यमातून महापालिकेला ४० कोटी मिळाले. ९कोटीच्या वर कामे अदयाप झालेली नाही.

श्रीमती जयश्री किवळेकर : ४० कोटी घेवून सिडको हडको भागात कामे झाली नाही प्रशासनाचा हा गोधंळ कूठेतरी थांबला पाहिजे आपण या शहराचे प्रथम नागरीक म्हणून या भागात कामे का होत नाही म्हणून जाब विचारला पाहिजे. नसता पून्हा स्वतंत्र नगरपालिका करावी म्हणून शासनास मागणी करावी लागेल. सिडको साठी असलेला निधी वापरला का गेलेला नाही. ४० कोटी सिडको हस्तांतरण म्हणून मिळाले त्यातून विकास कामे का झालेली नाही व सदर एजन्सीला सर्वेचे काम देण्याची गरज का भासली जो कर आकारला गेला तो जास्तीचा असून चूकीच्या पध्दतीने आकारला आहे. या भागात सुशिक्षीत लोक राहतात. सुमारे २२०० बंगले आहेत.

श्री.रविकांत गवळी : ४ लक्ष लोकसंख्येचा प्रश्न आहे. सर्वेची गरज नसतांना स्पेकला काम दिले. साचेबध्द एरीया असतांना सर्व प्लॅनसीटी होती महापालिकेचे कर्मचारी टॅक्स लावू शकले असते. सर्वे करण्याची गरज नव्हती. एजन्सीने काही घरांना एक हजाराऐवजी ५ हजार टॅक्स आकारणी केली. तो कमी करण्यासाठी १ हजार ,२ हजार घेवून कमी करतात. सिडको हडको भागातील घराचे क्षेत्रफळ हे ठराविक आहेत. वरील बाधंकाम करण्याची परवानगी घ्यायची असेल तर सिडकोची परवानगी घेतलेली आहे त्याचे रेकॉर्ड महापालिकेला दिलेले असतील. स्पेकच्या नोटीस नूसार कुणीही टॅक्स भरणा करणार नाही. हेरींगला येणार नाही. तसेच हस्तांतरणापोटी महापालिकेला शासनाकडून २५ कोटी तसेच सिडकोने १५ कोटी असे एकूण ४० कोटी विकास कामासाठी दिलेले असतांना दिड वर्ष उलटले या भागात ९ कोटीची तोटक कामे झालेली आहे. या वर्षी कोणतेही कामे केलेली नाही मुलभूत सुविधा दिल्या जात नाही. सिडकोने ज्या लोकांना साफसफाई ठेका दिला होता त्याच एजन्सीला महापालिकेने ठेका दिला साफसफाई न होता बिल अदा केले जात आहे हे बरोबर नाही. ठराविक एजन्सीला काम मिळण्यासाठी तसे नॉमस् टाकले जाते.एजन्सी कुणाचे ऐकून घेत नाही. अतिक्रमणे होत आहे जे प्रशासकीय अधिकारी कोण आहे ते सदस्यांना माहित नाही.हस्तांतरण करतेवेळी या भागात झालेले अतिक्रमण सिडकोकडून काढणार होते. ते अदयाप काढलेले नाही. तसेच वार्डा औषध फवारणी होत नाही.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : आपल्याला सत्तेवर बसविण्यास सिडकोचा ९० टक्के वाटा आहे याची जाणीव ठेवून कामे व्हावीत.स्पेक कंपनीला कायदयानूसार व्हॅल्यूशन करून कर आकारणी करण्याचा अधिकार नाही. सिडकोत बैठक झाली त्यावेळी स्पेकने सर्व रिपोर्ट महापालिकेकडे दयावा व महापालिकेने नोटीसेस दयाव्यात हेरींग होवून संबधीताचे म्हणणे ऐकूण घेवून तो कर अंतिम करावा असे ठरले होते.स्पेकने दिलेल्या सर्व नोटीसेस रद्य कराव्यात.जुन्या शहरात ज्या प्रमाणात दीड वर्षात विकास कामे झाली त्या प्रमाणात सिडको भागात झालेली नाही. साफसफाईचा ज्या एजन्सीला ठेका दिला त्या एजन्सीकडील सर्व लेबर बोलवून प्रत्यक्ष त्याची हजेरी घ्यावी ते काम करतात की नाही हे तपासावे. माझ्या माहिती प्रमाणे १००० लेबर दाखवले

जाते परंतू कामावर १०० ही नसतात.महापालिकेकडे सक्षम अधिकारी आहे. खाजगी एजन्सीकडे काम न देता महापालिकेने साफसफाई केल्यास योग्य होईल. सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेवून सिडको भागात आवश्यक ती विकास कामे व मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी लक्ष दयावे.

सौ. रजनी जोशी : सन १९९५ पासून हस्तांतरणाची कार्यवाही चालू होती. हस्तांतरण होणे गरजेचे होते याबध्दल दुमत नाही.हस्तांतर करते वेळी लिज होल्ड चे फ्रि होल्ट एक महिण्यात करण्यात येईल असे राज्यमंत्री यांचे उपस्थित निर्णय झालेला होता. दीड वर्ष झाले कार्यवाही नाही.कर लावतेवेळी स्वत:च्या मालकीचे घरे झाली पाहिजे असा विषय होता. त्यावर निर्णय घेवून शासनाकडे पाठवावे. जो मालमत्ता कर स्पेक एजन्सीने आकारला आहे तो चूकीचा आहे.कूणी कर भरणा करणार नाही. स्पेक एजन्सीला सर्वे देण्यास या भागातील सदस्यांचा विरोध असतांना ती लादली आहे.या भागात एकूण २२ सदस्य निवडून आलेले आहे. या भागातील विकास कामावर जातीने आपण लक्ष देण्याची गरज आहे.टी व्ही सेन्टर भागात मोठया प्रमाणात रस्त्यावर अतिक्रमण झालेले आहे. याकडे प्रशासनाचे लक्ष नाही तसेच साफसफाईचे कोणतेही काम वेळेवर होत नाही.वार्ड अधिकारी यांनी याकडे लक्ष दयावे. तसेच या भागात ज्या खुल्या जागा आहेत त्याचा विकास करावा.

सौ. पुष्पा शिंदे : जयभवानी नगर भागात सिडको भागातून नाला येतो सिडकोच्या हद्दीपर्यत काम करण्यात आले. त्यानंतर ओपन सोडले गेले. चार ते पाच वार्डाचे पाणी या नाल्यातून येते. नाल्याचे काम होत नाही तोपर्यत रस्त्याचेही काम करता येणार नाही. १३ व्या योजनेत पाण्याची पाईपलाईन मंजूर झालेली होती. ते काम केंव्हा पूर्ण होवून पिण्याचे पाणी देणार आहोत याचा खूलासा करावा.

श्री.प्रल्हाद निमंगावकर : ११ व्या स्कीम मधील सर्व रस्ते खराब झालेले आहे कामाची वर्क ऑर्डर झालेली आहे. शिवाजीनगर महापालिकेत येणार म्हणून ते रद्द केले. किमान या रस्त्यावर पॅचवर्क करण्यात यावे. तसेच खूल्या जागा उद्यानाची दुरावस्था झालेली आहे.तेथे साफसफाई करणे, पथदिवे लावणे पाण्याची व्यवस्था करणे ई. विकास कामे करून त्या मालमत्ताचे संरक्षण करावे.

श्री.मोहन मेघावाले :सिडको भागात नागरी सुविधा दिल्या जात नाही मोठा अन्याय होत आहे. हस्तांतरण झाल्यापासून मोठया प्रमाणात अतिक्रमणे झाली जे प्रशासकीय अधिकारी नियुक्त केले ते सक्षम नाही,सक्षम अधिकारी या भागात दयावेत. सिडको हडको भागातील घरे ही ठराविक क्षेत्रफळ असलेली आहे.एक सारखी घरे आहेत. परंतू स्पेक या एजन्सीने वाजवी पेक्षा जास्त टॅक्स आकारणी करून नोटीसेस दिलेल्या आहे. एकाच आकाराच्या घरात एकास १५०० ते दुसऱ्या घरास ३००० रू. आकारणी केलेली आहे. हस्तांतरण होण्यापूर्वी या भागात सिडको कडून मागणी केल्यानूसार मुलभूत सूविधा वेळेवर मिळत असे, महापालिकेकडे आल्यापासून त्या मिळत नाही. साफसफाई वेळेवर होत नाही. एजन्सीकडे मागणी केल्यास स. सदस्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले जाते. या भागातील लोकसंख्येचा संपूर्ण कल युतीच्या मागे असतांना या भागात विकास

कामे होत नाही नागरीक अन्याय सहन करणार नाही. एजन्सी ही अधिकारी तसेच स. सदस्यांना ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न करते. अशा पध्दतीने काम होत असेल तर नागरीकाचे प्रश्न सूटणार नाही. विनंती की या भागात आपण जास्तीत जास्त विकास कामास गती दयावी.नागरी मुलभूत सुविधा देण्याकडे लक्ष दयावे.हस्तांतरण झाले आपल्यावर अन्याय होतो असे येथील नागरीकाना वाटू नये.या दृष्टीने कामे करण्यात यावी.

श्री.भाऊसाहेब ताठे : सिडको हडको भागात तीन चार प्रकारचे घराचे क्षेत्रफळ आहे. सारखेच घरे असतांना ५०० रू पासून ते २० हजार पर्यत टॅक्स आकारणी केलेली आहे. एवढा फरक येतो चूकीचे आहे. तसेच या भागात औषधी फवारणी होत नाही फवारणी न होता संबधीतास बील देवू नये. साफसफाई होत नाही. मोठया प्रमाणात टॅक्स आकारणी केलेली आहे. सिडको कार्यालयात परवानगी साठी लोक जातात नगररचना विभागाकडून बांधकाम परवानगी दिली जात नाही. परवानगी देतांना बेबाकी प्रमाणपत्र असावे असे ठरले होते. परंतू एनओसीची मागणी होत आहे.

उपअभियंता(न.र.) : बेबाकी प्रमाणपत्रच मागविले जाते.

मा.महापौर : हस्तांतरणाच्या वेळेत बेबाकी प्रमाणपत्र घेण्याचे ठरले असेल तर एनओसीची गरज नाही. यापूढे बेबाकी प्रमाणपत्र घेण्यात यावे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : जे सेवा कर किंवा एन. ए चे चार्जेस असतील त्या बाबतीत नो डयुज मागविण्याची आदेशीत करावे.

श्रीमती जयश्री किवळेकर : बांधकाम परवानगी साठी सिडको हडको तील घर मालकाने फक्त एन. ए तसेच सेवा कर भरण्याचे प्रमाणपत्र दयावे असे ठरले होते.

श्री.भाऊसाहेब ताठे : सिडकाने हेल्थ सेंन्टर कम्युनिटी हॉल सेवाभावी संस्थेला भाडेने देणेसाठी जाहिरात दिलेली होती त्यावर महापालिकेने ठराव घेवून अशा जागा महापालिका नाममात्र दराने घेण्यास तयार आहोत अशा सूचना केल्या होत्या त्याची अदयाप अमलबजावणी झालेली नाही. सिडकोने महापालिकेला १५ कोटी दिले त्यातून सहा ते सात कोटीची कामे झालेली आहे. या भागात जास्तीत जास्त कामे करण्यावर भर दयावा तसेच सिडको हडको भागात पाणीपुरवठा कमी प्रमाणात होतो त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्री.प्रकाश अत्तरदे :माझ्या घराच्या मागे नाला आहे तेथे अदयाप साफसफाई झालेली नाही. एक लेबर यांना चांगली सफाई करावी म्हणून म्हटले तर त्यांनी माझ्या विरोधात पोलीस स्टेशनला जातीवाचक शिवीगाळ केली म्हणून तक्रार दिली.असे एजन्सीकडे काम ठेवू नये रद्य करावे महानगरपालिकेने साफसफाई करावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : हस्तातरंण करतेवेळी लीज होल्डचे फ्रि होल्ड करण्यात येईल असे आश्वासन शासनाने दिलेले होते.अदयाप कार्यवाही नाही.शासनाकडे तसे पत्र देण्याच्या सूचना कराव्यात.सिडकोचे घरे ही प्लॅनींग नूसार घरे असतांना स्पेक एजन्सीला सर्वे देण्याची गरज नाही असे बैठकीत ठरले होते असे असतांना स्पेक एजन्सीचे कर्मचारी आजही सर्वे करीत असून नोटीस देत असतील तर ते नागरीकावर अन्याय होत आहे. मालमत्ताचे चार प्रकारात विभागज केले होते अ,ब,क,ड नुसार

मालमत्ता कर आकारला जात आहे. सिडको भागातील सर्व मालमत्ता ह्या क व ड वर्गात येतात. कमीत कमी टॅक्स आकारणी करणे गरजेचे होते.सिडकोने २२ ते २५ हजार घरे वेगवेगळया स्कीम मधून बांधलेले आहे. ५वी स्कीमचे घर हे सिडकाचे सर्वात मोठे घर आहे. त्यास जवळपास ८००रू. टॅक्स व जास्तीचे बांधकाम केलेले असेल तर ९५० रू. पेक्षा जास्त कर आकारणी होवू शकत नाही.घर मालकच्या नावाने तसेच किरायादार असेल तर त्यांचेही नावाचे मालमत्ता कराच्या नोटीसेस दिलेल्या आहेत.कोणताही ठोस निर्णय होत नाही तोपर्यत स्पेक एजन्सीने सर्वे करू नये असे आज आपण आदेशीत करावे. सिडकोने १५ कोटी तसेच शासनाचे २५ कोटी असे एकूण ४० कोटी सिडकोच्या विकासाठी दिलेले होते. त्यातील ७ ते ८ कोटी खर्च झाले. ४० कोटी पूर्ण खर्च करीत नाही तोपर्यत या भागात मालमत्ता कर वसूल करू नये.जोपर्यत लिज होल्डचे फ्रि होल्ड करीत नाही तोपर्यत ५० टक्के सुट मिळावी. ज्या ज्या सुविधा देण्याचे आश्वासन जनतेला दिले त्या बाबतीत आपण निर्णय घ्यावा.

मा. महापौर : सिडको हडकोतील सर्व सदस्यांनी तेथील समस्या बाबत भावना व्यक्त केल्या ज्या अपेक्षेने कामे होणे अपेक्षीत होते तेवढी झालेली नाही. नगरसेवक व नागरीकांच्या भावना तिव्र आहे. विविध मागण्यामध्ये लिज होल्ड चे फ्रि होल्ड व्हावे या संदर्भात या सभागृहात निर्णय घेवून शासनाकडून मान्यता आणण्यासाठी लवकरात लवकर आपण मा.मुख्यमंत्री व मा.राज्यमंत्री नगर विकास विभाग यांचेकडे सिडको,हडकोचे डेलीगेशन घेवून जावू. जर सिडको हडकोचे घर जूने असेल व त्यावेळचा जो एनआरव्ही त्याप्रमाणे ज्या दिवसापासून हस्तांतरण झाले तेंव्हा पासून टॅक्स लावलेला आहे. तो टॅक्स जास्त होत आहे म्हणून जुन्या प्रमाणे टॅक्स भरण्याची गरज नाही नवीन नोटीसेस देवून जे की जेंव्हा पासून घर बाधंले असेल तेंव्हापासूनचा टॅक्स वसूल करण्यात येईल. साफसफाई होत नाही. वार्ड कार्यालय ड ची हीच परीस्थिती आहे. म्हणून दिलेले टेंडर किती दिवसाचे आहे. व किती दिवसात रद्य करता येईल या बाबत कार्यवाही करावी. तसेच सिडको हडको भागातील उद्यान, मोकळया जागा असतील यावर विकास करण्यासाठी भरीव तरतूद करण्याची गरज आहे. आज मा. आयुक्त सभेला उपस्थित नाही. सिडकोने हस्तांतरणापोटी महापालिकेला जे १५ कोटी दिले होते ते कुठे खर्च केले याचा तपशील घेवून स.सदस्यांना माहिती दिली जाईल. सिडको हडको भागाच्या समस्या सोडवण्या करीता सिडको येथील महापालिकेच्या प्रभाग कार्यालयात येत्या २४ तारखेला सकाळी ११.०० वाजता एक व्यापक बैठक आयोजित करण्यात येईल या बैठकीला सर्व पदाधिकारी स. सदस्य तसेच अधिकारी वर्ग उपस्थित राहतील.

श्री.अनिल जैस्वाल :सिडको हडको भागात औषध फवारणी होत नाही.

श्री.महेश माळवतकर : मागिल वर्षभरात औषध फवारणी झाली त्याची तपासणी केली जाते का वर्षभरात एकदा फवारणी झालेली आहे.कोणते औषध फवारले जाते.

आरोग्य वैद्य. अधिकारी : औषध फवारणी केली जाते.

श्री.महेश माळवतकर : ६० हजार रू. महिण्याला बिल दिले जाते औषध फवारी होते की नाही याकडे कोण लक्ष देणार आहे.उलट डासाच्या संख्येत वाढ झाली आहे.

श्री.भगवान घडमोडे : साफसफाई, औषध फवारणी तसेच स्पेकच्या नोटीस संदर्भात निर्णय घेवून आजची सभा संपवावी.

मा. महापौर : सिडको हडको भागात औषध फवारणी करण्या संदर्भात उपाययोजना करावी.संबधीत अधिकारी यांनी २४ तारखेच्या बैठकीला सिडको कार्यालयात उपस्थित रहावे हा विषय तेथे घेतला जाईल.

श्री.संतोष खेंडके : सिडको प्रमाणेच जुन्या शहरातही तसेच गजानन महाराज मंदीर समोरील रस्त्यावर मोठया प्रमाणात अतिक्रमण झालेले असून सेन्ट्रलाईज करून भरारी पथक नियुक्त करण्याची गरज आहे.

मा.महापौर : सिडको भागासाठी एक सहा.प्रशासकीय अधिकारी तसेच एक भरारी पथक कार्यान्वित करून प्रशासनाने कार्यवाही करावी.वार्ड अधिकारी यांचेकडील चार्ज काढण्यात येणार आहे.जयभवानी नगर च्या रस्त्याचे कामाचे टेंडर दिले काम का होत नाही त्याच बरोबर जयभवानी नगरचा नाल्याचे काम का होत नाही दोन्ही अधिकारी यांनी खूलासा करावा.

अति.शहर अभियंता : मुकूंदवाडी रेल्वेस्टेशन या रस्त्याचे काम दीड ते दोन वर्षात सूरू करण्यात आले होते. ३०टक्के काम पूर्ण झालेले असून तीन वेळेस कामास सुरूवात केली त्या त्या वेळी तेथील नागरीकांनी काम बंद केले. मा.महापौर ही आले होते. तीन वेळेस काम बंद पडले.

मा. महापौर : महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण झालेले असेल ते पोलीस संरक्षण घेवून काढण्यात यावे व या रस्त्याचे काम करण्याची कार्यवाही करावी.

कार्य. अभियंता(ड्रेनेज.) :जयभवानी नगरच्या नाल्याचे काम करण्यासाठी तीन वर्षापूर्वी ६५ लक्षचे अंदाजपत्रक केले होते.आता बजेट मध्ये या कामासाठी तरतूद नाही नवीन डीएसआर चे रेट २५ ते ३० टक्के वाढले आहे. त्यानूसार आता जवळपास ७० लक्ष खर्च अपेक्षीत असून अतिक्रमण काढून या नाल्याचे काम करावे लागेल.

श्री.काशिनाथ कोकाटे :हस्तांतरण करतेवेळी या नाल्याचा विषय निघालेला होता. सर्वेही झालेला आहे. या नाल्याचे काम होण्याची गरज आहे की नाही एवढाच खूलासा घ्यावा. खामनदीवर न होणाऱ्या कामावर चार कोटी खर्च होते या नाल्यावर खर्च करण्याची गरज आहे.शासनाकडून आलेले निधीतून एक कोटी खर्च या नाल्यावर खर्च करावे अतिक्रमण असेल तर ते काढावे.

मा. महापौर : संबधीत अधिकारी यांनी या कामाचे अंदाजपत्रक करावे. तरतूद केली जाईल.

श्री.सतीश कटकटे : जाफरगेट बाजाराची जागा महानगरपालिकेच्या मालकीची आहे का पीआर कार्ड महापालिकेच्या नावाचे आहे का ?जागा महापालिकेची नसेल तर वसूली कोणत्या नियमाने केली जाते.सध्या रस्त्यावर बाजार भरतो.

मा. महापौर : ती जागा महापालिकेच्या ताब्यात जरी असली तरी पी. आर कार्ड महापालिकेच्या नावाचे नाही. शासनाचे नावाचे आहे. महापालिकेच्या नाव लावण्याची कार्यवाही

चालू आहे.जागा महापालिकेची आहे.रस्ताही महापालिकेचा आहे त्यामूळे वसूली केली जाते.

श्री.सतीश कटकटे : या बाजाराची ठेकेदाराकडे रक्कम बाकी असतांना त्या प्रकरणाची चौकशी चालू असतांना अधिकाऱ्यांना कोणत्या अटीवर कामावर घेण्यात आलेले आहे. त्याच प्रकरणातील काही कर्मचाऱ्याना घेतले नाही.

सहा. आयुक्त -१ :श्री. शिरीश रामटेके तसेच श्री. डी.ए . गिरी यांची खाते निहाय चौकशी प्रस्तापित केलेली होती. चौकशी अहवाल प्राप्त झालेले आहे त्या अहवालाच्या अधीन राहून त्यांची दोन वेतनवाढ थांबवून तसेच प्रमोशन न देण्याच्या अटीवर त्यांना कामावर घेण्यात आलेले आहे.

श्री. सतीश कटकटे : फरकाची रक्कम कशी वसूल करणार आहे त्यात ते दोषी आहेत का ?

सहा. आयुक्त -१ : जी रक्कम वसूल करायची आहे ती रक्कम अजून यायची आहे मुख्य लेखा परीक्षक यांचा अहवाल आलेला नाही. तो अहवाल प्राप्त झाल्यानंतर वेतनातून वसूली करणार आहोत.

श्री.सतीश कटकटे : या अधिकाऱ्यानी महानगरपालिकेचे मोठे आर्थिक नुकसान केलेले आहे. अहवाल आला नाही चौकशी चालू असतांना कामावर का घेतले.कामावर घेतल्याचे स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभेला प्रशासनाने कळविले आहे काय?

मा. महापौर : पदाधिकाऱ्याना तसे पत्र दिलेले आहे जे काही नुकसान झालेले आहे त्या संबधीत कार्यवाही करणार आहे.

श्री.सतीश कटकटे : माझ्या माहिती प्रमाणे डी.एस गिरी यांचेकडे ३४.५० लक्ष रूपये निघतात. त्यांचे पूर्ण सेवेच्या पगारातून ही रक्कम वसूल होणार आहे का याचा खूलासा दयावा.

सहा. आयुक्त -१ : जे अक्षेप काढले ते मुख्यलेखा परीक्षक यांनी काढलेले आहे. त्यांना पत्र देवून विचारणा केलेली आहे. श्री. उस्मान तसेच श्री. रगडे यांचे बाबतीत चौकशी चालू आहे. वसूली अहवालानुसार वसूली करण्याचे ठरवले तर कमी किंवा जास्त ही होवू शकते. अहवाल प्राप्त झाल्यानंतरच वसूली करण्यास सूरूवात करणार आहोत.दोन्ही अधिकाऱ्याच्या नावाने ३४लक्ष वसूली आहे कूणाकडे किती आहे याचा अहवाल यायचा आहे.

श्री.सतीश कटकटे : एकाच प्रकरणात असलेल्या पैकी श्री. गिरी यांना कामावर घेण्यात आले दोन कर्मचाऱ्याची चौकशी चालू आहे. त्यांना का घेतले नाही.

श्री.संजय केनेकर : एकाच प्रकरणात असलेले कर्मचारी /अधिकारी यांची पूर्ण चौकशी न होता काहींना कामावर कोणत्या नियमाने घेतले.

मा. महापौर : ज्यांना कामावर घेतले त्याची कार्यालयीन चौकशी झालेली आहे त्यांचेवर ठपका ठेवलेला आहे. दंडात्मक कार्यवाही तसेच त्यांना प्रमोशन न देण्याच्या अटीवर घेण्यात आलेले आहे. मा.आयुक्त सभेला उपस्थित नाही. नंतर माहिती दिली जाईल.

उपआयुक्त (प्र.) : श्री.रामटेके तसेच श्री.गिरी यांना लेखा परीक्षणाच्या अहवालानूसार निलंबीत केले होते त्याची चौकशी करण्यात येत होती. जे जे आरोप ऑडीट मध्ये आले होते त्याची चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकारी म्हणून लेखाधिकारी यांनी नियुक्ती

केली होती. १० ते १२ प्रकरणात चौकशी केली काही आरोप सिध्द होतात तर काही अंशत: सिध्द होतात असा अहवाल दिला त्या अनुषंगाने त्यांना शिक्षा प्रस्तावित केली त्यांचे दोन वेतनवाढ बंद करून भविष्यात त्यांना प्रमोशन देण्यात येवू नये असे आदेशीत करण्यात आले. जे महापालिकेचे नुकसान झालेले आहे ते संबधीताच्या पगारातून रेग्युलर वजा करावे असे आदेशीत करण्यात आले आहे.

श्री.संतोष खेडके : ११२४ नोकर भरती प्रकरणाची मा. आयुक्त आल्यानंतर माहिती देणार आहे त्याच बरोबर या प्रकरणाची ही माहिती स. सदस्यांना देण्यात यावी.

मा.महापौर : मा.आयुक्त सभेला उपस्थित नाही. ते आल्यानंतर या विषयावर माहिती घेतली जाईल.

श्री.संजय केनेकर : श्री.रगडे तसेच श्री.उस्मान यांनाही कामावर घेण्यात यावे. त्यांचेवर अन्याय होवू नये.

श्री.सतीश कटकटे : ज्यांना बाजार वसूलीचा ठेका दिला त्यांचेकडे थकबाकी आहे. वसूली करून ते घरी घेवून जातात. त्यांचे नावाने कूठेही मालमत्ता नाही. वसुली कशाच्या अधारावर करणार आहे. ज्यांची चूक होती त्यांना कामावर घेतले वसूली होणार की नाही.

सौ. कला बोरामणीकर :पुष्पनगरी येथील एएमटीचा डेपो आहे. तो तात्काळ हटविण्यात यावे. नागरीक त्रस्त झाले असून उपोषणाचा मार्ग स्विकारण्या इतपत आलेले आहे.

अति.शहर अभियंता : सदर बस डेपो सिडको भागात शिफ्ट करण्यासाठी ३५ लक्ष रू.देवून सिडकोची जागा घेण्यासाठी प्रयत्न चालू आहे. अदयाप मुंबईच्या मुख्य कार्यालयाकडून मंजूरी प्राप्त झालेली नाही.औरंगाबाद विभागाचे जे प्रशासन आहे त्यांनी सदर ठिकाणी बसेस थांबविण्याचे ना हरकत प्रमाणपत्र दिले असून तेथे कोणतेही बांधकाम करू नये असे सूचविले आहे. तोपर्यत शेड तसेच गाडया धुण्यासाठी व्यवस्था होत नाही तोपर्यत शिफ्ट करता येत नाही.ज्यावेळी परवानगी मिळेल त्यावेळी शिफ्ट केले जाईल. रेल्वेस्टेशन येथील बसडेपोच्या जागेची मागणी केलेली आहे त्यांचेही उत्तर आलेले नाही.

मा. महापौर : या बाबतीत प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी.

श्री.भगवान घडमोडे :शहराची अनेक रस्त्याची अवस्था बिकट आहे. अतिक्रमणाने विळाखा घातलेला आहे. वाहतूक व्यवस्था पूर्ण कोलंमडली. अपघाताचे प्रमाण वाढले. त्यासाठी पोलीस विभागाकडून या संदर्भात १० पत्र आलेले आहे. त्यात प्रामुख्याने रस्त्यावरील अतिक्रमण काढणे , सिग्नल चालू करणे तसेच पोल शिफ्टींग करणे असे तीन कामे आहेत. ती केली जात नाही त्यामूळे या महापालिकेची शहरात बदनामी होत आहे. याकडे लक्ष देण्याची गरज आहे.जालना रस्त्यावरील सिग्नल बंद आहे ते अधुनिक पध्दतीचे करावे असे म्हणणे आहे.

कार्य. अभियंता(विद्यु.) :ज्या सिग्नलची नावे पत्रात दिली आहे ती चालू असल्याचे कळविलेले आहे. त्याची प्रत मा. पोलीस आयुक्त यांना सूध्दा दिली आहे. अधिुनिक पध्दतीचे सिग्नल केले जातील त्यांचे अंदाजपत्रक तयार करून संबधीत विभागास कळवून महापालिकेला रक्कम उपलब्ध करून दिली तर काम केले जाईल.महापालिकेचे जे

पोल आहे ते शिप्टींग केले जातील त्यांचे अंदाजपत्रक तयार करून लगेच कार्यवाही होईल.

श्री.प्रल्हाद निमंगावकर :माझ्या वार्डात मेहरनगर भागात महानगरपालिकेची खुली जागा आहे. त्या जागेला तार कुपंन पण घातलेले आहे. एक व्यक्ती ती जागा माझी आहे म्हणून महापालिका व त्या व्यक्तीमध्ये वाद चालू आहे. सदर प्रकरणाची न्यायालयात स्थिती काय आहे खूलासा घेण्यात यावा.

विधी सल्लागार :या संबधीची माहिती तुर्त नाही संचिका बघून माहिती दिली जाईल.

मा. महापौर : स.सदस्य श्री.निमंगावकर यांनी उदया माझ्या दालनात यावे संबधीत अधिकारी यांचेकडून माहिती घेतली जाईल.

श्री.संतोष खेंडके : अतिक्रमणा विषयी पूर्वी प्रमाणे करावे. पूर्वीचे अधिकारी त्या ठिकाणी नियूक्त करावे.

श्री. प्रल्हाद निमगांवकर : माझ्या वार्डात पाण्याच्या टाकीजवळ अतिक्रमण होवून झोपडपट्टया झालेल्या आहेत तसेच ओपनस्पेसला संरक्षित भिंत करण्यात यावी पत्र दिले त्यांची दखल घेतली जात नाही उत्तर दिले जात नाही.

मा. महापौर :स.सदस्य श्री.प्रल्हाद निमंगावकर यांचे वार्डात पाण्याच्या टाकीजवळ अनधिकृत झोपडपट्टी बसलेली आहे त्यांना पर्यायी जागा देण्याची व्यवस्था करावी. त्यांचे वार्डात खुली जागा आहे तेथे संरक्षित भिंत बांधण्यात यावी. कोणत्याही स.सदस्यांनी पत्र देवून माहिती विचारली असता त्यांना सात दिवसाच्या आत प्रशासनाच्या अधिकाऱ्यानी उत्तर दयावे अशी सूचना देण्यात येत आहे.

या बरोबर ''राष्ट्रगिताने'' आजची सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.